नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५५ * अंक १७२ * * नागपूर * सोमवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## स्वदेशीचा पेरा

काल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपली ट्रम्पगिरी दाखवली. त्यामुळेच भारतातील अमेरिकेच्छूक तरुणांना निराशा होणे स्वाभाविक होते आणि ते झाले. सर्वसाधारण जनतेला मात्र त्याचे फारसे सोयरसुतक नाही. त्यानंतर आज आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष भाषण करून जनतेला शाब्दिक दिलासा दिला आहे. आठ वर्षे जीएसटीच्या जबरदस्त भाराखाली दबलेल्या भारताला उद्यापासून थोडासा दिलासा मिळणार आहे, कारण स्वतः पंतप्रधान म्हणतात म्हणून तो दिलासा फार मोठा आहे असे आपण समजावे. सामान्य जनतेच्या दृष्टिकोनातून विचार केला तर जनता उत्साहात का येत नाही, याची चिंता मोदी साहेबांना वाटणे स्वाभाविक आहे. जीएसटी च्या नव्या कर प्रणालीच्या माध्यमातून अनेक बाबींचा विचार करून जीएसटीचे कर किंवा दर बऱ्याच प्रमाणात कमी करण्यात आलेले आहेत. विशेष म्हणजे 28% आकाराच्या जीएसटीचा प्रचंड भार नष्ट झालेला आहे, आता त्याचा जनतेने त्याचा उपभोग घ्यावा अशी इच्छा पंतप्रधानांनी बाळगली. तर आपण त्यांच्या उदारतेला नमनच केले पाहिजे. सुरुवातीला जीएसटी म्हणजेच वस्तू आणि सेवा कर लावल्यावर पहिल्या वर्षात देशाला साधारणपणे साडेसात लाख कोटींचे उत्पन्न मिळाले होते. ते उत्पन्न यावर्षी 22 लाख कोटींच्या वर गेलेले आहे याचा स्पष्ट अर्थ असा आहे की जनता आता जीएसटीला सरावलेली होती. जगातील कोणत्याही देशात एवढा देशांतर्गत कर नाही. त्यामुळे आज जीएसटीच्या सवलतींच्या बरोबर पेट्रोल आणि डिझेल यामध्ये निदान पाच ते 50 पैशांची सूट मिळेल अशी देशाच्या गरीब जनतेची जी अपेक्षा होती ती काही पुरी झाली नाही. पण मोदी साहेबांचे पट्टदोस्त ट्रम्प यांनी आपल्या दोस्तीला घट्ट करण्यासाठी दररोज नवेनवे फटाके फोडणे सुरू केलेले आहे. या लहरी ट्रम्पला जसे चीनने उत्तर दिले तसे आपण देऊ शकत नाही. आपण चीन सारखे घिसाडघाईचे धोरण ठरवू शकत नाही. त्यापेक्षा आपण अमेरिकेवर दया करून कापसावरील आयात शुल्क कमी करून टाकले. यामुळे कापसाचा वापर करणाऱ्या गिरण्यांना अत्यंत स्वस्त दरात कापूस मिळू शकेल आणि भारतापेक्षा अमेरिकेचा कापूस स्वस्तच आहे, कारण त्याला अमेरिकेचा आणि अमेरिकेच्या सरकारचा वरदहस्त आहे. मोठ्या प्रमाणावर अमेरिकेच्या सरकारकडून कापूस उत्पादकांना मदत मिळते, आपल्या सरकारला तशी मदत करता येणे शक्य नाही. पण याकडे आपण दुर्लक्ष केलेच पाहिजे कारण गेल्या काही दिवसांपासून अनेक बड्या बड्या कंपन्यांनी जीएसटीचे दर कमी केल्यामुळे आपल्या वस्तूंच्या दरात मोठी कपात झाल्याने पंतप्रधान मोदी यांचे आभार मानलेले आहेत. हे बडे उत्पादक जीएसटीचा मोठा भार असल्यामुळे फारसे दुःखी नव्हतेच, पण आता तर जीएसटीचे दर कमी झाल्यामुळे अशाच बड्या उद्योगपतींना मोठाच हर्षवायू झालेला आहे. माननीय पंतप्रधानांच्या स्वदेशीच्या नाऱ्याला आणि स्वदेशीच्या पेऱ्याला जनतेकडून किती प्रतिसाद येतो, हेही आपल्याला बघायचे आहे. साधारण विचार केला तर सध्याच्या काळात भारतात येणाऱ्या फटाके आणि मोबाईल यांच्यासह बऱ्याच गोष्टींवर यत्र, तत्र आणि सर्वत्र आपल्या शेजारच्या कुचीन चीनचाच बोलबाला दिसत आहे. आता समस्तत देशाने पंतप्रधानांच्या वाक्याचा आधार घेऊन स्वदेशी जागरण मंचासारख्या व्यासपीठावरून अशी चीनसारखी परकीय आक्रमणे परतवून लावण्याचा निर्धार करावा आणि आपले स्वदेशी प्रेम जागृत करावे असे आम्हाला वाटते. पूर्वीच्या काळात सर्वच नेते अहितकारी स्वदेशी मोटर गाड्या वापरत असत. हल्ली सर्वांच्याच गाड्या परदेशी किंवा भारतात निर्माण झालेल्या परदेशी बनावटीच्या आहेत. आता स्वदेशीच्या पेऱ्याचा पंतप्रधानांनी जो उच्चार केला आहे. त्याप्रमाणे सर्वांनीच म्हणजे सर्व नेत्यांनी स्वदेशीचा स्वीकार केला. तर जनता त्यांना नक्कीच मोठा प्रतिसाद देईल, असा आम्हाला खास विश्वास आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# आजपासून नवीन जीएसटी दर लागू!

## पनीर, तूप, साबण, कार आणि एसीच्या किमती घटल्या

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
आज २२ सप्टेंबरपासून, जीवनावश्यक वस्तूंवर ५% किंवा १८% असे दोन जीएसटी स्लॅब लागू होतील. करप्रणाली सोपी करण्यासाठी सरकारने हे केले आहे. यामुळे पनीर, तूप, साबण आणि शाम्पू, तसेच एसी आणि कार यासारख्या सामान्य गरजा स्वस्त होतील.




जीएसटी कौन्सिलच्या ५६ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी ३ सप्टेंबर रोजी याची घोषणा केली. त्यांनी जीएसटी स्लॅब ५%, १२%, १८% आणि २८% वरून दोन केले आहेत. आता, फक्त ५% आणि १८% स्लॅब असतील.

याशिवाय, तंबाखू, पान मसाला, कार्बोनेटेड पेये आणि मोठ्या कार, जहाज आणि वैयक्तिक वापरासाठी विमाने यासारख्या लक्झरी वस्तूंवर ४०% विशेष कर आकारला जाईल.
पनीर, रोटी, चपाती आणि पराठा यासारख्या काही वस्तूंवर आता कर आकारला जाणार नाही. उद्या, २२ सप्टेंबरपासून तंबाखू वगळता सर्व वस्तूंवर नवीन दर लागू होतील.

या बदलामुळे साबण आणि शाम्पू, अन्न, इलेक्ट्रॉनिक्स आणि कार यासारख्या दैनंदिन वापराच्या वस्तू स्वस्त होतील. जीवन आणि आरोग्य विम्यावरील १८% कर देखील शून्य करण्यात आला आहे. सिमेंटवरील कर २८% वरून १८% पर्यंत कमी केला, यामुळे घर बांधण्याचा किंवा दुरुस्तीचा खर्च कमी होईल.

टीव्ही आणि एसी सारख्या वस्तूंवरील कर २८% वरून १८% पर्यंत कमी करण्यात आला आहे, ज्यामुळे ते स्वस्त झाले आहेत. ३३ आवश्यक औषधांवर, विशेषतः कर्करोग आणि गंभीर आजारांसाठी असलेल्या औषधांवर कोणताही कर नाही. ३५० सीसी पर्यंतच्या छोट्या कार आणि मोटारसायकलींवर आता २८% ऐवजी १८% कर आकारला जाईल.
ऑटो पार्ट्स आणि तीन चाकी वाहनांवरील कर देखील २८% वरून १८% पर्यंत कमी करण्यात आला आहे, ज्यामुळे ते स्वस्त झाले आहेत.

## स्वदेशी मोहिमेसह उत्पादनाला गती द्या : मोदी



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी देशाला संबोधित केले. ते म्हणाले, २२ सप्टेंबर रोजी सूर्योदयासह जीएसटी बचत महोत्सव सुरू होईल. समाजातील सर्व घटकांना याचा फायदा होईल. पंतप्रधानांनी जनतेला फक्त देशवासीयांच्या कठोर परिश्रमातून बनवलेल्या वस्तू खरेदी करण्याचे आवाहन केले.
पंतप्रधानांनी जीएसटी सुधारणा, स्वावलंबी भारत आणि स्वदेशी यावर भर दिला. त्यांनी राज्य सरकारांना स्वदेशी मोहिमेसह उत्पादनाला गती देण्याचे आणि गुंतवणुकीसाठी वातावरण निर्माण करण्याचे आवाहन केले.

केंद्र आणि राज्ये एकत्र पुढे गेली, तरच हे स्वप्न पूर्ण होईल. नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून देश आत्मनिर्भर भारत मोहिमेकडे एक मोठे पाऊल टाकत आहे. २२ सप्टेंबर रोजी सूर्योदयाच्या वेळी पुढील पिढीचा जीएसटी लागू केला जाईल. एक प्रकारे, उद्या देशभरात जीएसटी बचत महोत्सवाची सुरुवात आहे. या जीएसटी महोत्सवादरम्यान तुमची बचत वाढेल, ज्यामुळे तुम्हाला तुमच्या इच्छेनुसार वस्तू खरेदी करता येतील.
२०१४ मध्ये जेव्हा देशाने मला पंतप्रधान म्हणून निवडले, तेव्हा विविध करांच्या चक्रव्यूहामुळे लाखो कंपन्यांना अडचणींचा सामना करावा लागला. एका शहरातून दुसऱ्या शहरात वस्तूंच्या वाहतुकीच्या वाढत्या खर्चाचा भार गरिबांवर पडला. देशाला या परिस्थितीतून बाहेर काढणे आवश्यक होते, असेही नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

## हे देशातील क्रांतिकारी पाऊल

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ :**
देशात आता नवीन जीएसटीचे दर उद्यापासून लागू होणार आहेत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली असून हे देशातील क्रांतिकारी पाऊल असल्याचे ते म्हणाले.

सीएम फडणवीस यांची प्रतिक्रिया



फडणवीस म्हणाले, जीएसटीचे सेकंड जनरेशन रिफॉर्म्स हे या देशातील क्रांतिकारी पाऊल आहे. यामुळे सामान्य माणसाला लागणाऱ्या ज्या वस्तू आहेत, ज्याच्या किंमती कमी होणार आहेत, कारण त्याच्यावरील जीएसटी कमी करण्यात आला आहे. दुसरीकडे देशांतर्गत मागणी वाढणार आहे.
देशांतर्गत प्रॉडक्शन वाढणार आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. विशेषतः आत्मनिर्भर भारतकडे जो आपला प्रवास आहे तो या सेकंड जनरेशनच्या माध्यमातून प्रधानमंत्र्यांनी सुरू केलेला आहे. त्यामुळे मी तमाम भारतीयांच्या वतीने मोदीचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी दिली आहे.

## उपमुख्यमंत्र्यांचे अकाउंट हॅक

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ :**
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ट्विटर अकाउंट रविवारी सकाळी हॅक झाले होते. हॅकर्सनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर पाकिस्तान आणि तुर्कीच्या झेंड्यांचे फोटो पोस्ट केले होते.



शिंदे यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी तात्काळ सायबर क्राइम पोलिसांना कळवले. तक्रार मिळाल्यानंतर काही मिनिटांत त्यांनी अकाउंटवर नियंत्रण मिळवल्याचे पथकाने सांगितले आहे. महाराष्ट्र सायबर सेल या प्रकरणाची चौकशी करत असून हॅकिंगमागील लोकांची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहे. हॅकिंग दरम्यान कोणतीही संवेदनशील माहिती शेअर केली गेली नव्हती.

## भारताला १७२ धावांचे लक्ष्य

■ **वृत्तसंस्था, दुबई, दि. २१ :**
आशिया कपच्या सुपर ४ फेरीत खेळत असलेल्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारच्या सामन्यात पाकिस्तान संघाने प्रथम फलंदाजी करताना भारताला २० षटकात १७२ धावा करण्याचे लक्ष्य दिले.
भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानचा डाव २० षटकात १७१ धावांवर आटोपला.पहिल्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर फरहानला जीवदान मिळाले. तिसऱ्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर हार्दिक पंड्याने फखर जमानला यष्टीरक्षकाच्या हाती झेलबाद केले. जमानने ९ चेंडूत १५ धावा केल्या.

पाचव्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर कुलदीप यादवने सईम अयुबचा झेल सोडला. आठव्या षटकात अभिषेक शर्माने साहिबजादा फरहानचा बाउंड्री लाईनवर कॅच ड्रॉप केला. शिवम दुबेने १० व्या षटकात सईम अयुबला अभिषेक शर्माकरवी झेलबाद केले.
१५ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर शिवम दुबेने साहिबजादा फरहानला कर्णधार सूर्यकुमार यादवकरवी झेलबाद केले. फरहान ४५ चेंडूत ५८ धावा काढून बाद झाला. कुलदीप यादवने १४ व्या षटकात तलत हुसेनला वरुण चक्रवर्तीच्या हाती झेलबाद केले. भारताकडून शिवम दुबे याने दोन विकेट घेतल्या. बुमराहा महागडा गोलंदाज ठरला.

## जरांगेंच्या बैठकीत मधमाशांचा हल्ला

### अनेकांना घेतला चावा : कार्यकर्त्यांची पळापळ



■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २१ :**
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नियोजित बैठकीत आज दुपारच्या सुमारास मोठा गोंधळ उडाला. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे मराठवाड्यातील समन्वयकांची बैठक सुरू असताना अचानक मधमाशांनी हल्ला केल्याने एकच पळापळ झाली.
या अनपेक्षित घटनेमुळे बैठकीत व्यत्यय आला आणि अनेक कार्यकर्त्यांना मधमाशांनी दंश केल्याने त्यांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले. यावेळी कार्यकर्त्यांनी मनोज जरांगेंना उपरण्याने झाकत सुरक्षित स्थळी नेले.

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाची पुढील दिशा ठरवण्यासाठी आज आंतरवाली सराटीमध्ये मराठा समन्वयकांची बैठक बोलावली होती. या बैठकीची तयारी सुरू असताना अचानक मधमाशांचे मोहोळ आले. त्यांनी थेट उपस्थितांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात अनेक समन्वयक आणि कार्यकर्त्यांना मधमाशांनी चावा घेतला.
परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, कार्यकर्त्यांनी तात्काळ मनोज जरांगे पाटील यांना सुरक्षित स्थळी हलवले. त्यांना कोणत्याही प्रकारची गंभीर इजा होऊ नये म्हणून सहकाऱ्यांनी त्यांच्या गळ्यातील उपरणे काढून त्यांना झाकले.

## मिथुन मन्हास होणार बीसीसीआय अध्यक्ष

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
मिथुन मन्हास हे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) अध्यक्ष होणे जवळजवळ निश्चित आहे. शनिवारी दिल्लीतील एका केंद्रीय मंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत बीसीसीआयचे उच्च अधिकारी उपस्थित होते.



मिथुन यांच्या नावावर सर्वांचे एकमत झाले. तथापि, २८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या बोर्डाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतरच अधिकृत घोषणा केली जाईल. निवडणूक २८ सप्टेंबर रोजी मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) होईल. २०१९ मध्ये बीसीसीआयच्या घटनेत सुधारणा केल्यानंतर, अशा नामांकनांना विरोधाशिवाय सामान्यतः स्वीकारले जाते. मिथुन मन्हास यांनी एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळला नाही.

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

शेतकऱ्याला दैवत मानणारे शेतकऱ्यांचे हित जोपासणारे दानशूर व्यक्तिमत्व

**गिरीधारीलालजी सारडा**

यांना जन्मदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!



शुभेच्छुक



आकाश देशमुख
प्रोप्रा अद्वैत ॲग्री ट्रेड वाशिम



शिवशंकर भोयर
जिल्हाध्यक्ष आध्यात्मिक आघाडी भाजपा




## सदावर्तेंच्या गाडीवर हल्ल्याचा प्रयत्न

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २१ :**
मनोज जरांगे आणि मराठा आरक्षणाला सातत्याने विरोध करणारे आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर वारंवार टीका करणारे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर आज जालन्यात काही लोकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला.



या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मराठा आंदोलकांकडून हा हल्ला केल्याचा आरोप करण्यात येत आहे.
सदावर्ते हे जालना जिल्ह्यातील धनगर समाजाच्या उपोषण आंदोलनाला भेट देण्यासाठी जात होते. त्यांच्या गाड्यांचा ताफा रस्त्यावरून पुढे जात असताना हल्ल्याचा प्रयत्न झाला.



## ....अन्यथा तुम्हीही अण्णा हजारेंच्या पंक्तीत बसाल



**पुणे :** आमदार रोहित पवार आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यात सध्या सोशल मीडियावर शाब्दिक युद्ध सुरू आहे.

मतदारसंघातील एका सभेमध्ये रोहित पवार एका अधिकाऱ्यावर संतापलेले असतानाचा व्हिडिओ दमानिया यांनी शेअर केला होता. 'जसे काका तसाच पुतण्या? रोहित पवारांची ही काय भाषा?', असा टोला लगावत दमानिया यांनी रोहित पवारांना डिवचले होते.

आता या टीकेला रोहित पवारांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. रोहित पवार यांनी काही विषय मांडले आहेत. या विषयांवर आपण भूमिका मांडून आपल्या भूमिकांबाबत शंका घेणाऱ्यांचे गैरसमज दूर करावेत. अन्यथा हे शंका घेणारे आपणास अण्णा हजारे यांच्या पंक्तीत बसवतील, असा टोला रोहित पवार यांनी अंजली दमानिया यांना लगावला आहे.

रोहित पवारांनी नुकतेच त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाउंटवरून एक ट्विट केले आहे. या ट्विटमध्ये त्यांनी दोन फोटो शेअर केले आहेत. पहिल्या फोटोत राज्य शासनाच्या ई-निविदा सूचनांची माहिती आहे, तर दुसऱ्या फोटोत मेघा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने शेगाव व पंढरपूर पालखी दिंडी मार्गाच्या कामादरम्यान विनापरवानगी गौण खनिजाचे उत्खनन केल्याबद्दलचे पत्रक आहे.

यासोबतच रोहित पवारांनी लांबलचक कॅप्शन लिहून दमानिया यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला आहे. 'तुमच्या भूमिका प्रामाणिक आहेत यात शंका नाही, पण त्या 'सिलेक्टिव्ह' असल्याबद्दल मात्र प्रचंड चर्चा आहेत. ज्या चर्चांवर आम्हाला अजिबात विश्वास नाही,' अशा शब्दांत त्यांनी दमानिया यांना टोला लगावला आहे.

## ओ लक्ष्मण सर... जनाची नाही तर मनाची ठेवा



**मुंबई :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. त्यांची एक कथित ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या क्लिपमध्ये एक तरुण लक्ष्मण हाकेंना त्यांच्या सामाजिक कायार्साठी पेट्रोल आणि इतर मदत म्हणून पैशांची ऑफर देताना ऐकू येतो, लक्ष्मण हाकेंनी ही ऑफर स्वीकारताच तरुणाने त्यांची कानउघाडणी केली.

व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमध्ये एक तरुण लक्ष्मण हाकेंना त्यांच्या कामासाठी पेट्रोलचे पैसे देण्याची ऑफर देतो. पेट्रोलसाठी आपण तुम्हाला पैसे देऊ इच्छित आहे. तुम्हाला पैसे कसे देऊ, कॅशमध्ये द्यायचे की फोन पे, गूगल पे वर देता येईल? असे तरुणाने विचारले. यावर हाके यांनी तुम्ही भेटायला या, असे सांगितले. पण तरुण फोनवरूनच पैसे पाठवण्याचा आग्रह धरतो. अखेरीस, लक्ष्मण हाके आपले स्वतःचे बँक खाते नसल्याचे सांगत, आपल्या ड्रायव्हरचा यूपीआय नंबर देतात. यूपीआय नंबर मिळाल्यानंतर, तरुणाने आपला स्वर बदलला आणि हाके यांची चांगलीच कानउघाडणी करत, त्यांची लाज काढली.

ही ऑडिओ क्लिप सतीश वाघ नावाच्या व्यक्तीच्या अकाउंटवरून सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या क्लिपमुळे लक्ष्मण हाके यांची पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

## धामण सापाच्या अंड्यातून सर्पमित्राने काढली पिल्ले

**अमरावती :** तब्बल ७० दिवसांपूर्वी रेस्क्यू केलेल्या धामण जातीच्या सापाने दिलेल्या अंड्यातून पिल्ले बाहेर काढण्याचा यशस्वी प्रयोग अनकवाडी येथील सर्पमित्राने पार पाडला. तिवसा तालुक्यातील कावली वसाड येथे समीर नेवारे या सर्पमित्राने धामण जातीच्या सापाचे रेस्क्यू केले होते. तेव्हा सायंकाळ झाल्याने सापाला सुरक्षितरीत्या भरणीत ठेवले असता त्या धामण जातीच्या सापाने भरणीतच अंडे दिले होते. या अंड्यांबाबत अनकवाडी येथील अनुभवी सर्पमित्र शुभम विघे यास माहिती देण्यात आली. तेव्हा त्या धामण सापाला सुरक्षितरित्या जंगलात सोडून देण्यात आले. त्या अंड्यांची काळजी घेत सापाचे शुभम विघे याने त्यातून पिल्ले बाहेर काढण्यासाठी प्रयोग राबवला.

त्यासाठी नैसर्गिक वातावरण निर्माण केले. तब्बल ७० दिवसापर्यंत अंड्यांना त्या वातावरणात ठेवल्यावर त्यातून मोठ्या प्रमाणात पिल्ले बाहेर पडली. या सर्व पिल्लांना चार दिवसांपूर्वी सुखरूप जंगलात सोडल्यात आले. या उपक्रमाची परिसरात चर्चा होत आहे.

# ९ जिल्ह्यांसाठी ६२७ कोटींची मदत जाहीर

### ३० जिल्ह्यांत ६३.५८ लाख एकरचे नुकसान, शेतकऱ्यांना आजपासून मिळेल रक्कम

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१:**



राज्यात अतिवृष्टीने ३० जिल्ह्यांमधील ६३ लाख ५८ हजार ३०० एकर शेतीचे नुकसान झाले. पंचनामे पूर्ण झालेल्या ९ जिल्ह्यांसाठी राज्य सरकारने ६२७ कोटींची मदत जाहीर केली आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ह्यदिव्य मराठीह्ला दिलेल्या माहितीनुसार, सोमवारपासून मदतीची रक्कम थेट बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केला जाईल.

भरणेंनी असेही सांगितले की, शिल्लक तसेच सप्टेंबरमधील पंचनामे पूर्ण झाल्यावर तेथेही मदत दिली जाईल. जिरायतीसाठी प्रतिहेक्टर ८,५००, बागायतीसाठी १७,०००, फळ पिकांसाठी २२,५०० रुपये असा दर निश्चित केला आहे. या दराबद्दल नांदेड येथे शेतकऱ्यांनी भरणेंसमोर नाराजी व्यक्त केली. हिंगोलीत शेतकऱ्यांनी काळे झेंडे दाखवले.

जून-जुलैतील पंचनामे होऊन मदतही जारी झाली आहे. राज्यात आतापर्यंत ६३ लाख ५१ हजार ५२० हेक्टर क्षेत्रावर हानी झाली आहे. अजूनही अनेक ठिकाणी पाऊस सुरूच आहे. तेथेही पंचनामे गतीमान पद्धतीने करण्याचा प्रयत्न आहे.

महसूल, कृषी विभागाकडून पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया झाल्यानंतर तातडीने भरपाई देण्यात येईल. शेतकऱ्यांच्या मागे सरकार ठामपणे उभे आहे. युरियाच्या तुटवड्याबाबत केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार केला आहे. सकारात्मक निर्णय होईल.

जून ते जुलैतील नुकसानीसाठी नागपूर, वर्धा, चंद्रपूर, हिंगोली, सोलापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना ७३.९१ कोटी ४३ हजारांचा निधी मंजूर झाला आहे. दुसऱ्या टप्प्यात ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टीतील प्रचंड नुकसानीसाठी एकट्या नांदेड जिल्ह्याला ५५३ कोटी ४८ लाख ६२ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

एनडीआरएफच्या निकषानुसार संपूर्ण जिल्हा किंवा विभागात शासन मदतीची घोषणा करते. प्रसंगी केंद्रासोबत राज्य आपदा निधीतून अधिकची मदत देण्याचा निर्णय घेतला जातो.

पूर, वीज पडून मृत्यू झाल्यास ४ लाखांची मदत मिळते. कोरडवाहू २ हेक्टरला १३ हजार, बागायती २६ तर फळबागांना ३७ हजार मदत मिळते. पुराने ३ इंचापेक्षा गाळ, माती, ढिगारा साचल्यास १८ हजार प्रतिहेक्टरी २ हेक्टरसाठी जमीन खचणे, खरडणे, खचणे, नदीपात्र बदलल्याने वाहून गेल्यास हेक्टरी ४७ हजार मिळतात.

दरम्यान संकटग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यास सरकार कटीबद्ध असल्याचेही दत्ता भरणे यांनी सांगितले.

## विदर्भातील शेतकरी विधवा वर्षा बंगल्यावर धडकणार!

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. २१:**

मुख्यमंत्र्यांचे मुंबई येथील अधिकृत निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर मागील ५ वर्षात २० कोटी रुपये खर्च झाले असून, काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांचा डबलबेड आणि गादीची चर्चा रंगली होती.

मुख्यमंत्र्यांचा हाच २० लाखाचा पलंग व गादी पाहण्यासाठी विदर्भात मागील डिसेंबरपासून आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विधवा महिला अर्थात लाडक्या बहिणी विशेष बसने दर्शन यात्रा काढुन मुंबईला भेट देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवाभाऊ महाराष्ट्र लूट दर्शन यात्रा संयोजक किशोर तिवारी यांनी दिली .

सध्या महाराष्ट्रावर १० लाख कोटीचे विक्रमी कर्ज झाले आहे तसेच राज्यात ६३ लाख हेक्टर मध्ये खरीपाची पिके पूर्णपणे बुडाली आहे व शेतकऱ्यांचे कमीत कमी ४० हजार कोटींचा लागवड खर्च बुडाला आहे. त्यातच सरकारी व सहकारी बँकांनी यावर्षी निर्धारीत लक्ष्याच्या फक्त ४० टक्के पीककर्ज वाटप केले आहे. शेतकऱ्यांनी बहुतेक पीककर्ज मायक्रोफायनान्स, बजाज फायनान्स, महिंद्रा फायनान्स, नागरी पत संस्था यांच्या कडून २४ टक्के वार्षिक व्याजाने घेतले आहे.

या अभुतपुर्व संकटामुळे दररोज महाराष्ट्रात ७ ते ८ शेतकरी आत्महत्या करीत आहेत मात्र सर्व राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारी मध्ये व्यस्त आहेत तर मुख्यमंत्री शेकडो कोटींच्या जाहीराती करण्यात व्यस्त आहेत अशी खंत तिवारी यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र लूट दर्शन यात्रेत सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे कुंकू पुसलेल्या शेतकरी विधवा वर्षा बंगल्यासोबत सोबत नंदनवन आणि देवगिरी बंगला, सिल्वर ओक बंगला, मातोश्री नवीन व मोलमजुरी करून उभारलेल्या राज ठाकरे यांच्या शिवतीर्थावर एकेकाळी ऑटो रिक्शा चालक असलेले एकनाथ शिंदे व प्रतापराव नाईक यांच्या पुण्यभुमीचे दर्शन घेतील, दिवाळीत ही यात्रा काढली जाईल, असे संयोजक किशोर तिवारी यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेत विविध योजनांचा आढावा

### शिक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :**
शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने बालेवाडी येथील हॉटेल ऑर्किड येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेचा समारोप करण्यात आला.




या परिषदेस शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्यासह राज्यातील शिक्षण विभाग, पुणे महानगर पालिका आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदी उपस्थित होते.

शालेय शिक्षण परिषदेच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या सुरु असलेल्या विविध योजना, उपक्रमांचा आढावा घेतला घेवून मार्गदर्शन केले.

आयुक्त शिक्षण सचिन्द्र प्रताप सिंह यांनी इन्स्पायर मानक, एक पेड माँ के नाम २.०, हरित महाराष्ट्र, - समृद्ध महाराष्ट्र उपक्रम , इको क्लब फॉर मिशन लाईफ, स्वच्छ आणि हरित विद्यालय मुल्यांकन, स्वच्छ पंधरवाडा-स्वच्छता हीच सेवा उपक्रम, तंबाखू मुक्त अभियान, आधार वैध व आधार नोंदणी कामकाज, अपार जनरेशन, संच मान्यता, अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समायोजन, शाळा व संस्था मॅपिंग या विषयांचा समावेश होता. सदर विषयांच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून आयोजित शिष्यवृत्ती परीक्षा, एनएमएमएस तसेच शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षाविषयी मार्गदर्शन केले.

शिक्षण संचालनालयांच्या शिक्षण संचालक कृष्णकुमार पाटील यांनी उल्हास नवभारत योजना, एनएमएमएस, राजीव गांधी अपघात योजना, मराठी भाषा फाउंडेशन योजना २.० विषयी उपस्थितांना माहिती दिली.न्यायालयीन प्रकरणे व विद्यार्थी सुरक्षाविषयी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात शालेय शिक्षण व क्रीडा विभाग उपसचिव समीर सावंत यांनी व्हिजन डॉक्युमेंट व महाराष्ट्र व्हिजन@२०४७ याविषयावर मार्गदर्शन केले.

प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे शिक्षण सहसंचालक रामकांत काठमोरे यांनी शाळा प्रवेशोत्सव, पी.एम.पोषण योजना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना भौतिक सुविधांची उपलब्धता, शालेय आरोग्य तपासणी, इ.५ वी व इ. ८ वी वर्ग जोडणे, विशेष शिक्षक समायोजन प्रक्रिया, शालेय परसबाग, अन्न बिघडू नये यासाठी नियमावली, शैक्षणिक पर्यटन, सहशिक्षण-एकाच परिसरातील शाळांचे समायोजन, शैक्षणिक कामकाज नियोजन, आणि शाळांना संगणक पुरवणे या विषयांवर मार्गदर्शन केले.

यानंतर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी इयत्ता १० वी व १२ वी परीक्षांविषयी ऑनलाईन कामकाज आणि परीक्षांसंबंधीत ऑनलाईन सुविधांबाबत माहिती दिली.

## राज्यकर्त्यांनी राजासारखे मन ठेवून सर्वांच्या हिताचा निर्णय घ्यावा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१:**

पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली अपेक्षा



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात सुरू असलेल्या आरक्षणाच्या मुद्द्यामुळे वातावरण तापलेले आहे. या पार्श्वभूमीवर, भाजप नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी आरक्षणाच्या संघर्षावर महत्त्वाचे मत व्यक्त केले आहे. आरक्षणावरील संघर्ष हा नैसर्गिक आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांनी राजासारखे मन ठेवून सर्वांच्या हिताचा निर्णय घेतला पाहिजे, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर सुरू केलेल्या बेमुदत उपोषणानंतर राज्य सरकारने मराठा समाजाच्या आठ मागण्यांपैकी सहा मागण्या मान्य करत शासन निर्णय (जीआर) जारी केला.

मात्र या जीआरवर ओबीसी नेत्यांसह मंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, बंजारा समाजानेही आरक्षणासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. राज्यात आरक्षणाच्या प्रश्नावर वातावरण तापलेले असतानाच पंकजा मुंडे यांनी उपरोक्त विधान केले आहे.

ओबीसी-मराठा संघर्ष आहे. मात्र ज्या पद्धतीने तो मांडला जातोय, त्या पद्धतीने मला पाहायला मिळत नसल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. मी तसे चष्मे लावून फिरत नाही. मी एखाद्या माणसाकडे बघत असताना जातीचा रंग पाहत नाही. त्यामुळे कदाचित तसे मला दिसत नाही, असेही त्यांनी म्हटले.

अनेक समाज वेगवेगळ्या ठिकाणी आरक्षण मागत आहेत. तिथला समाज विरोध करतो हे नैसर्गिक आहे. जसे त्यांचे मागणे नैसर्गिक तसा विरोधही नैसर्गिक आहे. यातून मार्ग काढणे हे नेत्याचे कर्तव्य आहे. आत्ताच्या राज्यकर्त्यांनी राजासारखे मन ठेवून सर्वांच्या हिताचा निर्णय घेतला पाहिजे. सामाजिक दृष्ट्या मागास असलेल्या लोकांना कुठेही धक्का न लागता निर्णय घेतला पाहिजे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

## साठ लाखांची फसवणूक

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. २१:**

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने तब्बल ६० लाख ३८,२०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका महिला आरोपीला सायबर पोलिसांनी म. प्र. च्या इंदूर येथून अटक केली. तिला २५ सप्टेंबरपर्यंत कोठडी सुनावली आहे.

तक्रारदार डॉ. राहुल विलास सुरूशे (३५, रा. रामकृष्ण नगर, मलकापूर, यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १२ मे रोजी त्यांना अज्ञात व्यक्तीने फोन करून शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे सांगितले. त्यानुसार त्यांनी विश्वास ठेवून ६० लाखांहून अधिक रक्कम गुंतवली. काही काळाने त्यांनी नफ्याबाबत विचारणा केली असता उडवा-उडवीची उत्तरे देत आणखी गुंतवणुकीचा आग्रह केला.

अखेर फसवणुकीची जाणीव होताच त्यांनी खदान पोलिस ठाण्यात तक्रार केली. खदान पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता तपास सायबर पोलिसांकडे वर्ग केला. तांत्रिक विश्लेषण व डिजिटल ट्रेसिंगच्या आधारे पोलिसांनी तपास करीत या महिलेला इंदूर येथून ताब्यात घेण्यात आले.

## जनशिक्षणाचे उपासक कर्मवीर भाऊराव पाटील

भारतीय शिक्षण क्षेत्रातील एक महान विचारवंत, जनशिक्षणाचे उपासक, समाजातील अशिक्षित, शोषित, वंचित आणि ग्रामीण जनतेसाठी आयुष्यभर झटणारे थोर समाजसुधारक म्हणजे शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील.



कर्मवीर भाऊराव पाटलांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्याच्या हातकणंगले तालुक्यातील कुंभोज या गावात झाला.

आईचे नाव गंगाबाई व वडिलांचे नाव पायगोंडा पाटील (देसाई) होते. लहानपणापासूनच त्यांनी गरिबी, कष्ट, अन्याय आणि विषमता जवळून अनुभवली. म्हणूनच आयुष्याच्या सुरुवातीपासून त्यांना शिक्षणाचे आणि आत्मनिर्भरतेचे महत्त्व पटले. गरिबी, अडचणी आणि सामाजिक विषमता यांचा सामना करत त्यांनी आयुष्यभर सर्वसामान्यांसाठी शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला.

भाऊराव पाटील यांना "कर्मवीर" ही उपाधी त्यांच्या भरीव कायार्मुळे लोकांनीच दिली. ते महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज व महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित होते. महात्मा जोतिबा फुले त्यांचे आदर्श होते. असेच शाहू महाराजांनी सुरू केलेल्या सर्वांना शिक्षण या आंदोलनाने त्यांच्या मनावर छाप पाडली होती.

महात्मा गांधींच्या साधेपणा, श्रम आणि स्वावलंबन या विचारसरणीचा त्यांनी पुरस्कार केला. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे, हा त्यांचा दृढ विश्वास होता. शिक्षणानेच समाजात खरी क्रांती होऊ शकते असे त्यांचे ठाम मत होते.

१९१९ साली त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापन केली. या संस्थेमार्फत "शिकता शिकता कमवा" ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. गरीब विद्यार्थ्यांनी शेतीकाम, हस्तकला, दैनंदिन कामे करताना मिळणाऱ्या पैशातून शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी ही संकल्पना राबविली.

त्यांनी विद्यार्थ्यांना साधेपणा, श्रम, स्वावलंबन व नैतिकता यांचे धडे दिले. गरीब घरांमधील व ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी वसतिगृह, शाळा आणि महाविद्यालयांचे मोठे जाळे उभारले. त्या काळात ग्रामीण भागात व गोरगरिबांना शिक्षण मिळणे कठीण होते. पण भाऊरावांच्या भरीव शैक्षणिक कायार्मुळे सामान्य घरातील विद्यार्थीही डॉक्टर, वकील, शिक्षक, अधिकारी बनू लागले.

आजच्या घडीला रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्र व कर्नाटकातील पाचशेहून अधिक शाळा व महाविद्यालय व वसतिगृहांच्याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी ज्ञानप्राप्ती करीत आहेत. १९५९ मध्ये ते अनंतात विलीन झाले, पण त्यांनी निर्माण केलेली शिक्षणसंस्था आजही समाजाला ज्ञानप्रकाश देत आहे.

जातीभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा यांचा कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तीव्र विरोध केला. गरिबांवरील अन्यायाविरुद्ध ते आयुष्यभर झगडले. त्यांनी स्त्री-शिक्षणाला त्यांनी विशेष प्रोत्साहन दिले. कारण शिक्षित स्त्री म्हणजे कुटुंब आणि समाजाचा पाया आहे असे त्यांना वाटे. सर्वांना शिक्षण मिळावे हेच त्यांचे ध्येय होते.

कर्मवीर भाऊराव पाटील हे खऱ्या अर्थाने जनशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन म्हणजे त्याग, सेवा आणि शिक्षणप्रती प्रेमाचा याचा संगम आहे. आपल्या शैक्षणिक कार्यातून त्यांनी दाखवून दिले की शिक्षणामुळेच समाजातील अंधार दूर होतो आणि माणूस स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो.

समाजहितासाठी आयुष्य वाहिलेल्या या महामानवाचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा या थोर महानवास त्यांच्या जयंती निमित्त त्रिवार अभिवादन.



सुमेघ रामचंद्र वानरे
(शिक्षक)
नॅशनल मिलिटरी स्कूल,
अकोला.
९१३००२१३८७

■ ■ ■

# देशात अब्जाधीशांना मोठे केले जात आहे

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :**
राज्यांची विकासनीती ही संविधानातील तत्त्वांच्या आधारे ठरत नाही. काही अब्जाधीशांना ठरवून मोठे केले जात आहेत. आर्थिक असमानता नष्ट करण्याची राजकीय इच्छाशक्ती नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी केले.

समाजवादी चळवळीच्या ९० वर्षपूर्तीनिमित्त पुण्यात तीन दिवसीय समाजवादी संमेलन सुरू आहे. दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात अध्यक्षस्थानी पाटकर होत्या.'विकासाच्या संकल्पनेपुढील आव्हाने आणि समाजवादी पर्याय' या विषयावर सत्र झाले.

यावेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अर्थतज्ज्ञ हितेश पोतदार, पर्यावरणतज्ञ सौम्य दत्त, किसान संघर्ष समितीच्या प्रदेशाध्यक्ष अँड. आराधना भार्गव यांनी मांडणी केली. लोकशक्ती अभियानचे संयोजक प्रफुल्ल सामंतरा यांनी सत्राचे सूत्रसंचालन केले.

' सामाजिक न्याय : जन आंदोलन आणि व्यवस्था परिवर्तन' या विषयावर दुसरे झाले. या सत्रात मधू मोहिते, निरंजन टकले, सुशीला मोराळे, रत्ना व्होरा सहभागी होते. अध्यक्षस्थानी माजी न्यायमूर्ती बी जी कोळसे पाटील होते.




आजच्या काळात विकास हा मंत्र झाला आहे. मात्र आर्थिक असमानता यालाच विकास म्हटले जात आहे. मणिपूरमधील हिंसाचार हा केवळ दोन समाजातील नसून त्याच्या मुळाशी विकास आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनसंपत्तीची नासधूस केली जात आहे, असेही पाटकर म्हणाल्या.

देशात गरीब गरीब आणि श्रीमंत श्रीमंत होत आहेत. गरिबी श्रीमंती हा मोठा भेद आहे. मात्र देशाचे पंतप्रधान हे बेशरमसारखे म्हणतात की, श्रीमंत होणे हे पाप नाही, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. राज्य आणि देशातील अनेक जागा ह्या अदानी, अंबानी यांच्या घशात घातल्या जात आहेत. समृद्धी महामार्ग उभारणीत 20 हजार कोटी रुपयांचा झालेला भ्रष्टाचार महाराष्ट्रातील पक्ष फोडण्यात आणि विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी वापरला आहे, अशीही टीका सपकाळ यांनी केली.

काँग्रेस आणि समाजवादी चळवळ यांचे पूर्वपरंपार संबंध आहेत. मात्र समाजवादी आणि काँग्रेसचे संबंध हे 'तुझे माझे जमेना, तुझ्या वाचून करमेना' असे राहिल्याचा टोला सपकाळ यांनी लगावला. देश संकटात आला तेव्हा समाजवादी चळवळीने देशाला सावरले. समाजवादी चळवळ मजबूत असती तर मोदी इतके वर्षे सलग सत्तेत राहिले नसते. सरकार पाडण्यात समाजवादी माहीर आहे, असे मत सुशीला मोराळे यांनी व्यक्त केले.

निरंजन टकले म्हणाले की, शाळेच्या अभ्यासक्रमातून खोटा आणि विखारी इतिहास शिकवला जातो. त्याविरोधात प्रतिकार करायला हवा. त्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक पळून जातील. विजयादशमी दिनी संघाला शंभर वर्षे होत आहेत. त्या दिवशी संघाचा रावण जाळला पाहिजे.

# नवरात्री निमित्ताने शिव महापुराण कथा व कीर्तन महोत्सव आज पासून

■ महासागर प्रतिनिधी,
पाटणसावंगी, दि. २१:

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने शिव महापुराण व भव्य कीर्तन महोत्सवाला आज पासून सुरुवात करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन मेस्को माता मंदिर समितीतर्फे मंदिर परिसरात दि. २२ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर पर्यंत करण्यात आले आहे.

१३ दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार आहे. २२ सप्टेंबर ला सकाळी ८ वा. मेस्को माता मंदिरात घट स्थापना होईल. दररोज सकाळी ५ ते ६ काकडा, सकाळी ७ महाआरती, दुपारी ९ ते १२ शिव महापुराण कथा, दुपारी १ ते ३ भजनाचा कार्यक्रम सायं. ४ ते ६ हरिपाठ सायं. ६ महाआरती, रात्री ८ ते ११ हरी कीर्तन राहणार आहे. बुधवार दि. १ ऑक्टोबर. ला दुपारी १२ वाजता घट विसर्जन निमित्ताने छ. शिवाजी महाराज चौक ते कोलार नदी पर्यंत कलश यात्रा काढण्यात येईल.

दररोज सकाळी ९ ते १२ शिव महापुराण कथा वाचन ह.भ.प. पंकज महाराज पवार, आळंदी यांच्या वाणीतून होणार आहे.



सोमवार दि. २२ सप्टेंबर. रात्री ८ वाजता ह.भ.प. नारायण महाराज पडोळे यांचे कीर्तन राहील. मंगळवार दि. २३ रात्री ८ वाजता. ह.भ.प. पंकज महाराज पवार यांचे कीर्तन., बुधवार दि. २४ रात्री ८ वाजता ह.भ.प. भगवान महाराज कोकरे, आळंदी यांचे कीर्तन, गुरुवार दि. २५ रात्री ८ वाजता ह.भ.प. बापूसाहेब महाराज देहूकर (जगतगुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज) , आळंदी यांचे कीर्तन, शुक्रवार दि. २६ रात्री ८ वाजता ह.भ.प. प्रकाश महाराज साठे, यांचे कीर्तन शनीवार दि. २७ रात्री ८ वाजता ह.भ. प. विलास महाराज गेजगे, परभणी यांचे कीर्तन, रवीवार दि. २८ रात्री ८ वाजता बाल कीर्तनकार ह.भ.प.चैतन्य महाराज राऊत, आळंदी यांचे कीर्तन, सोमवार दि. २९ रात्री ८ वाजता ह.भ.प. पद्माकर महाराज देशमुख, अमरावती यांचे कीर्तन, मंगळवार दि. ३० रात्री ८ वाजता ह.भ.प. धर्माचार्य नारायण महाराज शिंदे, पुसद यांचे कीर्तन, बुधवार दि. १ रात्री ८ वाजता ह.भ.प. भुषण महाराज शिंगारवाडे, आळंदी यांचे कीर्तन गुरुवार दि. २ रात्री ९ वाजता दसऱ्या निमित्त ह.भ.प. संतोष महाराज भालेराव यांचा भारूड चा कार्यक्रम शुक्रवार दि. ३ रात्री ८ वाजता ह.भ.प. गुरुवर्य अमृतस्वामी महाराज जोशी, बीड यांचे कीर्तन, शनीवार दि. ४ ला दुपारी २ ते ५ ह.भ.प. अमृतस्वामी महाराज जोशी यांचे दहिकल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर भाविकांना भव्य महाप्रसाद वितरीत करण्यात येईल. सोबतच सायंकाळी ७ ते १० श्री खाटू शाम बाबा यांच्या भजन संध्या हा कार्यक्रम होईल.

सोहळ्यासाठी भव्य मंडप टाकण्यात आला असून या सोहळ्याच्या निमित्ताने परिसरात तोरणे, विद्युत रोषणाई लावून सजावट करण्यात आली आहे. हजारो नागरिकांची उपस्थिती लाभणाऱ्या या सोहळ्यात मंदिर समिती तर्फे पिण्याचे पाणी, शौचालय, पार्किंग ची स्वतंत्र व्यवस्था केली आहे.

या शिवमहापुराण व भव्यकीर्तन महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वीज पडल्याने दुकानाला आग

## भांडेवाडीतील घटना : कापूस, रूई, गाद्याची राख

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

महानगर रिपोर्टर. आज सायंकाळी जोरदार विजांचा कडकडाट झाला. यात भांडेवाडी येथील पवनशक्तीनगरातील एका पिंजनालय दुकानाला आग लागली. सायंकाळी चार वाजताच्या सुमारास लागलेली ही आग अग्निशमन विभागाने आटोक्यात आणली. मात्र, दुकानातील कापूस, रुई, गाद्याची राखरांगोळी झाली.

आज दुपारी आकाशात ढग गोळा झाले.

त्याचवेळी पावसालाही सुरुवात झाली. सायंकाळीही आकाशात ढग व विजांचा कडकडाट सुरू होता. भांडेवाडीतील पवनशक्तीनगरात मोहम्मद इशाक यांचे गाद्या तयार करण्याचे दुकान आहे. या दुकानावर सायंकाळी चार वाजताच्या सुमारास वीज कोसळली. यात दुकानातील सिलाई मशीन, रुई मशीन, वजन काटा, गादी, कापड, ग्राहकांनी दिलेल्या गाद्या जळून राख झाल्या. आगीची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे जवान तत्काळ घटनास्थळी पोहोचले.

त्यांनी आगीवर पाण्याचा मारा करीत आग विझवली. मात्र सर्वच साहित्य जळून राख झाले.

# द ग्रेट योगासन स्पर्धा उत्साहात पार पडली





■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

द ग्रेट स्पोर्ट्स अकॅडमी, नागपूर यांच्या वतीने दक्षिण नागपूर येथील श्री महालक्ष्मी नगर, प्रभाग क्र. २९ येथील योगा भवनात ७ वी द ग्रेट योगासन स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे आयोजन सी. एच. तारेकर बहुद्देशीय संस्था व संस्कार बहुद्देशीय शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाला आमदार मोहन मते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली. यावेळी कामठी विधानसभा भारतीय जनता पक्ष निवडणूक प्रमुख अजय बोढारे, पिपळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नरेश भोयर, प्रभागाच्या नगरसेविका स्वाती चंद्रकांत आखतकर, संदेश खरे, सुनील राऊत, चंद्रशेखर गणोरकर , आयोजक चंद्रकांत तारेकर, संस्थेच्या अध्यक्षा वैशाली तारेकर, आसावरी प्रांजळे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी मान्यवरांची उपस्थिती लाभली. शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने स्पर्धेत सहभाग घेतला व विविध प्रकारच्या योगासन सादरीकरणातून सुवर्णपदक जिंकून यश संपादन केले.या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी राजश्री बुधे, प्रणाली कोठेकर, रोहन शेंडे, सोहम सातपुते, सिद्धेश खेरकर, ताशवी गोंडाने यांचे सहकार्य लाभले.

# लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीला २० वर्षाची शिक्षा

नागपूर, दि. २१: एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा गुन्हा सिद्ध झाल्याने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एच. ग्वालानी यांनी खोपडी (ता. मौदा) येथील लक्ष्मीकांत मुलचंद गेडाम (२७) यास २० वर्षाचा कारावास सुनावला.

पीडित मुलगी ही तिच्या घरी टीव्ही पहात असताना आरोपी लक्ष्मीकांत हा तिच्या घरात घुसला. मला तुझा लाड आला आहे असे बोलून त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. ही माहिती कुणालाही सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी मुलीच्या तक्रारीवरून कन्हान पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी लक्ष्मीकांत यास अटक केली.


कन्हानच्या सहायक निरीक्षक लक्ष्मी मलकुवर यांनी याप्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. न्यायालयात आरोपी लक्ष्मीकांतविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायाधीश ग्वालानी यांनी त्याला पोक्सो कायद्यान्वये २० वर्षाचा कारावास आणि ११ हजार रुपये दंड सुनावला. सरकारच्या वतीने सहायक सरकारी वकील दीपिका गवळी यांनी बाजू मांडली. पोलिस अंमलदार ईश्वर हुड यांनी सरकारी पक्षाला मदत केली.

# 'हिट अ‍ॅन्ड रन'मध्ये व्यवसायी जखमी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

भरधाव कारच्या चालकाने दुचाकीस्वार दोन व्यावसायिकांना जबर धडक दिली आणि पळून गेला. या अपघातात दोन्ही व्यवसायी गंभीर जखमी झाले. ही घटना शुक्रवारी रात्री जनता चौकात घडली. रमेश मेघराजमल पारवानी (५०) रा. ईडब्ल्यूएस कॉलनी, जरीपटका आणि ओमप्रकाश राजाराम सेवानी (४८) अशी जखमींची नावे आहेत.

शुक्रवारी रात्री रमेश आणि ओमप्रकाश औषध खरेदी करण्यासाठी जनता चौकात आले होते. औषध घेतल्यानंतर ते चहा पिण्यासाठी रामदासपेठेत जात होते.



जनता चौकाच्या वळणावर रहाटे कॉलनीकडे भरधाव जाणाऱ्या कार क्र. एमएच-१९/एएक्स-८४८ च्या चालकाने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. दोघेही वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाले. वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला. ओमप्रकाश यांच्या हात आणि पायाला गंभीर दुखापत झाली, तर रमेश यांचे दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले आहेत. त्यांना उपचारार्थ खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. ओमप्रकाश यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. मात्र अद्याप त्याच्याबाबत कोणतीही माहिती पोलिसांना मिळालेली नाही. ओमप्रकाश यांनी सांगितले की, कार चालक अत्यंत निष्काळजीपणे वाहन चालवत होता. धडक मारल्यानंतर तो काही अंतरावर जाऊन थांबला, मात्र गर्दी होताच त्याने पळ काढला. रमेश यांच्या दोन्ही पायांवर शस्त्रक्रीया करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. पोलिसांनी लवकरात लवकर कार चालकाला अटक करावी आणि त्याची वैद्यकीय तपासणीही करावी, अशी मागणी ओमप्रकाश यांनी केली आहे.

# दत्तनगरात एटीएम फोडण्याचा प्रयत्न

## सीसीटीव्हीत ५ आरोपी कैद; परिसरात भीतीचे सावट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

खापरखेडा पोलिस स्टेशन हद्दीत येणाऱ्या दत्तनगर परिसरात शनिवारी (दि.२०) पहाटे सव्वा चारच्या सुमारास स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) च्या एटीएम मशीनची तोडफफोड करून पैसे चोरण्याचा धाडसी प्रयत्न अज्ञात चोरट्यांनी केला.

मात्र मार्ग वर्दळीचा असल्याने त्यांचा डाव फसला. घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सीसीटीव्ही फुटेजनुसार चोरटे एका कारने आले होते. सर्वांचे चेहरे कापडाने झाकलेले होते. हातमोजे व साधनांचा वापर करून त्यांनी थेट एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न केला. एटीएम केंद्रात बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्यात ५ आरोपींच्या हालचाली स्पष्टपणे कैद झाल्या आहेत. मात्र चेहरे झाकलेले असल्याने त्यांची ओळख पटविण्यात पोलिसांना अडचण येत आहे.

तरीदेखील त्यांच्या हालचाली व चोरीची पद्धत यावरून तपास वेगाने सुरू आहे. या प्रकरणाची नोंद खापरखेडा पोलिस ठाण्यात करण्यात आली असून घटनेचा तपास गुन्हे शाखा युनिट ५चे पथकाकडून सुरू आहे. परिसरातील रस्ते व इतर सीसीटीव्ही तपासले जात असून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एटीएममधील रक्कम चोरीला गेली आहे का, याबाबत बँकेकडून माहिती घेतली जात असून अद्याप नेमकी रक्कम उघड झालेली नाही.

# कॅन्सर उपचारात एक महत्वपूर्ण उपलब्धी

## एओआय नांगिया स्पेशालिटी हॉस्पिटल, हॅल्सियन आणि ट्रूबीम रेडिएशन तंत्रज्ञानासह ब्रॅकीथेरपी सेवा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ : एओआय नांगिया स्पेशालिटी हॉस्पिटलने आज एओआय ऑन्कोलॉजी कॉन्क्लेव्ह २०२५ मध्ये आपली अत्याधुनिक ब्रॅकीथेरपी सेवा सुरू असल्याची घोषणा केली. हॅल्सियन आणि ट्रूबीम सारख्या प्रगत रेडिएशन मशीनसह आधीच सुसज्ज असलेल्या एओआय नांगिया स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अतिशय अचूक बाह्य बीम रेडिएशन थेरपी दिली जाते. ब्रॅकीथेरपी सेवा सुरू झाल्यामुळे, आता हॉस्पिटल रेडिएशन उपचारांची संपूर्ण सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत आहे. ब्रॅकीथेरपी रेडिएशन थेट देणे शक्य होते आणि आसपासच्या निरोगी ऊतींना होणारी हानी कमी होते. ही पद्धत गर्भाशय ग्रीवा, गर्भाशयाचा कॅन्सर, प्रोस्टेट



कॅन्सर, स्तन कॅन्सर आणि काही डोके व गळ्याच्या कॅन्सरसाठी अत्यंत प्रभावी आहे, तसेच ब्रॅकीथेरपीमुळे एकूण उपचाराचा कालावधी कमी होतो. दिलीप मांगसुली, चेअरमन, सीटीएसआय ग्रुप, म्हणाले: एओआय मध्ये आमचे ध्येय नेहमीच प्रगत कॅन्सर उपचार आणि परवडणारी सेवा यामधील अंतर कमी करण्याचे आहे. एओआय नांगिया स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ब्रॅकीथेरपीची सुरू करणे हे जागतिक दर्जाचे कॅन्सर उपचार सर्वांसाठी सुलभ आणि सहानुभूतिशील बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. महेश नांगिया, प्रमोटर, नांगिया स्पेशालिटी हॉस्पि .सहानुभूतिशील सेवा आणि प्रत्येक रुग्ण व कुटुंबासाठी आशा निर्माण करणे आहे. डॉ. हृषिकेश फाटे, झोनल डायरेक्टर -महाराष्ट्र आणि छत्तीसगड, यांनी सांगितले: ब्रॅकीथेरपीच्या सुरुवातीसह, एओआय नांगिया स्पेशालिटी हॉस्पिटल आता एकाच ठिकाणी संपूर्ण रेडिएशन थेरपीची सेवा उपलब्ध करून देते. रेडिएशन ऑन्कोलॉजी टीमचे डॉ. चांदनी होतवानी, डॉ. मनीष माथनकर आणि डॉ. आशिष भांगे यांनी सांगितले, हॅल्सियन आणि ट्रूबीम तंत्रज्ञानामुळे अचूक बाह्य रेडिएशन उपचार शक्य झाले आहेत .डॉ. रामाकांत तायडे, सिनियर सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट, म्हणाले:कॅन्सर उपचारात शस्त्रक्रियेबरोबर रेडिएशन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ.सत्यम सत्यार्थ आणि डॉ. प्रसन्ना देशमुख, मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट, ने म्हटल की:ब्रॅकीथेरपीसारख्या नवकल्पना केमोथेरपी, टार्गेटेड थेरपी आणि इम्युनोथेरपीसारख्या प्रणालीगत उपचारांसोबत अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

त्यावेळी उपस्थित डॉ.शैलेश बांबोर्डे, बीएमटी स्पेशालिस्ट, डॉ. रोहित काकडे, कन्सल्टंट न्यूक्लियर मेडिसिन, एओआय कॅन्सरचा शोध आणि उपचार दोन्हीमध्ये अतुलनीय अचूकता देते, ज्यामुळे रुग्णाच्या आरोग्यात खरी सुधारणा होते.

# मिशन रेबीज अंतर्गत १०,६५४ श्वानांचे लसीकरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

नागपूर महानगरपालिकेतर्फे शहराला रेबीजमुक्त करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'मिशन रेबीज' हा उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत मागील २० दिवसांत १०,६५४ हून अधिक भटक्या श्वानांचे लसीकरण करण्यात आले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या देखरेखीखाली हा उपक्रम राबवला जात आहे. डब्ल्यूबीपी होप मिशन रेबीज, निर्मिती पीपल अँड ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांच्या सहकार्याने शहरात सामूहिक श्वान लसीकरण मोहीम सुरू आहे.

शहरातील भटक्या जनावरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भांडेवाडी, गोरेवाडा आणि महाराजबाग येथे प्राणी जन्म नियंत्रण केंद्र तयार करण्यात आले आहेत. गेल्या तीन वर्षांत या तीन केंद्रांवर ५६,९९७ कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले आहे. या केंद्रांमध्ये आधुनिक श्वान निवारा केंद्र आणि प्राणी निर्बीजीकरण केंद्र देखील उभारले गेले आहे.अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त श्री. राजेश भगत आणि मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांनी दिली.आजारी, अपघातग्रस्त, पिसाळलेली किंवा चावा घेणाऱ्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी प्रत्येक झोनमध्ये विशेष वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे लसीकरण मोहिमेला गती मिळत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे शहरात भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यास आणि त्यांना रेबीजपासून सुरक्षित ठेवण्यास मदत होत आहे.

# पोलिस पाटील स्वतंत्र कार्यालयापासून वंचित

# शासन निर्णय असूनही अंमलबजावणी नाही

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये पोलिस पाटील यांना स्वतंत्र कार्यालय (खोली) उपलब्ध करून देण्याचा शासन निर्णय २०१२ साली महाराष्ट्र शासनाने घेतला होता. या निर्णयानुसार नवीन ग्रामपंचायत इमारतीत दोन खोल्या अनिवार्य राखीव ठेवण्याचे निर्देश होते. त्यापैकी एक खोली महसूल अधिकाऱ्यांसाठी तर दुसरी खोली पोलिस पाटील यांच्यासाठी राखीव ठेवण्याचे स्पष्ट आदेश होते. मात्र २०२५ पर्यंतही या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने पोलिस पाटील यांना स्वतंत्र कार्यालयापासून वंचित राहावे लागत आहे.

गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस पाटील नेहमी सक्रिय असतात. महाराष्ट्र ग्राम पोलिस अधिनियम १९६७ अंतर्गत त्यांची नियुक्ती केली जाते. महसूल व पोलिस विभागाशी निगडित कर्तव्ये ते प्रामाणिकपणे पार पाडतात. परंतु त्यांच्याकडे कार्यालयीन सुविधा नसल्यामुळे सर्व पत्रव्यवहार, अहवाल, भेट-पुस्तक, आवक-जावक नोंदी यासारखे काम घरूनच करावे लागते. घटनास्थळी किंवा गावातील विविध प्रकरणांत ते थेट सहभाग नोंदवतात, तरीही त्यांना ग्रामपंचायतीत जागा मिळत नाही.

नागपूर ग्रामीण तालुक्यातील पोलिस पाटील सोनेगाव निपाणीचे विर्जेद्र कामडे,दवलामेटीचे पंकज ढोके, लाव्हाचे जया कानफाडे यांनी २३ मे २०२५ मध्ये एकत्रितपणे उपविभागीय अधिकारी ग्रामपंचायतमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यासाठी निवेदन सादर केला होते. उपविभागीय अधिकारी यांनी पंचायत समितीला याबाबत पत्र पाठविल्याचे सांगितले जाते. यापूर्वीही फेब्रुवारी २०२३ मध्ये गाव कामगार संघ तर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते. त्यावर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेशी पत्रव्यवहार करून पंचायत समितीकडे कार्यवाहीसाठी निर्देश दिले होते. मात्र वारंवार पत्रव्यवहार होऊनही शासन निर्णयाची अंमलबजावणी पंचायत समिती स्तरावर होत नसल्याचे चित्र दिसत आहे. पोलिस पाटील यांना स्वतंत्र कार्यालय मिळावे ही त्यांची जुनी मागणी असली तरी शासन निर्णय असूनही स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आजही ती मागणी प्रलंबित राहिली आहे.

### प्रतिक्रिया



अनिल भुयार
दवलामेटी

शासनाने २०१२ मध्ये घेतलेला निर्णय तातडीने अंमलात आणला पाहिजे. या विषयी महसुल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांना ५ ऑगस्ट २०२५ रोजी निवेदन दिले आहे. परंतु अजुनपर्यंत कुठलीही कारवाई झालेली नाही.

गावातील घटना घडल्या की पोलिस पाटील लगेच धाव घेतात. त्यांना ग्रामपंचायतीत स्वतंत्र जागा दिली तर त्यांचे काम अधिक प्रभावी होईल. गावकऱ्यांच्या दृष्टीनेही ते सोयीचे ठरेल.



ज्योत्सना नितनवरे
सरपंच, लाव्हा

शासन निर्णय आम्हालाही माहित आहे. पण पंचायत समितीकडून कोणताही ठोस आदेश आमच्याकडे आलेला नाही. आदेश आले तर नक्कीच पोलिस पाटलांना स्वतंत्र खोली देण्यात येईल.



विर्जेद्र कामडे
पोलिस पाटील
सोनेगाव
(निपाणी)

गावात कायदा व सुव्यवस्था राखताना आम्ही नेहमी अग्रस्थानी असतो.

पण स्वतःचं कार्यालय नसल्याने सर्व कामे घरीच करावी लागतात.

# निशुल्क आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीराचे आयोजन

नागपूर :-भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्य भाजपा वैद्यकीय आघाडी व अभिनंदन बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने खरबी येथे निशुल्क आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.शिबिरामध्ये १२० नागरिकांची आरोग्य तपासणी करून मोफत औषध वितरित करण्यात आले.

त्यामध्ये ६० लोकांची नेत्र तपासणी, रक्त, मधुमेह, रक्तदाब तपासणी मोफत करण्यात आले. काही गरजू २५ नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.सोबतच साईनाथ रकतपेढी यांनी रक्तदान करणाऱ्या लोकांना प्रमाणपत्र व भेट वस्तू दिले. रक्तदान ६० लोकांनी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

शिबिराचे उद्घाटन माजी जि.प.सदस्य सुभाष गुजरकर यांनी केले तर प्रमुख पाहुणे भाजपा अध्यक्ष बालू घोडमारे, भाजपा महामंत्री शुभांगी गायधने होते तर प्रमुख उपस्थिती माजी सरपंच पुष्पा गायधने, बहादुरा भाजप अध्यक्ष नरेंद्र नांदुरकर,राजकुमार वंजारी,भाजपा वैद्यकीय आघाडी अध्यक्ष डॉ.अवध द्विवेदी,एजाज घानिवाला, युवा मोर्चा अध्यक्ष शुभम माकडे,नितीन शेळके, विशाल सिमले, वनिता उरकूडकर, माधुरी कांबळे, विश्वजीत नाईक उपस्थित होते. शिबिरात वैद्यकीय सेवेसाठी रिलायबल हॉस्पिटल चे डॉ. सचिन जिभकाटे, डॉ.संजय भाजीपाले, डॉ.अमित श्रावणकर, डॉ.अवध द्विवेदी, डॉ.देवेंद्र बेलखोडे,डॉ. उमेश मिश्रा डॉ.आदिनाथ मुंडे, अभिनंदन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रा.राम कावडकर व रक्तपेढी, नेत्र



तपासणी चमू व नागरिक मोठ्या संख्याने उपस्थित होते.संचालन डॉ देवेंद्र बेलखोडे तर आभार डॉ अवध द्विवेदी यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी व भाजपा कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

# : नवरात्र आणि स्त्रीशक्ती :

# समानता नव्हे, आत्मस्वीकाराचा उत्सव

आश्विन नवरात्राचा शुभारंभ पुन्हा एकदा स्त्रीशक्तीच्या उपासनेचा संदेश घेऊन आला आहे. नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची आराधना ही केवळ धार्मिक आस्था नव्हे, तर समाजातील त्या चेतनेचा उत्सव आहे जी स्त्रीच्या अंतर्मनातील सामर्थ्य आणि शक्तीला जागृत करण्याची प्रेरणा देते.

**स्त्री असमान नाही, असामान्य आहे**

समाजातील विडंबना अशी की आजही स्त्रीला समानतेच्या अधिकारासाठी झगडावे लागते. पण सत्य हे आहे की स्त्री असमान नाही, तर असामान्य आहे. त्याग, सृजन आणि सहनशीलतेची धुरी तीच आहे. पुरुष श्रेष्ठ नसतानाही स्वतःला श्रेष्ठ समजतो, आणि हेच स्त्रीचे दुर्दैव की ती त्याला मान्यता देते.

प्रत्यक्षात पुरुष हा मानवी जीवनातील फक्त बीज आहे. त्याच्याशिवाय सृष्टी अपुरी आहे, परंतु स्त्रीशिवाय तो वादळी समुद्रात पतवारविरहित नावेसारखा आहे.

**नवरात्र : शक्तीचा आत्मबोध**

नवरात्रीचा सण शिकवतो की शक्ती बाहेर नाही, ती स्त्रीच्या अंतःकरणात दडलेली आहे. आई दुर्गेचे नऊ रूप स्त्रीला स्मरण करून देतात की तिला समानता सिद्ध करण्याची आवश्यकता नाही, कारण पुरुष स्वतः तिच्याविना अपूर्ण आहे. ज्या पुरुषाला ती श्रेष्ठ मानते, तो तर तिच्या कुशीत वाढूनच श्रेष्ठ ठरतो.

**समाज व राजकारणातील स्त्रीची भूमिका**

आज महिला आरक्षण विधेयकापासून शिक्षण, राजकारण आणि सार्वजनिक जीवनापर्यंत स्त्रियांचा सहभाग वाढत आहे. ग्रामपंचायतपासून संसद भवनापर्यंत स्त्रियांची उपस्थिती लक्षणीय होत चालली आहे. मात्र ही कष्टाने मिळवलेली उपलब्धी आहे, नैसर्गिक मान्यता नव्हे. नवरात्राचा खरा संदेश हाच आहे की मान्यता बाहेरून मिळत नाही, तर स्त्रीने स्वतःची शक्ती स्वीकारली पाहिजे.

**समानतेपेक्षा आत्मविश्वासाची गरज**

बरोबरीचा प्रश्न तोपर्यंत टिकून राहील, जोपर्यंत स्त्री स्वतःला सिद्ध करण्यात आपली ऊर्जा खर्च करत राहील. ज्या दिवशी ती स्वतःचे सामर्थ्य जाणेल, त्या दिवशी हा प्रश्नच गौण ठरेल की कोण मोठे आणि कोण लहान.

स्त्री आणि पुरुष हे दोन नसून एकाच प्रवाहाच्या दोन काठांसारखे आहेत, जे एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. समानतेची अवाजवी मागणी करताना स्त्री विसरते की पुरुष तिच्याविना देखील मोहताज आहे.

**इतिहास आणि परंपरेतून प्रेरणा**

आपल्या परंपरेत स्त्रीशक्तीच्या पूजेची असंख्य उदाहरणे आहेत. काली, दुर्गा, सरस्वती यांसारखी आदर्श रूपे ही केवळ देवी नव्हेत, तर समाजाला मिळणारे संदेश आहेत की ज्ञान, शक्ती आणि समृद्धीचे मूळ स्त्री आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता जिजाबाईंचे उदाहरण दैदीप्यमान आहे, ज्यांनी मातृत्वाला राष्ट्रनिर्मितीची शक्ती बनवली.

**ओळख आपली, मान्यता आपली**

समानतेचा गजर पुरुषाने कधीच केला नाही, कारण तो जाणतो की स्त्रीशिवाय तो अर्धाच आहे. तरीही स्त्री पुन्हा पुन्हा स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करते, जणू सूर्याकडे रोज उजेड दाखवते. जर खरोखर तोलमोल झाले, तर तराजू नेहमी स्त्रीच्या बाजूने झुकेल. हा उत्सव शिकवतो की स्त्रीशक्तीला ना समानता सिद्ध करण्याची गरज आहे, ना कोणाकडून मान्यता घेण्याची. तिचे सामर्थ्य, तिचा त्याग आणि तिचे सृजन हीच तिची अमर ओळख आहे.

■ ■ ■



डॉ. प्रवीण डबली
वरिष्ठ पत्रकार, नागपूर.
9422125656
7020343428

# पीपल्स रिपब्लिकन पार्टी साजरा करणार 'युवा चेतना दिन'

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ : भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी भारतातील पहिला असा ऐतिहासीक लाँगमार्च काढणारे आंबेडकरी -रिपब्लिकन चळवळीतील युवा नेते, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच तसेच महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप भाई कवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी २३ सप्टेंबरला 'युवा चेतना दिन' साजरा केला जाणार आहे. 'युवा चेतना दिन'निमित्त पीपल्स रिपब्लिकन पार्टी, रिपब्लिकन युथ फोर्स, रमाई महिला ब्रिगेड,दलित मुक्ती सेना, राष्ट्रीय मजदुर सेना, राष्ट्रीय विद्यार्थी सेने तर्फे राज्यभरात विविध अनाथालय, रुग्णालयात फळवाटप कार्यक्रमांचे आयोजन राज्यात करण्यात आले आहे. तसेच नागपुरातील सर्व विधानसभा मतदार संघात रक्तदान शिबीरे आयोजित करण्यात आल्याची माहिती पीरिपा प्रदेश संघटक कपील लिंगायत यांनी दिली. देशातील आंबेडकरी, बहुजन, अल्पसंख्याक, आदिवासी, वंचित घटकातील युवकांमध्ये संघर्षरुपी स्फूर्ती व एकजुटीची भावना निर्माण करून त्यांना संविधानाच्या संरक्षणार्थ लढण्यास प्रेरित करणाऱ्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे लाडके युवा नेते भाई जयदीप जोगेंद्र कवाडे हे ४२ व्या वर्षात पदार्पण करणार आहेत. देशभरात पीरिपा 'युवा चेतना दिन' म्हणून साजरा करणार असल्याचेही लिंगायत म्हणाले. नागपुरातील आनंद नगरातील पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या मुख्यालयात मंगळवारी सायंकाळी ५ वाजता भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तत्पूर्वी महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका 'भीमराज की बेटी फेम' पंचशीलाताई भालेराव यांच्या भीम गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला लॉगमार्च प्रणेते, भीमसैनिकांचे सरसेनापती, आंबेडकरी आंदोलनातील क्रांतियोद्धा, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे सर यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र प्रदेश संघटक कपिल लिंगायत, प्रतिमा जयदीप कवाडे, प्रदेश उपाध्यक्ष मृणाल गोस्वामी, विदर्भ प्रदेश अध्यक्ष मा. विजय पाटील, नागपूर शहर अध्यक्ष मा. कैलाश बांबोले, नागपूर जिल्हा अध्यक्ष नरेंद्र डोंगरे, विदर्भ प्रदेश संघटक अंकित धुपे, नागपूर जिल्हा युवा आघाडी अध्यक्ष पलाश ठवरे, शहर महिला आघाडी अध्यक्षा प्रतिभा मानवटकर, शहर युवा आघाडी अध्यक्ष सोहेल खान, पूर्व विदर्भ सचिव डेनी सोमंकुवर, महिला आघाडी अध्यक्षा सूचिता कोटांगले, ग्रामीण महिला आघाडी अध्यक्ष सुनीता शेंडे, उत्तर नागपूर अध्यक्ष कुंदन उके, तसेच अजय चव्हाण, दिलीप पाटील, सोपान मानवटकर, शितल बोरकर, संजय खांडेकर यांच्यासह शेकडो पदाधिकारी, महिला व युवक कार्यकर्ते प्रयत्नरत आहेत.

# आदिशक्ती जगदंबा



सौ. माधवी पत्की
मानेवाडा, नागपूर.
7709813676

अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नवरात्रीला शारदीय नवरात्र म्हणतात. या काळात आदिशक्ती जगदंबेची उपासना, पूजा, अर्चना, भक्ती केली जाते. नवरात्रात शक्तीच्या नऊ रूपांची पूजा दिवसा सुरू करून रात्रीपर्यंत केली जाते.

नवरात्रीतून साधकाच्या तंत्र साधनेने संपन्न होणाऱ्या नवदुर्गा याच काळात येतात.

दुर्गेचे तंत्रज्ञान वैदिक काळापासून आहे. ऐन युद्धप्रसंगी श्रीकृष्णाने अर्जुनाला देवी साधना करायला सांगितले होते. नवरात्रीत नऊ दिवस अखंड तेवणाऱ्या नंदादीपाच्या साक्षीने ही शक्तीची साधना करायची असते. आदिशक्ती, आदिमाया, जगदंबा म्हणजेच 'शक्ती', सामर्थ, पराक्रम, प्राण हे शक्ती शब्दाचे प्रमुख अर्थ आहेत.

प्रत्येक पदार्थांमध्ये कार्य उत्पादनाला उपयोगी आणि कधीही त्या पदार्थापासून वेगळा न राहणारा असा जो विशिष्ट धर्म असतो त्याला 'शक्ती 'असे म्हणतात. उदाहरणार्थ अग्नी हा शक्तिमान आणि दाहकता ही त्याची शक्ती होय. पदार्थ अनंत आहेत व त्यामुळे शक्तीही अनंत आहेत.

**शक्तीचे दैवीकरण**

प्रत्येक देवामध्ये असलेल्या शक्तीला दैवताचे रूप दिले जाऊन त्या शक्ती रूपाला देवी म्हणू लागले. शाक्त सांप्रदाय लोकांनी तिचा आदिमाया, जगदंबा या नावांनी आदर केला. सर्वसामान्य लोकही शक्तीला आई या स्वरूपातच पाहतात. ब्रह्मा, विष्णू, महेश आदी देवांसह सर्व देवांशी जगदंबेचा संबंध पोहोचतो.

**देवीची उत्पत्ती**

प्रत्येक देवीचा भक्त आपलीच देवी सर्वश्रेष्ठ आहे व तिच्यापासून सर्व देवी उत्पन्न झाल्या आहेत असे मानतो. उदाहरणार्थ दुर्गा सप्तशतीनुसार महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती ही दुर्गेची प्रमुख रूपे आहेत. तर महिषासुरमर्दिनी ही देवी ब्रम्हा, विष्णू, महेश यांच्या संघटित शक्तीतून निर्माण झाली, असे मत्स्यपुराणात म्हटले असून, ती सर्व देवांच्या अंशापासून उत्पन्न झाली असे मार्कंडेय पुराणात सांगितले आहे.

**देवांच्या संदभार्तील शक्ती**

ब्रह्मदेवांशी संबंधित शक्ती – ब्रह्मणी सरस्वती
विष्णूशी संबंधित शक्ती – लक्ष्मी
शिवाशी संबंधित शक्ती – पार्वती
तर गणपतीशी संबंधित शक्ती – शारदा आहे.
सर्व देवांची निरनिराळी शक्ती त्यांच्यासह कार्यरत असते.

**शक्तीची उपासना**

वरील सर्व शक्तींची उपासना अश्विन प्रतिपदेपासून म्हणजे शारदीय नवरात्रात केली जाते. प्रतिपदेच्या दिवशी घटस्थापना करून नऊ दिवस रोज एक फुलांची माळ चढविली जाते. तसेच नऊ दिवस अखंड नंदादीप देवत ठेवतात. नऊ दिवस कुमारीका पूजन केले जाते. नवमीच्या दिवशी सांगता केली जाते. त्या दिवशी वडा - पुरणाचा देवीला नैवेद्य असतो.

या जोडीला काही ठिकाणी गरबा, दांडिया तर काही ठिकाणी देवीचा गोंधळ ,घागरी फुंकणे, कुंकूमार्चन अशा विविध पद्धतीने उपासना करतात. नऊ दिवस सगळीकडे अंबाबाईचा उदो उदो हेच शब्द कानी पडत असतात. सर्वत्र शक्तीचे चैतन्य असते.

**शक्तीची साडेतीन पीठे**

अशा या शक्तीची साडेतीन पीठे महाराष्ट्रात आहेत. कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी, माहूरची रेणुका माता आणि वणीची सप्तशृंगी माता.

**कोल्हापूरची महालक्ष्मी**

हे अत्यंत जागृत पीठ आहे. सर्वांची पालनकर्ती, उद्धारकर्ती आणि नवसाला पावणारी देवता म्हणून ती प्रसिद्ध आहे. देवीची मूर्ती रत्न शिलेची असून त्यामध्ये हरिका खंड मिश्रित द्रव्य आहे. मूर्ती साळुंकेच्या आकाराप्रमाणे असून उजव्या हातात महाळुंग व डाव्या हातात पानपात्र आहे. हे मंदिर पश्चिमाभिमुख असून सभोवती भव्य तटबंदी आहे. चारही बाजूस दरवाजे आहेत.

मंदिरांचे बांधकाम हेमाडपंथी पद्धतीचे आहे. मंदिरास पाच शिखरे असून मंदिराच्या आवारात सात दिपमाळा व पाच प्रमुख मंदिरे आहेत. नवरात्रात घटस्थापना झाल्यानंतर तोफेची सलामी दिली जाते .देवीला मौल्यवान जडजवाहिरे आणि सोन्याच्या दागिन्यांनी मढविले जाते.

अष्टमीला देवीचा जागर असतो. या दिवशी देवीनिद्रा घेत नाही. खूप मोठ्या प्रमाणावर नवरात्र उत्सव साजरा केला जातो.

**तुळजापूरची तुळजाभवानी**

तुळजाभवानी अनंत युगाची जननी म्हणून समर्थ रामदास स्वामींनी प्रार्थिलेली श्रीतुळजाभवानी ही महाराष्ट्रातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान व कुलदैवत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी भवानी मातेच्या आशीवार्दानेच हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेला प्रारंभ केला. म्हणून या देवीचे ऐतिहासिक दृष्टया एक आगळे स्थान आहे. शांती, आनंद देणाऱ्या तसेच भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणाऱ्या आणि त्यांचे रक्षण करणाऱ्या भवानी मातेचा उत्सव मोठ्या प्रमाणात दरवर्षी साजरा होतो.

नैसर्गिक संपदा लाभलेल्या या देवस्थानाची रचना अत्यंत रेखीव आहे. गाभाऱ्यात चांदीच्या सिंहासनावर भवानी मातेची मूर्ती विराजमान आहे. अष्टभुजा देवीने आपल्या सहा हातात आयुधे धारण केलेली आहे. एका हातात तिने महिषासुराची शेंडी धरली आहे तर एका हाताने त्याच्या ह्रदयात त्रिशूल रोवला आहे .मातेच्या चरणांखाली रेड्याचे धड आहे. माऊलीच्या उजव्या बाजूला देवीचे वाहन असलेला सिंह उभा आहे.

जवळच मार्कंड ऋषी पुराण सांगत आहेत अशी प्रतिमा आहे. भाद्रपद वद्य अष्टमीला सूर्यास्ता समयी देवीमाता सिंहासनावरून खाली उतरून पलंगावर शयन करते. आश्विन शुद्ध प्रतिपदेला झोपेतून उठून माऊली पुन्हा सिंहासना आरुढ होते.

नवरात्रात सगळीकडे हळदी- कुंकवाचे सडे घातले जातात. नऊ दिवस मातेची महापूजा केली जाते. यावेळी मातेला भरजरी शालू आणि सुवर्ण अलंकार घातले जातात. यावेळी देवीचे रूप अत्यंत देखणे दिसते.अंबाबाईचा उदो उदो अशा गर्जनांनी आसमंत दुमदुमून जातो. दसऱ्याला देवी सिमोल्लंघनाला निघते.

**माहूरची रेणुका देवी**

माहूरच्या गडावरील मंदिरात केवळ तांदळा (शीर) असलेली रेणुका माता एका मोठ्या चबुतऱ्यावर विराजमान आहे. इथेही नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. इथे देवीला तांबूलाचे (पानांचा विडा) महत्व आहे.

**वणीची सप्तशृंगी**

नाशिक जवळ वणी येथील गडावर सप्तशृंगी माता आपल्या देखण्या लावण्यासह विराजमान आहे. ही देवी पहाडात कोरलेली आहे. हिला १६ हात आहेत. समोरच मोठा सभामंडप आहे.

सभामंडपातून कुठल्याही बाजूने देवीचे पूर्ण दर्शन होते. कोणत्याही बाजूने बघितल्यास ती आपल्याकडेच बघत असल्यासारखे जाणवते. नवरात्रात मोठा उत्सव साजरा होतो .

अशा प्रकारे आई जगदंबेचा म्हणजेच शक्तीचा जागर नवरात्रात मोठ्या भक्ती भावाने साजरा केला जातो. अशी ही आपली रक्षणकर्ती माता विजयादशमीच्या दिवशी सिमोल्लंघनाला निघते.

# श्रद्धेचा दीप आणि स्त्रीशक्तीचा जागर

भारताचा प्रत्येक सण हा केवळ आनंदाचा क्षण नसतो, तर तो आपल्याला जीवन जगण्याची नवी दिशा देतो. नवरात्रोत्सव हा त्यापैकीच एक महत्त्वाचा उत्सव. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून घटस्थापनेने या उत्सवाची सुरुवात होते. त्या क्षणी प्रत्येक घरात, प्रत्येक अंतःकरणात एक नवी उर्जा, एक नवा प्रकाश जागतो.

-----------------------------

घटस्थापना हा हिंदू धर्मातील एक विधी आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा या तिथीला स्वरूप घडा किंवा कलश याच्या ठिकाणी देवीची स्थापना केली जाते आणि याचे नऊ दिवस पूजन केले जाते. ताटात गंगाजलाने भरलेला कलश ठेवून आणि त्यात नाणी, सुपारी आणि कच्चा तांदूळ आणि हळद पावडर पासून तयार केलेले अक्षत भरतात. त्यावर आंब्याची पाच पाने आणि एक नारळ घालतात. शेवटी माँ शैलपुत्री आणि माँ दुर्गा यांची पूजा करतात आणि तेलाचा दिवा, अगरबत्ती, फुले, फळे, मिठाई आणि देशी तुपाचा विशेष भोग लावतात.

आश्विन महिन्यात घटामध्ये देवीची स्थापना करून, नंदादीप प्रज्वलित करून आदिमायेची नऊ दिवस मनोभावे पूजा करणे, म्हणजेच घटस्थापना किंवा नवरात्रोत्सव. घटस्थापना दरम्यान लोक कलशात पवित्र पाणी भरतात. त्यानंतर कलशावर शेणाचा लेप केला जातो आणि त्यात बार्लीच्या बिया पेरल्या जातात. नंतर ते वाळूच्या खड्डयात ठेवले जाते.

कलश हिंदू विधींमध्ये खोल प्रतीकात्मकता धारण करतो, विपुलता, समृद्धी, आध्यात्मिक शुद्धतेचे प्रतिनिधित्व करतो. हे गंगा नदीच्या पाण्याने भरलेले आहे, जे जीवन टिकवून ठेवणाऱ्या दैवी उर्जेचे प्रतीक आहे. ते दैवी पात्र म्हणून पूजनीय आहे आणि समारंभांमध्ये तांदळाच्या पलंगावर ठेवले जाते.

जेव्हा आपण मातीत बी पेरतो, तेव्हा ती छोटीशी हिरवी कोंब दिसण्यासाठी आपल्या डोळ्यांत किती प्रेम असतं! घटस्थापनेतले हे धान्य फक्त अन्नधान्याचे प्रतीक नसते, तर जीवनातील नव्या उमेदिचे, नव्या स्वप्नांचे आणि नव्या विश्वासाचे प्रतीक असते. कलशातील पाणी आपल्याला सांगते जीवन सतत वाहतं, अडथळे आले तरी थांबत नाही आणि नारळ आपल्याला आठवण करून देतो, कणखर आवरणातही गोडवा दडलेला असतो.

नवरात्रीत आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. परंतु ती देवी केवळ आकाशातील एखादी मूर्ती नसते, ती आपल्याजवळच असते–आपली आई, बहीण, पत्नी, मुलगी, शिक्षिका, कामगार स्त्री. तिच्या त्यागातून, तिच्या कष्टातून आणि तिच्या प्रेमातूनच ख ?्या शक्तीचा उगम होतो. घटस्थापना आपल्याला शिकवते की ज्या हातांनी संसार उभा राहतो, ज्या ह्रदयाने संसार सांभाळला जातो, त्याच हातांना, त्याच ह्रदयाला आपण वंदन करायला हवे.

नवरात्रीच्या रात्री गावोगावी होणारे जागर, भजनी मंडळींचे सूर, दांडिया-गरब्याची तालबद्ध पावलं–हे सगळं एकच सांगतं, की माणूस एकटा आनंद शोधू शकत नाही. आनंद तेव्हाच खरा जेव्हा तो सामायिक केला जातो. देवीसमोर बसून केलेली सामूहिक आरती,



डोळ्यांत चमकणारी श्रद्धा हीच एकात्मतेची मूर्ती आहे.

आज समाजात तणाव, भेदभाव, हिंसा वाढत चालली आहे. अशावेळी घटस्थापनेतून मिळणारा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो जसे धान्य मातीमध्ये पेरले की अंकुर फुटतो, तसेच प्रेम पेरले तर समाजात सौहार्द अंकुरतो. नवरात्रोत्सवाने आपण केवळ देवीची पूजा न करता, प्रत्येक स्त्रीला सन्मान द्यावा, प्रत्येक दुर्बलाला आधार द्यावा, हेच या सणाचे खरे पालन आहे.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

नवरात्रीचे उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळे असतात आणि विशिष्ट संस्कार क्षेत्रांमध्ये भिन्न असतात, जरी त्यांना समान म्हटले जाते आणि एकाच देवतेला समर्पित केले जाते. सर्वात सामान्य उत्सव नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेने सुरू होतो, ज्याचा शाब्दिक अर्थ भांडगे चढवणे असा होतो. घटस्थापना पूजेचे महत्त्व आणि महत्त्व हे जीवनाच्या सर्व क्षेत्रात देवीचे सामर्थ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. या व्यतिरिक्त हा चांगला आणि वाईट यांच्यातील लढाईच्या प्रारंभाचा उत्सव आहे. संपूर्ण सणात कलशाची पूजा केली जाते त्यानंतर दहाव्या दिवशी किंवा विजयादशमीला कलश विसर्जन केले जाते.

महाराष्ट्रात नवरात्रीची ही पोकळी भरून काढण्यासाठी, प्रबोधनकार, बोले आणि इतरांनी नवरात्र हा जनसामान्यांचा उत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली, प्रबोधनकारांनी शिवाजी महाराजांनी पूजलेल्या तुळजापूरच्या भवानीला महाराष्ट्राचे प्रमुख दैवत म्हणून धारण केले. हिंदूंना जातीपातीच्या ओलांडून एकत्र आणण्याची कल्पना होती.



त्यांच्या चरित्रात, प्रबोधनकार असा दावा करतात की, शिवाजी महाराजांच्या काळात जरी नवरात्र साजरी केली जात असली तरी पुण्यातील ब्राह्मण पेशव्यांच्या काळात गणेशपूजेला प्राधान्य मिळाले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी नंतर सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून गणेश उपासना परंपरेचे पुनरुज्जीवन केले. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा हा नवरात्र उत्सवासाठी प्रसिद्ध आहे. उत्सवा दरम्यान शहर दिव्यांनी सजवले जाते आणि अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

नवरात्र हे साधारणपणे नऊ दिवसांचे असते पण तिथीचा क्षय झाल्याने ती आठ दिवसांची किंवा वृद्धी झाल्यास दहा दिवसांची असू शकते. चंपाषष्ठीची म्हणजे खंडोबाची नवरात्र फक्त सहा दिवसांचे असते. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवतीकरण होऊन त्या शक्तिरूप मूर्तीला देवी असे नाव मिळाले आणि शाक्त संप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले.

देवीची उग्र व सौम्य अशी दोन रूपे पहायला मिळतात. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही देवीच्या सौम्य रूपांची नावे असून दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही देवीची उग्र रूपे आहेत. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी, कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री अशी ही देवीची नऊ रूपे आहेत. मार्कंर्डेय पुराणातील देवी माहात्म्यात सांगितले आहे ह्लशरद ऋतूतील वार्षिक महापूजेत देवीमाहात्म्य भक्तिपूर्वक ऐकल्यास सर्व बंधनांपासून व्यक्ती मुक्त होते आणि धनधान्याने परिपूर्ण होते.

नवरात्र हा ऋतू परिवर्तनाचा काल असतो. यामुळे आपल्या नवीन शक्ती, नवा उत्साह, उमेद निर्माण होत असते. बृहत संहितेनुसार सूर्य तसेच इतर ग्रहांमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा प्रभाव मनुष्याच्या आरोग्यावर आणि व्यवहारांवर होत असतो. सृष्टीतील परिवर्तन हा शक्तीचाच खेळ आहे. ब्रह्मचर्य, संयम, उपासना, यज्ञ केल्याने शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढते. स्मरणशक्ती चांगली होऊन बौद्धिक विकास होतो. म्हणून नवरात्र हा शारिरिक व आत्मिक शुद्धतेचा काळ मानतात.

गुजरातमध्ये नवरात्री उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. दांडिया किंवा दांडिया रास हे गुजरातमधील लोकनृत्य आहे. हे समूहनृत्य विशेष करून नवरात्रात नाचले जाते. गुजरातमध्ये कोणत्याही सणाला किंवा शुभप्रसंगी हे नृत्य करण्याची परंपरा आहे. गरबा हा गुजरातमधील नवरात्री उत्सवातील पारंपरिक नृत्याचा प्रकार आहे. एका रंगीत घड्याला छिद्रे पाडून त्यात दिवा लावला जातो आणि त्याची पूजा केली जाते. या घड्याला गरबो असे म्हणतात.

गरबा खेळणे म्हणजे टाळ्यांच्या किंवा बहुधा लाकडी दांड्यांच्या लयबद्ध गजरामध्ये देवीची भक्तिरसपूर्ण गाणी म्हणणे. गरब्याच्या वेळी गोलाकार फेर धरून केलेले मंडल हे घटाचे प्रतीक असते, यांच्या मध्यभागी छिद्र असलेल्या रंगीबेरंगी मातीच्या घड्यात दिवे लावले जातात व त्याभोवती गोलाकार नाचण्याची पद्धत आहे.

नवरात्र साधारणपणे देवीचे असते, पण इतर देवांची नवरात्रेही असतात. तुळजाभवानीचे नवरात्र दहा दिवसांचे असते, तशीच खंडोबाचे, व्यंकटेशाचे, नरसिंहाचे, दत्ताचे अशी इतरही नवरात्रे असतात. यापैकी नरसिंहाचे नवरात्र तीन ते नऊ दिवस, खंडोबाचे पाच किंवा सहा दिवस, बालाजी (व्यंकटेशाचे) दहा दिवस, दत्ताचे नऊ ते दहा दिवस असते. आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नवरात्रीं खेरीज, आश्विन शुक्ल तृतीयेपासून सुरू होणारा सप्तरात्रोत्सव, पंचमीपासून सुरू होणारा पंचरात्रोत्सव आणि सप्तमीपासून सुरू होणारा त्रिरात्रोत्सव ही कमी-अधिक दिवसांची नवरात्रे असतात.

नवरात्री दरम्यान विशिष्ट रंग परिधान करणे शुभ मानले जाते, कारण प्रत्येक दिवसाचा एक वेगळा दुवा आणि महत्त्वपूर्ण आध्यात्मिक अर्थ आहे. नवरात्रीचा पहिला रंग हा उत्सव सुरू होणाऱ्या आठवड्याच्या दिवसानुसार निवडला जातो आणि उरलेले आठ दिवस पूर्वनिश्चित चक्रानुसार रंगवले जातात. नवरात्रीचे नऊ रंग पिवळे, हिरवे, राखाडी, केशरी, पांढरे, लाल, रॉयल ब्लू, गुलाबी आणि जांभळे आहेत.

या रंगांचा उपयोग उत्सवादरम्यान पूजा केल्या जाणाऱ्या प्रत्येक देवींचे चित्रण करण्यासाठी केला जातो. सोमवारः पांढरा - स्वतःला पांढरी फुले आणि इतर वस्तूंनी वेढून घ्या. मंगळवारः लाल - तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यासाठी आव्हाने स्वीकारा. बुधवारः तुमची प्रलंबित कामे अभ्यासण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी हिरवा दिवस चांगला आहे. गुरुवारः पिवळा - शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्यासाठी उत्कृष्ट दिवस.

घटस्थापना ही फक्त एका कलशाची स्थापना नाही, तर ती आपल्या अंतःकरणात श्रद्धेचा दीप प्रज्वलित करण्याची प्रक्रिया आहे. नवरात्रोत्सव हा फक्त नऊ दिवसांचा उत्सव नाही, तो जीवनभर जपण्याजोगा संस्कार आहे. शक्तीची उपासना करून जर आपण स्त्रीला खरा मान, समाजाला खरी एकात्मता आणि निसगार्ला खरी जपणूक दिली, तर हाच उत्सव आपल्या जीवनाला खरं यश देईल. घटस्थापना आणि शारदीय नवरात्री तुमच्या आयुष्यात सुख, समृद्धी, शांती घेवून येवो, हीच सदिच्छा व घटस्थापना व नवरात्रोत्सवाच्या मंगल पर्वाच्या हार्दिक शुभेच्छा !

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)





### कृपा हवी तर..

**नवरात्रीत आम्ही म्हणतो**
**जय जय माँ भगवती**
**यज्ञकुंडात द्यायला हवी**
**आपल्या वासनेची आहूती ..**

**मंदीरात गेल्यावरही**
**नयनी वासनेचे विकार**
**सांग बुद्धीवंता, जगदंबा**
**करेल तुझी प्रार्थना स्विकार?**

**पत्नीशिवाय इतरांवर**
**नसावी विकारी कामदृष्टी**
**तेव्हांच आदिमायेची**
**होते भक्तांवर कृपादृष्टी ...**

## : नवरात्रोत्सव : नवचैतन्याचा उज्वल प्रकाश

मॉदेवी हे मांगल्य, चैतन्य, उजेर्चे व शक्तीचे प्रतीक आहे. अनेक कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते. घटस्थापनेपासून तर दसऱ्यापर्यंत संपूर्ण भारतात आपल्याला वेगवेगळ्या पध्दतीचे उत्सहाचे व मांगल्याचे वातावरण पहायला मिळते.

मॉ दुर्गाची शक्ती अफाट व अनंतकाल आहे. संपूर्ण शुभ कार्याप्रसंगी व कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते. शक्तीची उपासना मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी प्रेरणादायी ठरते. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला वेगवेगळी शक्तीची रूपे पहायला मिळतात. देवी भागवत पुराणानुसार देवींची १०८ शक्तीपीठ असल्याचे सांगण्यात येते.

कालिका पुराणांमध्ये २६, शिवचरित्र पुराणामध्ये ५१, दुर्गा शप्तसती आणि तंत्रचूडामणिमध्ये शक्ती पीठांची संख्या ५२ सांगितली आहे. परंतु साधारणतः ५२ शक्तीपीठांना जास्त महत्व दिले जाते. या शक्ती पीठांपैकी साडेतीन शक्तिपीठे महाराष्ट्रात आहेत . देवीची साडेतीन शक्तिपीठामध्ये श्री महालक्ष्मी (कोल्हापूर), श्री रेणुकामाता (माहूर) व तुळजाभवानी (तुळजापूर) यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील प्रेरणा शक्ती व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आराध्य दैवत अशी ही तुळजापूरची तुळजाभवानी देवी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. इतिहास व पुरातत्वदृष्ट्या हे मंदिर यादवकालीन मानले जाते. काहींच्या मते १७ व्या किंवा १८ व्या शतकातील मानली जाते. साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्ध्या पीठाचे महत्त्वाचे स्थान म्हणजे सप्तश्रृंगी देवी (नाशिक) सप्तश्रृंगीदेवीला महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे ओंकार रूप समजण्यात येते. शुंभनिशुंभ व महिशासुर या पाशवी शक्तीच्या असुरांचा नाश केल्यावर तप, साधनेसाठी देवीने या गडावर वास्तव्य केले होते. सह्यांद्रीच्या या उंच कड्यास सात शिखरे आहेत. त्यावरूनच या स्थानाचे नाव सप्तश्रृंगगड असे पडले.

नवरात्र उत्सवामध्ये संपूर्ण भारतात आपल्याला एक वेगळेच मांगल्याचे व नवचैतन्याचे वातावरण पहायला मिळते.कारण लहान-मोठे, आबालवृद्ध संपूर्ण मॉदेवीच्या आराधनेमध्ये तल्लीन असतात व जय माता दी चा जयघोष करीत असतात. त्यामुळे नवरात्रीपासुनच दिवाळीच्या सणाची चाहूल लागते.

नवरात्रीपासुनच आपण घरांच्या सजावटीला सुरूवात करतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना केल्यानंतर दशमीला विजयादशमी (दसरा) उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व म्हणजे असुरी शक्तीचा नाश व सत्याचा विजय मानलेल्या जाते.दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाचा संहार करून असुरी शक्तीला संपीले व विजय प्राप्त केली. त्यानिमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो.

आपण पहातो की नवरात्रीपासुन गुलाबी थंडीला सुरुवात होते. म्हणजे संपूर्ण सृष्टीचे वातावरण या ९ दिवसांमध्ये बदलल्याचे आपल्याला दिसून येते व सर्वत्र नवचैतन्य निर्माण होते. महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधल्या जाते.त्याचप्रमाणे महाराष्ट्रात अनेक देवीदेवतांचे वास्तव्य असल्याचे आपल्याला पहायला मिळते. त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण नागरिकांनी महाराष्ट्र दर्शन करून देवीदेवतांचे एकदा तरी दर्शन घेतले पाहिजे.नवरात्रामध्ये आपण मॉदेवीची आराधना करतोच यात दुमत नाही. परंतु निसर्गाला वाचविण्यासाठी देवीला साकडे सुध्दा घातले पाहिजे.

दिवसेंदिवस निसर्गाचे संतुलन डगमगल्याने हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. यामुळे पशुपक्षी, मानव, जीवजंतू यांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे स्पष्ट दिसुन येते. कारण वाढते प्रदुषण, जंगल तोड यामुळे निसर्ग भयभीत झालेला आहे.याचेच प्रयचित्य पशुपक्षांना भोगावे लागत आहे.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

आज जंगल तोडीमुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक पशुपक्षी नामशेष झाल्याचे दिसून येते. उदाहरण द्यायचे झाले तर चित्ता असे अनेक पशुपक्षी आहेत की ते काही नामशेष झाले आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.

याकरिता नवरात्र उत्सव लक्षात घेता संपूर्ण भक्तांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.फक्त फोटो शेषन पुरते वृक्षारोपण नसावे तर ९ दिवस वृक्षलागवडीची मोहीम युध्दपातळीवर राबवली पाहिजे.

यात सरकारचा, प्रशासनाचा, सामाजिक संस्थांचा, दुर्गा मंडळे, यांचा सुध्दा सहभाग असायला हवा. यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईलच मॉदेवी सुध्दा प्रसन्न होईल व आपणा सर्वांना भरपूर आर्शिवाद देईल.कारण वृक्षलागवडीमुळे स्थल, जल, वायु यांचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल.

मॉ महालक्ष्मी, रेणुकामाता, तुळजाभवानी, सप्तश्रृंगी देवीला प्रार्थणा करतो की नवरात्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होवो आकार-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर - दक्षिण सर्वत्र सुख-शांती व मांगल्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे अशी देवीच्या चरणी प्रार्थना करतो.

नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने काळाची गरज आहे.कारण वाढते प्रदुषण, जंगलतोड व दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी होणे. यामुळे मानव, पशुपक्षी, जीवजंतू व अन्य प्राणी यांचा सर्वांचा जीव धोक्यात आहे.याकरीता नवरात्र उत्सवाच्या पावनपर्वाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून संपूर्ण भारतवासीयांनी इतिहास घडवीने गरजेचे आहे.

मॉदेवी म्हणजे संपूर्ण ब्रम्हांड त्यामुळे आपल्याला वृक्षांच्या जळामुळात, पानात,फुलात,फळात आपल्याला देवीचे अवश्य दर्शन अवश्य होईल.

*सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके!!*
*शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते!!!*
*जय माता दी!!*

## देवीची ओटी भरणे

दरवर्षी नवरात्र उत्सव हा भक्तिभावाने आणि उत्साहाने साजरा केला जातो. या काळात पूजा, अर्चना, सप्तशती पाठ यासोबतच देवीची ओटी देखील भरतात. देवीची ओटी तिच्या मुळ स्थानावर जाऊन भरावी. पण ज्यांना ते शक्य नसेल ते घरी देखील भरु शकतात. नवरात्रात ९ दिवसांपैकी कोणत्याही दिवशी देवीची ओटी भरता येते. देवीच्या पूजेची सांगता खण (साडी) आणि नारळ अर्पण करून होते. देवीला अर्पण करायची साडी सुती किंवा रेशमी असावी. सहावारी साडी पेक्षा नऊवारी साडी प्रामुख्याने देवीला अर्पण करावी. नऊवारी साडी ही देवीच्या नऊ रूपांच्या पूजेचे प्रतिक आहे, तसेच त्रिकोणी खण हे ब्रम्हा, विष्णू, महेश घ्या तीन देवतांचे प्रतिक मानले जाते.

एका ताटात साडी ठेवून खण, नारळ, सूपारी, हळकुंड, बदाम, खारीक, थोडे' तांदूळ ठेवावेत. (शक्य असल्यास पाच प्रकारची फळे) नारळाची शेंडी देवीच्या दिशेने असावी. ताटातील सर्व वस्तू हाताच्या ओंजळीत घेऊन देवी समोर उभे राहावे. देवीला प्राथार्ना करावी 'आई जगदंबे माज्या ओटीचा स्वीकार कर आणि तुझी कृपादृष्टी कायम आमच्या कुटुंबावर असूदे'! आणि देवीच्या चरणी ओटी अर्पण करावी. नंतर ओटीच्या साहित्यावर तांदूळ वहावेत. देवीला अर्पण केलेली साडी शक्य असल्यास परिधान करावी. आणि नारळ प्रसाद म्हणून घ्यावा.

ओटी भरणे हा एक संतती प्राप्तीच्या आशीवार्दाचे प्रतीकात्मक स्वरूप आहे.ज्या देवीच्या कृपेने आपल्याला सौभाग्य मिळाले त्या देवीच्या प्रती कृतज्ञतेचा भाव आहे. अनेक लोक देवीला सोने, चांदी मौल्यवान वस्तू, मोठी रक्कम हे देखील अपर्ण करतात .पण आपण यथाशक्ती देवीची मनोभावे पूजा करून सुख- समृद्धी अणि शांतीचा आशिर्वाद मागावा.

■ सौ. वर्षा आवदे
नागपूर.

## एल्जीकडून मागणी=पुरवठा तत्वावर आधारित कॉम्प्रेसरचा आविष्कार



**नागपूर, २१ सप्टेंबर :** जगातील आघाडीच्या एअर कॉम्प्रेसर उत्पादकांपैकी एक असलेल्या एल्जी इक्विपमेंट्स (बीएसई: ५२२०७४ एनएसई: ) ने आज जितकी मागणी=तितकाच पुरवठा या तत्वावर चालणाऱ्या आपल्या नवीन कॉम्प्रेसर उत्पादनाचे अनावरण केले आहे. स्थिर वेगाने चालणाऱ्या कॉम्प्रेसरला चढ-उतार असलेल्या वायू पुरवठ्याच्या मागणीच्या काळात गरजेनुरुप कार्य करणाऱ्या कॉम्प्रेसरमध्ये रुपांतरीत करत कंपनीने एक नाविन्यपुर्ण आविष्कार अभियांत्रिकी जगतात सादर केला आहे. या कुशल तंत्रज्ञानामुळे कॉम्प्रेसरच्या आत वायुच्या प्रवाहाचे अतिशय स्मार्टपणे फेरवहन केले जाते. त्यामुळे कॉम्प्रेसरकडून पाठविल्या जाणाऱ्या हवेचा प्रवाह स्वयंचलितपणे क्षणोक्षणी (रिअल-टाइम) प्रकल्पाच्या गरजेनुसार कमीअधिक केला जातो. परिणामी मागणी आणि पुरवठा यांचे प्रत्येक क्षणाला संतुलन साधण्याची हमी ही यंत्रणा देते. या नवीन उत्पादनाचा यशस्वी परिणाम म्हणजे: स्थिर वेगाने कार्यरत असणाऱ्या यंत्राआधारे सहजता आणि सक्षमता या दोघांचा संगम साधत व्हीएफडीसारखी ऊर्जा बचत साध्य केली जाते.

प्रत्येक कारखान्यात कॉम्प्रेस्ड एअर म्हणजे दाबयुक्त हवा ही चौथी उपयुक्तता असते आणि हवेची मागणी कधीही एकसमान नसते. बहुतेक कारखाने स्थिर वेगाने चालणाऱ्या कॉम्प्रेसरवर अवलंबून असतात आणि ते हवेची मागणी कमी झाल्यावरही सतत त्याच वेगाने कार्यरत राहतात. एल्जीची मागणी=पुरवठा प्रणाली या यंत्रात गतिमानतेचे कौशल्य आणते, रिअल-टाइम म्हणजेच प्रत्येक क्षणाला असलेल्या मागणीनुसार पुरवठ्याचे स्वयंचलितपणे समायोजन करते, ग्राहकांना ऊर्जा वाचवण्यास, यंत्रांची झीज कमी करण्यास आणि मोठ्या भांडवली गुंतवणुकीच्या गरजेविना यंत्रणा सातत्याने कार्यरत राहण्यास मदत करते, अशी टिप्पणी एल्जी इक्विपमेंट्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जयराम वरदराज यांनी केली.

## अदाणी सिमेंटने उमिया धाममध्ये निर्माण केला जगातील सर्वात मोठा राफ्ट फाउंडेशन

**अहमदाबाद, २१ सप्टेंबर :** गुजरातच्या भूमीवर श्रद्धा आणि आधुनिक अभियांत्रिकीचा अद्भुत संगम पाहायला मिळाला, जेव्हा अदाणी सिमेंटने अहमदाबादजवळील जगत जननी माता उमिया धाम मंदिरासाठी जगातील सर्वात मोठा राफ्ट फाउंडेशन तयार करून इतिहास रचला. हे काम ५४ तास सलग सुरू राहिले आणि धार्मिक पायाभूत सुविधांसाठी जागतिक विक्रम प्रस्थापित केला.



या मेगा प्रोजेक्टमध्ये २४,१०० घन मीटर ईकोमैक्सX एम४५ ग्रेड लो-कार्बन कॉंक्रीट, ३,६०० टन उच्च गुणवत्तेचे सिमेंट, २६ रेडी-मिक्स कॉंक्रीट (आरएमएक्स) प्लांट आणि २८५+ ट्रांझिट मिक्सरचा वापर केला गेला. ६०० पेक्षा अधिक कुशल कामगार आणि तंत्रज्ञांनी दिवसरात्र मेहनत करून हे आव्हानपूर्ण काम कोणत्याही अडथळ्याशिवाय, 'कोल्ड जॉइंट्स' न देता पूर्ण केले.

या फाउंडेशन कास्टिंगचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे ईकोमैक्सX कॉंक्रीटच्या वापरामुळे प्रकल्पातील कार्बन फूटप्रिंट ६०% कमी झाला. 'कूलक्रीट' तंत्रज्ञानाचा वापर करून तापमान २८ डिग्री सेल्सियस खाली ठेवले गेले, ज्यामुळे थर्मल ताण नियंत्रित राहिला आणि मजबुती टिकली.

अदाणी समूहाचे सीईओ सिमेंट बिझनेस, विनोद बाहेती म्हणाले, उमिया धाम हे एक प्रतिष्ठित आध्यात्मिक ठिकाण बनणार आहे, जे ६० एकरमध्ये पसरलेले आहे आणि यामध्ये सुमारे २००० कोटींची गुंतवणूक केली गेली आहे. हा प्रोजेक्ट फक्त जागतिक विक्रम प्रस्थापित करण्यापुरता मर्यादित नाही, तर तो अदाणी सिमेंटच्या गुणवत्तेचे, आकाराचे, गतीचे आणि उद्देशाचे उदाहरण आहे. आमच्या चेअरमनच्या मते, हे फक्त अभियांत्रिकी यश नाही नाहीत, तर श्रद्धा आणि आधुनिक पायाभूत सुविधा यामधील पूल आहेत. उमिया धाममधील यशस्वी राफ्ट कास्टिंग हेच त्या विचारधारेचे जिवंत उदाहरण आहे: जिथे श्रद्धा नवोपक्रमाला प्रेरणा देते, आणि नवोपक्रम संपूर्ण समुदायाला पुढे नेतो. जेव्हा आपण नवोपक्रम, लोक आणि टिकाऊ साहित्य एकत्र करतो, तेव्हा असे उपाय तयार होतात जे पिढ्यानपिढ्या टिकतात आणि जागतिक स्तरावर नवीन मानके स्थापित करतात. आमच्या इको मॅक्सएक्स लो कार्बन कॉंक्रीटमुळे या संरचनेने कार्बन उत्सर्जन ६०% पर्यंत कमी केले, जे आमच्या शाश्वतता आणि उत्कृष्टतेच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

विश्व उमिया फाउंडेशनचे अध्यक्ष श्री आर.पी. पटेल यांनी सांगितले: जगत जननी माता उमिया (पार्वती) मंदिराचे हा विश्वविक्रमी पाया भारताच्या सांस्कृतिक आणि अभियांत्रिकी वारशासाठी अभिमानाचा क्षण आहे. अदानी सिमेंटच्या मेगा प्रोजेक्ट्समधील कौशल्यामुळे ते आमच्यासाठी नैसर्गिक भागीदार बनले आहेत.

## सुहास अजिबात आदर्श पिता नाही, आणि त्यामुळेच त्याची भूमिका साकारणे रोचक आहे : वरुण बडोला



**मुंबई, २१ सप्टेंबर :** कौटुंबिक नात्यांची गुंतागुंत समर्थपणे दाखवून सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिका प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. या कहाणीतील एक मुख्य पात्र सुहास (वरुण बडोला) या पित्याचे आहे. हा पिता अजिबात आदर्श नाही! सुहासच्या रूपात वरुणने ही एक स्वभावात दोष असलेली, तुटक, बेभरवशाच्या व्यक्तीची भूमिका केली आहे. पण कुटुंबाच्या वाढीत ही भूमिका महत्त्वाची आहे. आपल्या अभिनयातून वरुण बडोलाने सुहासची निराशा, त्याची कमजोरी तसेच काही मुक्तीचे शांत क्षण देखील दाखवले आहेत.

बहुआयमी भूमिका करण्याची हातोटी असलेला वरुण येथे सांगत आहे की इत्ती सी खुशी च्या कहाणीतील कोणत्या गोष्टीने त्याला आकर्षित केले, हा आगळावेगळा पिता साकारण्यासाठी त्याने काही विशेष प्रयत्न केले का तसेच मालिकेतील इतर कलाकारांशी आणि विशेषतः अन्विता साकारणाऱ्या सुंबुल तौकीर खानशी त्याचे संबंध कसे आहेत.

१. सुहास हा सर्वसामान्य पित्यासारखा नाही. त्याच्यात दोष आहेत, तो अत्यंत बेभरवशाचा आहे पण तरीही संबद्ध आहे. या कहाणीचा एक भाग होताना कसे वाटते आहे?

होय, एक अभिनेता व्यक्तिरेखेत नेहमी काही तरी आव्हान शोधत असतो. सुहासने ते आव्हान मला नक्कीच दिले आहे. तो आदर्श पित्यासारखा अजिबात नाही. त्याच्यात दोष आहेत, तो बेभरवशाचा आहे, कधीकधी तो खूप वैतागतो पण तरीही तो माणूस आहे. त्यामुळेच त्याला पडद्यावर जिवंत करताना मजा येते. एक अभिनेता म्हणून माझ्यासाठी हा एक आल्हाददायक अनुभव आहे, कारण मी आजवर केलेल्या भूमिकांपेक्षा ही अगदीच वेगळी भूमिका आहे. या विविधतेमधून मला स्फूर्ती मिळते.

२. सुंबुल (अन्विता) आणि तुझ्यातील बाप-लेकीचे कडू-गोड नाते पडद्यावर कसे उभे राहिले?

हे नाते उभे करण्यासाठी खरं तर आम्हाला विशेष असे काही करावे लागले नाही. मी सुंबुलचे काम पाहिले आहे आणि मला खरोखर असे वाटते की आज टेलिव्हिजनवरील अत्यंत प्रतिभावान लोकांपैकी ती एक आहे. मला वाटते, तिनेही माझे काम बघितले असणार. त्यामुळे एकमेकांसाठीचा आदर आमच्यात होता.

३. सुहासचे निराश पण तरीही लोभस व्यक्तिमत्व साकारणे किती अवघड होते?

प्रामाणिकपणे सांगायचे तर ते अवघड होते. मी सुहास जसा उभा केला आहे, तो निव्वळ लेखक आणि दिग्दर्शकाने माझ्यासमोर तो जसा उभा केला होता, त्याच्याच आधारावर आहे. त्यांच्या व्हिजनवर मला संपूर्ण विश्वास आहे, त्यामुळे मी त्यांच्या सुचनांचे मनापासून पालन केले.

४. मालिकेतील इतर कलाकारांशी, विशेषतः तरुण कलाकारांशी पडद्याच्या मागे तुझे नाते कसे आहे?

या तरुण कलाकारांमध्ये काय ऊर्जा आहे! त्यांचे सगळ्यांशीच चांगले पटते, असे दिसते. माझ्या इतर कामांमुळे सेटच्या बाहेर मी त्यांच्यासोबत जास्त वेळ व्यतीत करू शकत नाही. पण, जेव्हा जेव्हा मी पडद्यावर या मालिकेचा एपिसोड बघतो, तेव्हा हे दिसून येते की, प्रत्येक जण आपले काम किती जीव ओतून करत आहे.

५. प्रेक्षक या मालिकेत पुढे काय बघणार आहेत?

कहाणीत पुढे बऱ्याच कलाटण्या आणि वळणे आहेत. गोष्ट आता आणखीनच रोचक होणार आहे. मी कथानकाविषयी अधिक सांगू शकणार नाही, पण इतकेच सांगेन की, सुहासचा प्रवास प्रेक्षकांना सर्प्राइज आणि कदाचित त्यांच्या मनातील समजाला धक्का देखील देणार आहे. भावनांचे अनेक पदर उलगडणार आहेत, नाट्य रंगणार आहे त्यामुळे प्रेक्षकांनी मालिका बघत राहिले पाहिजे.

## मिडास हॉस्पिटलमधील टीमने एंडोस्कोपिक शस्त्रक्रिया करून रुग्णाच्या अन्ननलिकेत अडकलेला रेझर ब्लेड बाहेर काढला

**चंद्रपूर, २१ सप्टेंबर :** मिडास हॉस्पिटल,नागपूर मधील सिनियर गॅस्ट्रोएंटेरोलॉजिस्ट डॉ. सौरभ मुकेवार आणि त्यांच्या टीमने मिळून, एका रुग्णावर गुंतागुंतीची एंडोस्कोपिक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केली. या शस्त्रक्रियेद्वारे रुग्णाच्या अन्ननलिकेत (इसोफॅगस) अडकलेला रेझर ब्लेड काढण्यात आला. रुग्णाकडून हा रेजर ब्लेड उपचारासाठी येण्याच्या सुमारे दोन आठवडे आधी गिळण्यात आला होता. ४० वर्षांचा पुरुष रुग्ण, ज्याला १५ वर्षांपासून स्किझोफ्रेनिया आहे, जवळजवळ एका आठवड्यापासून अन्न गिळताना त्रास होत असल्याच्या तक्रारीसह मिडास हॉस्पिटल,नागपूर मध्ये दाखल झाला.तपासणीनंतर एंडोस्कोपीमध्ये रुग्णाच्या अन्ननलिकेत (इसोफॅगस) पूर्ण-थराचे छिद्र (फुल-थिकनेस पर्फोरेशन) असल्याचे आढळले.

डॉ. मुकेवार आणि एंडोस्कोपी टीमने ८ मार्चला एक नाजूक शस्त्रक्रिया केली. या शस्त्रक्रियेदरम्यान त्यांनी एंडोस्कोप अन्ननलिकेत टाकून रुग्णाच्या शरीरात दोन आठवड्यांहून अधिक काळ अडकलेला रेजर ब्लेड काळजीपूर्वक बाहेर काढला. ब्लेड पूर्णपणे अन्ननलिकेतून बाहेर काढण्यात आला आणि अन्ननलिकेतील छिद्र मेटल स्टेंट बसवून बंद करण्यात आले.

रुग्णाच्या मानसिक आरोग्याच्या स्थितीचा विचार करता हॉस्पिटलने बहुविविध उपचार पद्धती अवलंबली, ज्यात मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेतला गेला. मानसिक आरोग्य तपासणीत रुग्णाला चुकीचे भास, छळ होत असल्याची भावना, आवाज ऐकू येणे (ऑडिटरी हॅलुसिनेशन्स) आणि सायकोटिक डिप्रेशन असल्याचे आढळले. डॉक्टरांच्या मते रुग्णाने रेजर ब्लेड गिळणे हे आत्महत्येच्या हेतूने नसून त्याला येणाऱ्या आवाजाच्या भासामुळे झाले.

डॉ. सौरभ मुकेवार म्हणाले, या केसमध्ये अनेक गुंतागुंतीच्या अडचणी आल्या, ज्यामध्ये रेजर ब्लेडमुळे झालेल्या शारीरिक दुखापतीचे उपचार आणि रुग्णाला योग्य मानसोपचार देणे हे दोन्ही समाविष्ट होते. आमच्या टीमच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आम्ही रेजर ब्लेड यशस्वीरित्या अन्ननलिकेतून बाहेर काढू शकलो आणि रुग्णाच्या एकूण आरोग्याची काळजी घेऊ शकलो.

रुग्णाने उपचारांना चांगला प्रतिसाद दिला आहे आणि आता तो तोंडावाटे अन्न घेऊ शकतो. त्याला स्थिर प्रकृतीत हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आला असून पुढेही त्याचे योग्य वैद्यकीय उपचार सुरू राहतील.

## फ्लिपकार्टकडून 'बिग बिलियन डेज'मध्ये दुचाकींसाठी आकर्षक ऑफर्स

**नागपूर, २१ सप्टेंबर :** भारतातील देशांतर्गत ई-वाणिज्य बाजारपेठ असलेली फ्लिपकार्ट आपल्या वार्षिक शॉपिंग फेस्टिव्हल, द बिग बिलियन डेजची तयारी करत असताना, पेट्रोल आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या विस्तृत निवडीद्वारे भारतातील दुचाकी खरेदीचे स्वरूप बदलण्यासाठी सज्ज आहे. उत्सवाचा हंगाम सुरू होत असताना फ्लिपकार्ट वैविध्यपूर्णता, परवडणारे दर, विश्वास आणि चोवीस तास ग्राहक पाठिंबा यांच्यासह दुचाकींसाठी पसंतीचे ठिकाण म्हणून आपले स्थान मजबूत करत आहे.

या प्लॅटफॉर्ममध्ये प्रवासी, कामगिरी आणि प्रीमियम बाइक्सपासून ते सर्वाधिक विक्री होणाऱ्या स्कूटर आणि इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांची विस्तृत श्रेणी आहे. त्यात हिरो, टीव्हीएस, बजाज, सुझुकी, टीव्हीएस आयक्यूब, चेतक, एथर, व्हिडा, ओला आणि ॲंपिअर तसेच इतर अनेक आघाडीच्या ब्रँडचा समावेश आहे. बिग बिलियन डेज २०२५ मध्ये जावा येझदी, केटीएम आणि ट्रायम्फसह विविध प्रीमियम मोटरसायकल निवड ऑफर करण्यासाठी रॉयल एनफील्ड मोटारसायकल्सचे अनावरणही होईल.

अलिकडेच घोषणा झालेल्या जीएसटी दर सुधारणेमुळे (२२ सप्टेंबर २०२५ पासून प्रभावी) ३५० सीसीपेक्षा कमी क्षमतेच्या दुचाकी वाहनांवरील कर २८% वरून १८% पर्यंत कमी झाला आहे, त्यामुळे ग्राहकांना आता त्यांच्या खरेदीवर जास्तीत जास्त मूल्य मिळवण्याची संधी आहे. हा वेळेवर झालेला धोरणातील बदल फ्लिपकार्टच्या उत्सवी डील आणि वित्तपुरवठा पर्यायांशी सुसंगत आहे. त्यामुळे दुचाकी वाहनात गुंतवणूक करण्याचा हा एक आदर्श क्षण बनला आहे.

फ्लिपकार्टचे इलेक्ट्रॉनिक्सचे उपाध्यक्ष सुजित आगाशे म्हणाले, दुचाकी खरेदी करणे हा अनेकांसाठी एक महत्त्वाचा निर्णय आहे आणि आम्ही ग्राहकांना त्यांच्या सोयी आणि पारदर्शकतेसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म निवडताना पाहत आहोत. मागील एका वर्षात फ्लिपकार्टवर दुचाकी वाहनांची मागणी तिप्पट झाली आहे. त्यामुळे ग्राहक आमच्या ग्राहक-केंद्रित उपक्रमांचे कौतुक करतात. या सणासुदीच्या हंगामात आम्ही उत्पादन शोधण्यापासून ते वित्तपुरवठा करण्यापर्यंतचा अनुभव अधिक सुलभ केला आहे. त्यामुळे आमच्या ग्राहकांसाठी एक सुरळीत आणि चांगली प्रक्रिया सुनिश्चित होते. फ्लिपकार्टमध्ये विश्वासू भागीदार आणि मजबूत ग्राहक सेवेद्वारे समर्थित पूर्णपणे डिजिटल प्रवास देशभरात दुचाकी वाहनांची मालकी कशी अधिक सुलभ आणि सोयीस्कर बनवू शकतो हे दाखविण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

## एण्ड टीव्हीसोबत नवरात्री सण साजरा करा!

**मुंबई, २१ सप्टेंबर :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है'मध्ये नवरात्री साजरीकरण वेषांतर, खोडकरपणा आणि दांडियाने भरलेला ड्रामा घेऊन येणार आहे, जे प्रेक्षकांना अचंबित करतील. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, हप्पू (योगेश त्रिपाठी) आणि बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) जीवनात खूप गुंतून गेलेले असतात. हप्पू सतत बढती न मिळण्याबाबत तक्रार करत असतो, तर बेनी बिमलेशच्या (सपना सिकरवार) अनुपस्थितीमुळे निराश असतो. त्यांना पहाडी वाली माता मंदिराबाबत समजते, जेथे असा विश्वास असतो की नवस पूर्ण केल्याने इच्छा पूर्ण होतात. दोघेही रांगत मंदिरात जाऊन आशीर्वाद घेण्याचे ठरवतात. पण, कमिशनरला (किशोर भानुशाली) हप्पूची कमिशनर बनण्याची इच्छा असल्याचे समजते तेव्हा तो मनोहरला (नितीन जाधव) हप्पूच्या प्रवासात अडथळा आणण्याची सूचना देतो. प्रत्येक वेळी हप्पू आणि बेनी डोंगरावर चढाईचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांची खोट्या सूचनांमुळे दिशाभूल केली जाते, ज्यामुळे ते पहाटे आणि संध्याकाळी मंदिर बंद होण्यापूर्वी मंदिरात पोहोचू शकत नाहीत. दरम्यान, राजेश हप्पूचे दर्शन पूर्ण होईपर्यंत काहीही खाणार नाही किंवा पिणार नाही अशी प्रतिज्ञा करते, ज्यामुळे हप्पू प्रचंड दबावाखाली येतो. वारंवार अयशस्वी प्रयत्नांनंतर, हप्पू राजेशला खोटे बोलतो आणि तिची चिंता कमी करण्यासाठी त्याने त्याचे नवस पूर्ण केल्याचा दावा करतो. पण नवरात्रीच्या वेळी दांडियादरम्यान हप्पूचे गुपित उघडकीस येते, तसेच मनोहर देखील कमिशनरच्या योजनेबाबत सांगतो. ज्यानंतर दांडियामध्ये विनोदी संघर्ष सुरू होतो. हप्पूचे वचन अखेर पूर्ण होईल का, की नियतीने त्याच्यासाठी काही वेगळेच लिहिले आहे?''


मालिका 'भाबीजी घर पर है'च्या आगामी एपिसोडबाबत विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, ''तिवारी (रोहिताश्व गौड) आणि विभुती (आसिफ शेख) यांची त्यांच्या आवडत्या भाबीजींसोबत दांडिया खेळण्याची इच्छा असते. पण त्यामध्ये दुविधा येते, जेथे अनिताला तिच्या ग्रुमिंग क्लासमधील विद्यार्थीनीकडून फक्त मुली असलेल्या दांडिया नाइटसाठी प्रायोजकत्व मिळते आणि अंगूरी (शुभांगी अत्रे) व अनिता दोघीही त्यामध्ये एकत्र सहभाग घेण्याचे ठरवतात. अस्वस्थ व निराश झालेले दोघे पुरूष स्त्री रूपात वेषांतर करत मुलींच्या कार्यक्रमामध्ये सामील होण्याची खोडकर योजना आखतात. काही काळासाठी तिवारी व विभुतीला समजत नाही की ते स्त्रीच्या वेषात आहेत, पण अचानक जोराचा वारा येतो आणि त्यांचा केसांचा विग उडून जातो, ज्यामुळे त्यांचे खरे रूप एकमेकांसमोर, तसेच सर्वांसमोर उघडकीस येते. त्यांना अद्दल घडवण्यासाठी अंगूरी व अनिता दांडियासाठी दोन मोहक पुरूषांना बोलवतात आणि ते त्यांचे प्रेमी असल्याचे नाटक करतात. यामुळे तिवारी व विभुतीला धक्का बसतो. पण दांडिया संपण्यापूर्वी सत्य उघडकीस येईल का की त्यांचा मत्सर त्यांना मोठ्या संकटात टाकेल?''

## कैरी विरुद्ध लता: सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युगचे हृदय कोण जिंकणार?

**मुंबई, २१ सप्टेंबर :** कौटुंबिक नाट्य, भावनांचे चढ-उतार आणि युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) व कैरी शर्मा (आशी सिंह) यांच्यातील नात्याचे बदलते रंग दर्शविणारी सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिका लोकांना आवडली आहे. गणपती समारंभात कैरीने सगळ्या भावंडांना पूजेच्या निमित्ताने एकत्र आणले. मात्र लता (रिद्धिमा पंडित)च्या वचनात अडकलेल्या युगला लतासोबत आरती करणे भाग पडले, ज्यामुळे कैरी दुखावली. परंतु, त्यानंतर युगने लताकडे कबूल केले की, त्याचे मन कैरी आणि आपल्या भावंडांसोबतच होते. यावरून कैरीविषयी त्याच्या मनातील भावनांची वाढत चाललेली तीव्रता लक्षात येते.

आगामी भागांमध्ये सिन्हा कुटुंबात मोठे नाट्य रंगणार आहे. युगला शौर्य (अभिषेक वर्मा)पासून लपवताना कैरीला मालमत्तेचे दस्तऐवज सापडतात, ज्याच्यावरून संघर्षाला तोंड फुटते. हे सर्व लताच्या कानावर पडते आणि ती कैरीविरुद्ध कट रचू लागते. युग आपला सख्खा भाऊ नाही, हे शौर्यला कळल्यानंतर परिस्थिती आणखीनच बिघडते. युग तुटक होतो, ज्यामुळे त्याच्यात आणि कैरीत मतभेद होतात. पुढे, लताचे कारस्थान उघडकीस येते. सर्व भावांना युगने आयुष्यभर केलेल्या त्यागाची जाणीव होते आणि ते युगच्या पाठीशी उभे राहण्याचे वचन देतात. या वाढत्या तणावात युग एका अपघातात सापडतो. सर्व कुटुंबीय त्याच्याकडे धाव घेतात, त्यांच्या मनात अपराधी भावना येते पण याच वेळी युगविषयी कैरीच्या मनात असलेले सखोल प्रेम उघड होते. माईरीच्या मनातही कैरीविषयी प्रेम दाटून येते, जे पाहून लताचा तिळपापड होतो. यानंतर त्या दोघी आमने-सामने येतात. कैरी युगची पत्नी म्हणून आपला अधिकार सांगते आणि लता बदला घेण्याचा निर्धार करते.

## शब्दकोडे क्रमांक २२२३



**आडवे शब्द:-**

१) एकाचा राग दुसऱ्यावर काढणे
८) बकरी
९) संगीतातील ठेका
१०) पर्वत अस्सल माल
११) विळखा
१२) सरोवर
१४) गावाचा कारभार पाहाणारा
१६) रामदासस्वामींनी मनाचे श्लोक या गावात लिहिले
१७) वाढलेला व्याप अस्तावस्त पसरलेले सामान
१९) जाण
२१) दुर्गंधी येऊ लागलेला
२४) गुरांचे नख
२५) नवऱ्याला हाक मारण्याचा एक शब्द
२६) तुफान
२७) जुगाराचा एक प्रकार
२९) श्रीविष्णूचा एक अवतार
३१) संतोषजनक
३४) नवरदेव
३५) प्रभात
३७) अंत:करण
३८) मीठाची चव
४०) लग्नादि कार्यासाठी जमलेला गोतावळा
४३) उत्सव
४४) अरण्य
४५) पतिव्रतेचा पुत्र
४७) वेळ, यम
४८) विधानसभेचा सदस्य
५१) कावळ्याचे ओरडणे
५३) होडी
५४) सुंदर युवती
५५) आघाडीला खेळणारा
५७) वैताग, बडबड
५८) एक पालेभाजी, मडके
५९) व्रात्य, मोकळा सुटलेला, निरुद्योगी
६०) समुद्र
६३) पुष्कळवेळा
६५) बाग, बगीचा
६८) अभिप्राय
६९) वाकडा नसलेला
७१) दुधाचे दही बनविणारा घटक
७३) दागदागिने
७५) मनोहरत्व
७६) धमनी, कापडी बंद
७७) पुरुष,
७८) गाय

**उभे शब्द :-**

१) पहिला ऋतू
२) सूचना, चिथावणी
३) गळीत धान्यातून निघालेला द्रवपदार्थ
४) मूल न होणारी गाय
५) वसाहत
६) नाथपंथी गोसावी
७) अंगापेक्षा मोठे झालेले वस्त्र
८) हिंमत, धैर्य
११) बशीचा जोडीदार
१३) विवाहातील एक विधि,
१५) मध्यस्थ, पंच
१६) चक्र
१८) आरक्षित
२०) खोलवर नसलेले, वरपांगी
२२) वाऱ्याने हलणाऱ्या पानांचा आवाज
२३) मुक्तता
२५) अवाजवी
२६) उत्तराधिकारी
२७) चिंतन
२८) कारखान्याचा मालक
३०) न आवडणाऱ्या माणसाचे गुणही दोष वाटतात (वा.प्र.)
३२) सापाची एक जात
३३) हस्त
३६) शरीर
३९) गाडीचे छत
४१) नाश
४२) कलावंत
४३) तलवारीचे म्यान
४४) कौसल्यापुत्र
४६) अत्यल्प, श्रीराम सीतेचा एक पुत्र
४७) गेरू
४८) मालाचे येणे-जाणे
४९) संथपणे, हलतडुलत
५०) वाळा
५२) इच्छा
५३) अपशकुन
५६) तिबेटी धर्मगुरू
५९) दानी, थोर मनाचा
६१) निमग्न, रममाण
६२) वार, दिवस
६४) गीत
६६) फुलांची छोटी टोपली
६७) वंदन
७०) दारूचा एक प्रकार
७२) यात्रेकरूंचा समूह
७४) झाडाभोवतीचा कट्टा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## सोलरवर्ल्ड एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री २३ सप्टेंबर पासून होणार सुरू

**मुंबई, २१ सप्टेंबर :** सोलरवर्ल्ड एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड कंपनी इक्विटी शेअरसाठी प्राथमिक समभाग विक्रीसाठीची बोली/ऑफर मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी सुरू करणार आहे.

इक्विटी शेअरसाठीच्या एकूण ऑफर साईज मध्ये ४९० कोटी रु. (एकूण ऑफर साईज) किंमतीच्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. त्यामध्ये ४,४०० दशलक्ष रु. ४४० कोटी रु. पर्यंतचे फ्रेश इश्यू आणि विक्री समभागधारकांकडून ५० कोटी रु. मूल्याच्या ऑफर फॉर सेलचा समावेश आहे. कंपनीने आयपीओ पूर्व प्लेसमेंटद्वारे १,१००.०० दशलक्ष रु. पर्यंतच्या इक्विटी शेअरसाठीचा इश्यू ९ नोव्हेंबर २०२४ मध्ये पूर्ण केला.

प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीचा दिनांक सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ आहे. बोली/ऑफर मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी खुली होईल आणि गुरुवार, २५ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल.

प्रति इक्विटी शेअरसाठी ३३३ रुपये ते ३५१ रुपये पर्यंतचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान ४२ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ४२ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

ऑफर फॉर सेल मध्ये पायोनीर फेकर आयटी इन्फ्राडेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (प्रवर्तक विक्री समभागधारक) कडून ५० कोटी रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची विक्री समाविष्ट आहे.

नुवामा वेल्थ मॅनेजमेंट लिमिटेड आणि एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड हे या ऑफरचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.


## आज का अंदाज

सोमवार २२ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

**कल्याण बाजार**

| 3 | 6 | 7 | 0 |
|---|---|---|---|
| 148 | 268 | 340 | 235 |
| 346 | 367 | 250 | 479 |
| 490 | 466 | 160 | 389 |
| 32 | 62 | 71 | 01 |
| 38 | 68 | 75 | 05 |
| 34 | 64 | 79 | 09 |

**मुंबई बाजार**

| 4 | 5 | 8 | 9 |
|---|---|---|---|
| 149 | 780 | 378 | 1234 |
| 257 | 690 | 260 | 379 |
| 347 | 500 | 170 | 478 |
| 43 | 53 | 81 | 91 |
| 46 | 56 | 82 | 92 |
| 47 | 57 | 80 | 90 |

**२२ सप्टेंबर २०२५ सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 20 | 53 | 83 |
| 19 | 29 | 54 | 84 |
| 17 | 27 | 56 | 86 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.

प्रो. बालाजी कुमार
9822486034


## राशीभविष्य

**मेष :** आज, तुम्ही तुमचा दिवस नव्या उत्साहाने सुरू कराल. तुम्ही कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी निघालात तरी ते पूर्ण होईपर्यंत तुम्ही स्वस्थ बसणार नाही. आज तुम्हाला उत्कृष्ट परिणाम मिळतील.

**वृषभ :** आज तुम्ही तुमचा दिवस सर्जनशील कामात घालवाल. काही काळापासून ज्या प्रकल्पावर काम करत आहात त्याबद्दल तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवणे चांगले.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी असेल. तुमच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या गोष्टींना तुम्ही अधिक महत्त्व द्याल. तुम्ही काम, कुटुंब आणि मित्रांमध्येही संतुलन राखले पाहिजे.

**कर्क :** आज, तुम्ही तुमच्या आर्थिक परिस्थितीनुसार भविष्यातील योजना आखू शकता. तुमच्या कठोर परिश्रमाचे लवकरच सकारात्मक परिणाम मिळतील. कठोर परिश्रम कोणतेही कार्य यशस्वी करतील.

**सिंह :** आज तुमच्या आयुष्यात नवीन बदल घडेल. तुमच्या कुटुंबाकडून तुम्हाला भरपूर प्रेम आणि पाठिंबा मिळेल. मुलांशी तुम्ही स्पष्ट असले पाहिजे. आजचा दिवस यशाने भरलेला असेल.

**कन्या :** एखाद्या खास व्यक्तीच्या प्रभावाखाली, तुम्ही तुमच्या दैनंदिन दिनचर्येत काही बदल करण्याचा प्रयत्न कराल आणि नवीन कामे हाती घेण्यावर लक्ष केंद्रित कराल. तुमच्या नात्यात गोडवा वाढेल.

**तूळ :** आज, तुम्हाला व्यावसायिक संबंधांमुळे फायदा होईल, तुमचे काम वेळेवर पूर्ण होईल याची खात्री करा. मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखली जाऊ शकते.

**वृश्चिक :** आज तुम्ही नकारात्मक लोकांपासून दूर राहून तुमच्या कामावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तसेच, तुमच्या वागण्यात थोडे सौम्यता ठेवा, कारण यामुळे तुमच्या समस्या सुधारण्यास मदत होईल.

**धनु :** दिवसाचा बराचसा वेळ सामाजिक कार्यात जाईल.आज घेतलेले महत्त्वाचे कौटुंबिक निर्णय सकारात्मक ठरतील. जोडीदाराकडून खास सरप्राईज मिळाल्यामुळे दिवस आनंदात जाईल.

**मकर :** आज, तुम्हाला मीडिया आणि मार्केटिंगशी संबंधित व्यवसायांकडून नवीन अंतर्दृष्टी मिळतील, ज्यामुळे तुमच्या कार्यप्रवाहाला गती मिळेल. महिला त्यांच्या कामाबद्दल खूप उत्साही असतील.

**कुंभ :** आज तुमची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा मजबूत असेल. वास्तुशास्त्र क्षेत्रातील लोकांसाठी आजचा दिवस वरदान घेऊन येईल; तुमच्या कामाची प्रशंसा होऊ शकते.

**मीन :** आज तुमच्या कामात नक्कीच यश मिळेल. परदेशी जाण्याची योजना आखणाजयांना आज खुशखबर मिळेल. आज तुम्ही तुमच्या जोडीदाराला काही आवश्यक वस्तू भेट द्याल.

# खसाळ्यात उमलली 'समृद्ध पंचायत'ची पहाट

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाचा प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाच्या शुभारंभानिमित्त खसाळा गावात आयोजित विशेष ग्रामसभा उत्साहात पार पडली. गाव विकास, स्वच्छता उपक्रम, महिलांच्या सक्षमीकरणापासून ते पर्यावरण संवर्धनापर्यंत अनेक उपक्रमांनी ग्रामसभा रंगतदार झाली. या कार्यक्रमाला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे ऑनलाइन उपस्थित राहिले, तर जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी थेट ग्रामसभेचा अनुभव घेत गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.'

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान व विशेष ग्रामसभा खसाळा गावात उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय चंद्रशेखर बावनकुळे हे ऑनलाइन पद्धतीने जोडले गेले.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद नागपूरचे कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सरपंच जयश्री इंगोले, कामठीचे तहसीलदार जगदाळे, गटविकास अधिकारी येवले व विस्तार अधिकारी गावंडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यकारी अधिकारी महामुनी यांनी ग्रामसभा प्रत्यक्ष अनुभवली. ग्रामस्थांसोबत थेट संवाद साधून गावातील विकासकामांची माहिती घेतली. त्यांच्या हस्ते स्वच्छता मोहिमेने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाचा शुभारंभ झाला. या वेळी वृक्ष लागवडही करण्यात आली. पर्यावरण संरक्षणासह गावाच्या शाश्वत विकासाला चालना देण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. ग्रामसभेत गावकऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. सामाजिक बांधिलकी जपत ग्रामस्थांनी वृद्धांचा वाढदिवस साजरा केला. यामुळे ग्रामसभेचे औचित्य अधिकच बहारदार झाले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटातील महिलांच्या उद्योगाचा शुभारंभ करण्यात आला.

ग्रामविकासात महिलांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन सरपंच जयश्री इंगोले यांनी यावेळी करण्यात केले. सीईओ महामुनी यांनी गावातील विविध उपक्रमांची पाहणी करून कमी कालावधीत विकास साध्य करण्यासाठी मार्गदर्शन केले. गावातील उपलब्ध संसाधनांचा योग्य उपयोग करून आदर्श विकास कसा साधता येईल याबाबत त्यांनी सूचना दिल्या. ग्रामपंचायतीने केलेल्या कामाचे त्यांनी कौतुक केले. खसाळा गावाने केवळ नागपूर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभर आदर्श घालून द्यावा. गावाच्या प्रगतीचा हा प्रवास मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानामुळे अधिक वेगाने पुढे जाईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सरपंच जयश्री इंगोले यांच्या कार्याचे कौतुक सीईओ विनायक महामुनी यांनी केले.

ग्रामपंचायतीअंतर्गत विविध विकासाची कामे केली. यामुळेच शासनाने पुरस्कृत केले. विकासासाठी निधी दिला. गावात स्मशानभूमीतील हरित आणि शांत परिसरामुळे आज त्या ठिकाणी विद्यार्थी अभ्यास करतात. गावातील तरुणांसाठी अभ्यासिका, वाचनालय, सौरऊर्जा ग्राम अशा उपक्रमांवर भर देण्यात येत आहे. येणाऱ्या काळात ऊर्जाग्राम म्हणून गावाची ओळख होईल. मुख्यमंत्री समृद्ध अभियानामुळे गावात विकासाची ऊर्जा निर्माण झाली आहे.



## उमिया वसाहतीत असामाजिक तत्वांची दहशत

### व्यापाऱ्यावर केला जीवघेणा हल्ला




**तौफिक रात्रीच्या वेळी गोदामाची तपासणी करण्यासाठी जातात. गुरुवारी रात्री ११:३० च्या सुमारास तौफिक गोदामाकडे जात होते.**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

उमिया औद्योगिक वसाहतीत असामाजिक तत्वांनी दहशत पसरवून ठेवली आहे. गोदामाची देखरेख करण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीवर भंगार विक्रेते आणि चोरांनी जीवघेणा हल्ला केला. गंभीर जखमी केल्यानंतर आरोपी पसार झाले. या प्रकरणी पोलिसांनी तौफिक युसूफ पटेल (४०) रा. भरतनगर यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये भंगार विक्रेता आरिफ रशीद शेख रा. देशपांडे लेआउट, लक्ष्मण उर्फ सोनू सियाराम शाहू रा. नवीननगर आणि तीन अज्ञात साथीदारांचा समावेश आहे.

रात्रीला परिसरात ट्रकमधून चोरीचा माल उतरवला जात असल्याचा आरोप तौफिक यांनी केला आहे.

उमिया वसाहतीत तौफिक यांचे एक गोदाम आहे. अलिकडे परिसरात चोरीच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे तौफिक रात्रीच्या वेळी गोदामाची तपासणी करण्यासाठी जातात. गुरूवारी रात्री ११:३० च्या सुमारास तौफिक गोदामाकडे जात होते. या दरम्यान त्यांना आरिफच्या गोदामाजवळ लोखंड उतरताना दिसला. उत्सुकतेपोटी तौफिकने तेथील कामगारांना विचारले की हा माल कोणाचा आहे. मात्र काहीही न बोलता ते लोक निघून गेले. थोड्या वेळाने आरिफ आणि लक्ष्मण इतर आरोपींसह आले. एकही शब्द न बोलता त्यांनी तौफिकला बेदम मारहाण करायला सुरूवात केली. लाठ्या-काठ्यांनी वार करीत खिशातील ५,००० रुपये काढून घेतले. तौफिक बेशुद्ध होऊ खाली कोसळले. पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास कुटुंबीय त्यांना शोधत उमिया वसाहतीत आले असता तौफिक जखमी अवस्थेत रस्त्यावर पडून असल्याचे आढळले.

तौफिक तक्रार दाखल करण्यासाठी पारडी पोलिस ठाण्यात गेले, मात्र पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ केली. बऱ्याच चकरा मारल्यानंतर अखेर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी परिसरात चोरीचे लोखंड उतरवतात.

त्यांचे पारडी पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांशी अर्थपूर्ण संबंध आहेत. म्हणूनच पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा नोंदवण्यास नकार दिला, असा आरोप तौफिकने केला आहे. अशा इतरही टोळ्या परिसरात सक्रीय आहेत. पोलिसांशी सेटिंग करून हे सर्व सुरू आहे.

## ताजबागमध्ये बाबा ताजुद्दीन यांची सव्वीसवी पुण्यतिथी उत्साहात साजरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांच्या दर्ग्याचा २६ वा दिवस श्रद्धेने आणि आनंदाने साजरा करण्यात आला.



यानिमित्ताने ताजबाग येथील हजरत बाबा ताजुद्दीन (रह.) यांच्या दर्ग्याच्या प्रांगणात ध्वजारोहण समारंभ पार पडला. ध्वजारोहण समारंभात हजारो भाविक सहभागी झाले होते. भाविकांनी बाबा ताजुद्दीन (रह.) यांच्या दर्ग्याचे दर्शन घेतले आणि नमाज अदा केली. सकाळी ८:३० वाजता हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयात पगडी बांधण्याचा समारंभ पार पडला. त्यानंतर सकाळी ९ वाजता दर्गा परिसरात ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला. सलात-ओ-सलामपठण करण्यात आले. २६ व्या दिवसानिमित्त ट्रस्टने दर्गा परिसरात लंगर खानामध्ये लंगर वाटप केले. संध्याकाळी दर्गामध्ये शमा मेहफिल, कव्वाली, मिलाद शरीफ आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते.

यावेळी हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, विश्वस्त हाजी फारुखभाई बावला, गजेंद्रपाल सिंग लोहिया, मुस्तफा भाई टोपीवाला, हाजी इम्रान खान ताजी यांची प्रमुख उपस्थिती होते.

### कचरा गाडीच्या धडकेने इसम ठार

नागपूर, दि. २१: कचरा गाडीची धडक बसल्याने अरूण सूर्यभान पाटील (५८) रा. टेलिफोन एक्सचेंज चौक या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला.

७ सप्टेंबर रोजी दुपारी २ च्या सुमारास ही घटना घडली. घटनेच्या वेळी मृतक पाटील हे त्यांच्या ॲक्टीवा दुचाकीने राणी दुर्गावती चौकाकडून दही बाजारकडे उड्डाण पुलावरून जात होते. त्याचवेळी एमएच ४९ एटी ५५८७ क्रमांकाच्या कचरा गाडीच्या चालकाने त्यांना जोरदार धडक दिली. लोकांनी त्यांना जवळच असलेल्या खाजगी दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्याला मेडिकलमध्ये नेण्यास सांगितले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

## मराठ्यांच्या ओबीसीकरणाला ओबीसी आक्रोश मोर्चाचा विरोध

### निर्णय मागे घ्या, अन्यथा बेमुदत उपोषणाचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या घेतलेल्या निर्णयाविरोधात ओबीसी आक्रोश मोर्चा, ओबीसी युवा अधिकार मंच आणि इतर विविध ओबीसी संघटनांनी रविवारी महाल गांधी गेट चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर निषेध आंदोलन केले. सरसकट मराठ्यांचे ओबीसीकरण हा ओबीसी समाजावर अन्याय असल्याचा आरोप करत सरकारने हा निर्णय तत्काळ मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा, बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला. आंदोलकांनी यावेळी राज्य सरकारने ने काढलेल्या जीआर च्या कॉपी फाडून सरकारच्या या निर्णयाचा निषेध केला. या निषेध आंदोलनात ओबीसी आक्रोश मोर्चाचे गिरीश तितरमारे, ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक पियुष आकरे, कृतल आकरे, प्रतिक बावनकर, विकास गोहणे, सौरभ गौतमारे, राज यादव, राम वाळके, मालती वैद्य सह मोठ्या संख्येत नागरिकांनी सहभाग घेतला.

हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारे मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय आणि शासन निर्णयात 'गावातील, नातेसंबंधातील, कुळातील' या शब्दांना आमचा तीव्र विरोध आहे. केवळ प्रतिज्ञापत्र सादर करून जात प्रमाणपत्र मिळवणे हे महसूल आणि सामाजिक न्याय विभागाच्या नियमांचे उल्लंघन आहे. हा निर्णय म्हणजे ओबीसी, भटक्या आणि विमुक्त समाजाच्या आरक्षणात छुप्या मार्गाने घुसखोरी करण्याचा प्रयत्न आहे असा हल्लाबोल यावेळी करण्यात आला.

## मेटपांजरा ते मरकसुर रस्त्याची दुरवस्था

### ग्रामस्थांनी लावले रस्त्याच्या खड्ड्यात काटेरी झाडे

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २१ :

तालुक्यातील मेटपांजरा -मरकसुररोडवर मौजा मेटपांजरा हद्दीत, रस्त्यावर मोठा खड्डा पडल्याने नागरिक, विद्यार्थी व भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या नवरात्री उत्सवाला प्रारंभ होत असून, गावातील भवानी मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांची प्रचंड वदर्ळ अपेक्षित आहे. तसेच मरकसुर, वाजबोडी व परिसरातील अनेक विद्यार्थी काटोल व मेटपांजरा येथे शिक्षणासाठी नियमित ये-जारतात. अशा परिस्थितीत या खड्ड्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपघात टाळण्यासाठी खबरदारी म्हणून ग्रामस्थांनी तात्पुरत्या स्वरूपात त्या खड्ड्यात काटेरी झाडे ठेवून इशारा दिला आहे. या संदर्भात मेटपांजरा सरपंच अनिल नेहारे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता तसेच काटोल उपविभागीय बांधकाम अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली असून, नवरात्री महोत्सव काळात भाविक व सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. गावकऱ्यांनीही प्रशासनाने त्वरीत लक्ष देऊन खड्ड्याची दुरुस्ती करून घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



## महाकाली मंदीर परिसरात तुळस रोपट्याचे वाटप



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

येथील खडगाव मार्गावरील महाकाली मंदीराच्या प्रांगणात माजी उपसरपंच आनंदबाबू कदम यांच्या उपस्थितीत ७५ तुळस रोपट्याचे वितरण करण्यात आले. सर्वप्रथम मंदीर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्राणवायू देण्याचे काम तुळशीचे रोपटे करते. तुळस ही बहुगुणी यांनी आयुर्वेदिक वनौषधी आहे. यामुळे तिचे महत्त्व लक्षात घेता घरोघरी तुळशीचे रोपण करणे आज गरजेचे आहे.

असे प्रतिपादन आंनदबाबू कदम यांनी केले. यावेळी आंनदबाबू कदम, युवराज गुप्ता, पुरुषोत्तम चौधरी, अमीत रॉय, प्रकाश भांडवलकर, श्रीनिवास राव, मुकुंद पवार, राजेंद्र सुर्यवंशी, दत्ता बाबर, पांडुरंग गभणे, हरपाल शाहू, मनमोहन कुमावत, मोहन जवादे, सुरेश बारई, राकेश चिल्लुरे, मयुर चौधरी उपस्थित होते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SHEIKH JARIB SHEIKH RAHUF ATTAR.** NOW MY NEW NAME IS **JARIF RAHUF SHEIKH.**
**ADD** : WARD NO. 6, TAH - MUL CHANDRAPUR - 441224.

MY OLD NAME WAS **MOHAMMED HAROON PAREKH.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD HAROON DAOOD PAREKH.**
**ADD** : PLOT NO C/26 MAHESH NAGAR SHANTI NAGAR ROAD, NAGPUR 440002 (MS).

MY OLD NAME WAS **MUNIRA ILYAS AKHTER MILLWALA.** NOW MY NEW NAME IS **ILIYAS MILLWALA.**
**ADD** : H-398 RAZIA VILLA B/H BATA COMPANY KHAPRIPURA, NAGPUR 440002 (MS).

MY SON OLD NAME WAS **HUSSAIN.** NOW MY SON NEW NAME IS **HUSSAIN ALI AKBAR AKHTAR.**
**ADD** : PLOT NO 353 F NO 403 BURHANI MANZIL DHIMARPURA NAGPUR 440002 (MS).

### निधन वार्ता

**राजेश वासनीक**
**वाडी, २१ सप्टेंबर**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोवारगोंधी ( मन्नाथखेडी ) ता. नरखेड येथील कार्यरत शिक्षक राजेश पांडुरंग वासनीक यांचे कर्करोगाच्या आजाराने निधन झाले. ते ५२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी , सात वर्षाची मुलगी व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

त्यांच्या पार्थिवावर सोमवार २२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जरीपटका, नारा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

## लक्ष्मीबाई केळकर शास.औ. संस्थे तर्फे स्वच्छता अभियान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

लक्ष्मीबाई केळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागपूर मुलींची ,जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर उपवि.

कार्यालय नागपूर ग्रामपंचायत विहीरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान विहीरगाव या गावी राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानाच्या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी अतिरिक्त जिल्हाधिकारी मिहीर उपविभागीय अधिकारी , वंदना संगणपते, तहसीलदार डहाट उपकार्यकारी अधिकारी जि.प., जाधव, बोराडे, शिंगणे जिल जि. आरोग्य अधिकारी जयस्वाल सरपंच शिंदे ,सदस्य पदाधिकारी विहीर गावचे नागरिक व औ प्र. संस्थेच्या प्रशिक्षणार्थींनी मोठ्या संख्येने स्वच्छता अभियानात सहभागी झाल्या. स्वच्छता अभियान राबवून गावातील प्रमुख रस्त्यांची शाळा ग्रामपंचायत, दवाखाना परिसराची स्वच्छता करण्यात आली यामध्ये सर्व कर्मचारी अधिकारी प्रशिक्षणार्थी व गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.



स्वच्छता अभियान स्वच्छता ही सेवा आहे व मुख्यमंत्री गाव समृद्ध योजना ,सेवा पंधरवडा योजनांची माहिती दिली .

## आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती.

अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती.

त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले.

शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले.

४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले.

बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या.

वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली.

या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली.

आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली.

रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कायार्चा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३८ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. जयंतीदिनी कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जि. पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■

## दवलामेटीत स्मार्ट मिटर विरोधात वंचितचे ठिय्या आंदोलन

# ग्राहकला न विचारताच लावले मीटर

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

ग्राहकांची परवानगी न घेता स्मार्ट मीटर लावल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी नागपूर ग्रामीण तालुक्याचे कार्यकर्ते वाडी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलनात बसले. भीम शक्ती युवा मंच,स्थानिक नागरिक व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सोनबानगर येथील वीज वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता यांना मागील आठवड्यात ग्राहकाला न विचारता विजेचे स्मार्ट मीटर बसवू नये, अशा आशयाचे निवेदन सादर केले होते. यावेळी सहाय्यक अभियंता निवेदनकर्त्यांना दवलामेटी, सोनबानगर यांनी ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर लावण्यात येणार नाही, असे आश्वासित केले होते. परंतु १५सप्टेंबर रोजी अभिजित मेश्राम रा. मोवाडे ले-आऊट दवलामेटी हे घरी नसताना त्यांचे जुने मीटर काढून त्याऐवजी स्मार्ट मीटर बसवले. या प्रकरणाची दखल घेऊन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने १५ तारखेला पोलीस स्टेशनला तक्रार देण्यात आली होती. या बाबीची विचारणा करण्यासाठी शुक्रवारी रात्री कार्यकर्ते वाडी पोलिस स्टेशनला पोहचून संबंधितावर गुन्हा नोंद करण्याच्या मागणीसाठी ठिय्या धरून बसले. शेवटी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांनी सोमवारपर्यंत कार्यवाही करतो, असे सांगितल्यामुळे कार्यकर्ते शांत झाले. गुन्हा नोंद न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा मानस यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा सचिव सोनिया वानखेडे, युवा आघाडी अध्यक्ष मनीष बोरकर, तालुका कार्याध्यक्ष नागेश बोरकर, ग्रा.पं. सदस्या अर्चना बन्सोड ,विनायक घुमटकर, राजेश वानखेडे, श्रीकांत रामटेके, गीता मेश्राम, दर्शन बेले, अभिजित मेश्राम, रमेश गजभिये, राजेंद्र गजभिये, पुंडलिक गजभिये उपस्थित होते.



### नवरात्रोत्सवा निमित्य शालेय नृत्य स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर , दि. २१ :

धर्मापूर येथील श्री भिमादेवी नवयुवक सेवा मंडळांच्या वतिने नवरात्री उत्सवा निमित्य दोन दिवसीय शालेय समुह नृत्य स्पर्धेचे आयोजन दि. २३व २४ सप्टेंबर ला करण्यात आले आहे.

ही समुह नृत्य स्पर्धा दोन गटात घेण्यात येणार असून यात वर्ग १ ते ४ ब गट व वर्ग ५ ते १० वर्ग (अ गट ) असे दोन गट राहणार असून दोन्ही गटाकरीता प्रथम परितोषिक ३००० रुपये स्मृतिचिन्ह, द्वितीय २००० रुपये व स्मृतिचिन्ह, तृतीय १००० रुपये व स्मृतिचिन्त विजेत्या संघाला देण्यात येणार आहे. ही स्पर्धा प्रवेश फी निशुल्क असून स्पर्धकरीता सहभागी टिमकरीता भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.

तरी तालुक्यातील बहुसंख्य शाळांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवहान मंडळाच्या वतिने करण्यात आले आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# कॅलिडोस्कोप



## नेहरूंच्या बंगल्याची अकराशे कोटींना विक्री

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा बंगला अलिकडेच ११०० कोटी रुपयांना विकला गेला. हे भारतातील सर्वात मोठे प्रॉपर्टी डील मानले जात आहे. हा करार देशातील आतापर्यंतचा सर्वात महागडा मालमत्ता करार आहे. लुटियन्स असे या बंगल्याचे नाव आहे. लुटियन्स बंगला दिल्लीतील १७ मोतीलाल नेहरू मार्ग (पूर्वीचे यॉर्क रोड) येथे आहे. हा बंगला १४,९७३ चौरस मीटर म्हणजेच सुमारे ३.७ एकरमध्ये पसरलेला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू हे पंतप्रधानांचे पहिले होते. के त्यांचे अधिकृत निवासस्थान होते. हा बंगला १,४०० कोटी रुपयांना विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. भारतीय पेय उद्योगाशी संबंधित एका मोठ्या व्यावसायिकाने सुमारे १,१०० कोटी रुपयांना हा बंगला खरेदी केला.

राजकुमारी कक्कर आणि बीना राणी या या बंगल्याच्या सध्याच्या मालक आहेत. दोघीही राजस्थानच्या एका राजघराण्यातील आहेत. सुमारे २४ हजार चौरस फूट जागेत बांधलेल्या या प्रचंड मालमत्तेची विक्री करण्यासाठी गेल्या वर्षभरापासून चर्चा सुरू होती.

नेमके स्थान, व्हीव्हीआयपी दर्जा आणि आकार लक्षात घेता ही एक अतिशय मौल्यवान मालमत्ता आहे; परंतु किमतीमुळे फक्त एक अब्जाधीश खरेदीदारच त्यात रस दाखवू शकला. ही मालमत्ता लुटियन्स बंगला झोनमध्ये आहे. ती १९१२ ते १९३० दरम्यान ब्रिटिश वास्तुविशारद एडविन लुटियन्स यांनी डिझाइन केली होती. सुमारे २८ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेल्या या परिसरात सुमारे ३,००० बंगले आहेत, ज्यात बहुतेक मंत्री, न्यायाधीश आणि वरिष्ठ सरकारी अधिकारी राहतात. येथे सुमारे ६०० खासगी मालमत्ता आहेत, ज्या भारतातील सर्वात श्रीमंत लोकांच्या मालकीच्या आहेत. या कराराच्या पूर्ततेनंतर १७ मोतीलाल नेहरू मार्गावरील हा बंगला देशातील सर्वात महागड्या निवासी मालमत्तेच्या विक्रीचा एक नवा विक्रम प्रस्थापित करेल.

## भारतात होते डायनॉसॉरचे अस्तित्व

भारताच्या इतिहासात डोकावलं असता काही वैभवसंपन्न गोष्टी नजरेसमोर येतात आणि अनेकांच्या भुवया उंचावतात. याच भारतात डायनॉसॉरचं अस्तित्व होतं असं कोणी सांगितलं तर विश्वास बसणार नाही, मात्र हे सत्य आहे. आतापर्यंत 'ज्युरासिक पार्क' नावाच्या चित्रपटाच्या सीरिजमुळे डायनॉसॉरसारख्या महाकाय प्राण्याच्या अस्तित्वाविषयी अनेकांना माहिती मिळाली. अर्थाच चित्रपटाच्या आधीपासून विविध संदर्भांमध्ये लिखित स्वरुपातही डायनॉसॉरची माहिती उपलब्ध आहे, हे नाकारता येत नाही; पण भारतात नुकत्याच झालेल्या संशोधनातून ही असामान्य बाब समोर आली आहे. भारतीय संशोधकांना साधारण मगर– डायनॉसॉरसारख्या आकाराच्या प्राण्याचे अवशेष सापडले आहेत. ज्युरासिक काळातील हे अवशेष राजस्थानच्या जैसलमैरमधील निर्मनुष्य भागात सापडले असून या संशोधनामुळे राजस्थानमधील या भागाबाबतची चर्चा एकाएकी वाढली आहे. संशोधकांच्या माहितीनुसार उत्खननातून समोर आलेले हे अवशेष फायटॉसॉरचे असून ते साधारण १.५ ते २ मीटर इतक्या आकाराचे आहेत. साधारण २०० मिलियन वर्षांपूर्वीचे हे अवशेष ज्युरासिक कालखंडाच्या सुरुवातीचे अवशेष असल्याची माहिती आहे. सेमी अॅक्वॅटिक रेप्टाईल्स या श्रेणीत या प्राण्याची गणती होत असून, सध्याच्या मगरीचे ते पूर्वज असल्याचं म्हटलं जातं. जैसलम



`रच्या मेघा गावातील एका पुरातन ठिकाणी हे अवशेष सापडले. तिथे असणाऱ्या या भौगोलिक रचना पाहता डायनासोरच्या कालखंडामध्ये इथे जीवसृष्टी अस्तित्वात असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे. या संशोधनाचं नेतृत्त्वं डॉ. नारायणदास इन्खिया यांनी राजस्थानच्या पाणी खात्याशी समन्वय साधत केलं.

संशोधकांच्या मते या भागात अशी आणखी अनेक रहस्य दडलेली असू शकतात, जी समोर आणणं आव्हानात्मक काम आहे. दरम्यान, प्राथमिक स्वरुपात या अवशेषांची माहिती एका तलावाच्या उत्खननावेळी स्थानिक गावकऱ्यांना मिळाली. मातीत खोदकाम करत असताना सापळ्यासम काही अवशेष दिसताच त्यांनी यासंदर्भातील माहिती संबंधित शासकीय विभागाला दिली. त्यानंतर आणखी खोदकाम केलं असता तिथे फायटॉसॉरचे अवशेष आणि कैक वर्षांपासून तिथंच राहिलेली या प्राण्याची जीवाश्म रुपातील अंडीसुद्धा सापडली. त्यामुळे इथे हा जीव नदीकाळी कैक वर्षांपूर्वी बऱ्याच काळासाठी वास्तव्यास असल्याच्या प्राथमिक निष्कर्षावर संशोधक सध्या पोहोचले आहेत.



## अन्नदानाच्या निमित्ताने...

इटलीची राजधानी रोमचे रहिवासी डिनो इम्पेग्लिआजो ९२ वर्षांचे आहेत. गेल्या १५ वर्षांपासून ते अन्नादानाचं पुण्यकर्म करत आहेत. गरीबांचे शेफ अशीच त्यांची ओळख आहे. डिनो शहरातल्या गरीब आणि बेघर लोकांना जेवण देतात. आठवड्यातले तीन दिवस ते अन्नदान करतात. गरीबांना अन्नदान करण्यासाठी त्यांनी खास स्वयंपाकघर तयार केलं आहे. या कामासाठी त्यांनी एक टीम तयार केली आहे. हे जेवण शहरातल्या तीन रेल्वे स्थानकांलगतच्या गरीबांमध्ये तसंच शहरातल्या प्रसिद्ध सेंट पीटर्स स्क्वेअर परिसरात वाटलं जातं. या चांगल्या कामासाठी त्यांनी एक संस्था तयार केली आहे. या संस्थेत ३०० लोक काम करतात. हे लोक निधी गोळा करतात. या निधीचा वापर अन्नदानासाठी केला जातो. १५ वर्षांपूर्वी डिनो यांची एका गरजूशी भेट झाली होती. हा गरजू त्यांना रेल्वे स्थानकावरच भेटला होता. त्यानंतर त्यांना अशा प्रकारे अन्नदान करण्याची कल्पना सुचली. या गरजूने त्यांच्याकडे खाण्यासाठी पैसे मागितले होते. मग आपणच अशा असंख्य गरजूंना मदत करायला हवी, असं त्यांच्या मनात आलं आणि इथूनच त्यांच्या अन्नदानाच्या प्रवासाला सुरूवात झाली.

## अंबानी, अदानी, मस्कपेक्षाही श्रीमंत व्यक्ती!

अमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत; पण इतिहासाच्या पानांमध्ये अशा एका व्यक्तीची संपत्ती दडली आहे की त्याची तुलनाच होऊ शकत नाही. आजच्या सर्वात श्रीमंत लोकांपेक्षाही ही संपत्ती जास्त होती. त्या व्यक्तीच्या तुलनेत आजच्या काळातील श्रीमंत उद्योगपती अंबानी, अदानी, एलन मस्क हे कुठेच नाही. ही व्यक्ती म्हणजे चौदाव्या शतकातील आफ्रिकी सम्राट मनसा मुसा. ही व्यक्ती कदाचित आत्तापर्यंतची पृथ्वीवरील सर्वात श्रीमंत व्यक्ती असेल आणि त्याच्याइतकी संपत्ती कुणाकडेच नसावी.



मुसाचा जन्म १२८० मध्ये झाला. १३१२ मध्ये तो पश्चिम आफ्रिकेतील विशाल माली साम्राज्याच्या सिंहासनावर बसला. आजच्या मानकांनुसार मुसाच्या संपत्तीचा अंदाज लावल्यास त्याची किंमत ४०० अब्ज डॉलर्स इतकी भरेल. आजच्या काळातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या जेफ बेझोस यांच्यापेक्षादेखील ही संपत्ती दुप्पट आहे. आजचे श्रीमंत लोकही संपत्तीच्या बाबतीत मुसा यांच्यापेक्षा खूप मागे पडतील. त्याची संपत्ती ही त्याच्या राज्यातील विपुल नैसर्गिक संसाधनांमधून निर्माण झाली. मालीमध्ये बांबुक, वांगारा, बुरे, गालाम आणि तघाझा या खाणींमधून सोने काढले जात असे. मुसाने आयव्हरी कोस्ट, सेनेगल, माली आणि बुर्किना फासोसह अनेक समकालीन आफ्रिकन देशांवर राज्य केले. टिंबक्टू ही मुसाची शाही राजधानी होती. असं म्हटलं जातं, की तो त्याच्याकडे मदत मागणाऱ्यांना भरभरून सोनं देत असे. त्याने घेतलेल्या अनेक निर्णयांचे इतिहासात कौतुक केले जाते.

या सम्राटाकडे नैसर्गिक संसाधनांसह मोठ्या जमिनी होत्या. १३२४ मध्ये मनसा मुसा हे हज यात्रेसाठी मक्काला गेले होते. या प्रवासामुळे त्यांचे नाव इतिहासातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून अजूनही नोंदवले जाते. हजसाठी जाणारा त्यांचा कारवा सहारा वाळवंट ओलांडणारा आतापर्यंतचा सर्वात मोठा ताफा होता. या अहवालात दावा करण्यात आला आहे की मनसा मुसा सोनं लादलेले १०० उंट, १२००० नोकर आणि ६० हजार गुलाम यांच्या ताफ्यासह सौदी अरेबियातील मक्का येथे प्रवासाला निघाला होता. इतिहासकारांचा अंदाज आहे की या प्रवासात मुसाने १८ टन सोने वाहून नेले होते. सध्याच्या भावानुसार, त्याची किंमत सुमारे एक अब्ज डॉलर्सच्या आसपास आहे. इतिहासातील सर्वात श्रीमंत राजा म्हणून मानसा मुसाचे नाव घेतले जाते. मुसाच्या संपत्ती आणि उदारतेच्या इतक्या कथा आहेत, की आजचे अब्जाधीश त्याच्यासमोर खूपच मागे पडतील.



## सॅलामँडरची अजब दुनिया

या पृथ्वीतलावर असंख्य सजीव आहेत. प्रत्येक सजीवाचं एक वैशिष्ट्य आहे. काही सजीव पाण्याशिवाय बराच काळ जिवंत राहू शकतात तर काहींना अन्नाशिवायही दिवस काढता येतात. असाच एक सजीव काही न खाता बराच काळ जिवंत राहू शकतो. सॅलामँडर असं या सजीवाचं नाव. हा जीव बोस्निया आणि हर्जेगोविना इथल्या गुहांमध्ये सापडला आहे. गेल्या सात वर्षांपासून हा सॅलामँडर जागेवरून हललेला नाही. सॅलामँडर जवळपास १०० वर्षं जगतो. आपल्या जीवनातला बराच काळ तो पाण्यात घालवतो. स्लोवेनियापासून क्रोएशियापर्यंतच्या प्रदेशात हे प्राणी आढळतात. सॅलामँडर साधारण १२ वर्षांनंतर आपली जागा बदलतात. जोडीदाराच्या शोधासाठी त्याला हालचाल करावी लागते. दुर्गम भागातल्या गुहांमध्ये राहणाऱ्या सॅलामँडरना अन्न मिळतंच असं नाही. त्यामुळे ते बराच काळपर्यंत अन्नाशिवाय राहू शकतात. अशा या सॅलामँडरची दुनिया अजबच म्हटली पाहिजे.

## वाढवा जन्मदर

भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण होतात. मात्र बरेच युरोपियन देश कमी होणाऱ्या लोकसंख्येमुळे चिंतित आहेत. इकडे भारत, चीनसारख्या देशांना वाढती लोकसंख्या सतावत आहे. तिकडे युरोपमध्ये बरेच देश आपल्या नागरिकांना लोकसंख्या वाढवण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. ग्रीस हा सुद्धा असाच एक देश. इथे येत्या ३० वर्षांमध्ये लोकसंख्येत ३३ टक्के घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ग्रीससह फिनलँड, सायप्रस, स्पेन आणि इटली या देशांनाही कमी होत जाणाऱ्या लोकसंख्येने चिंतेत टाकलं आहे. ग्रीसमध्ये महिलांना किंवा जोडप्यांना बाळाला जन्म द्यायला प्रोत्साहन देण्यासाठी बेबी बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रीस सरकारने बेबी बोनससाठी १८०० लाख युरो म्हणजे १४०० कोटी रुपये निधी बाजूला ठेवला आहे.



देशातला जन्मदर वाढवण्यासाठी जोडप्याला दोन हजार युरो म्हणजे जवळपास दीड लाख रुपये बोनस दिला जाईल. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार ग्रीसची सध्याची लोकसंख्या १.७ कोटी आहे. या देशातल्या जन्मदरात वाढ झाली नाही तर पुढच्या ३० वर्षांमध्ये ग्रीसची लोकसंख्या ३३ टक्क्यांनी घटेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. म्हणूनच ग्रीसने तातडीने उपाययोजना केल्या आहेत.

## सगळेच कुंभकर्ण!

बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांना निद्रानाशाचा त्रास होऊ लागला आहे. अपुऱ्या झोपेमुळे बराच त्रास होऊ शकतो. मात्र काही लोक कधीही झोपून जातात. त्यांना उभ्या उभ्याही झोप येते. काहीजण बोलता बोलता किंवा चालता चालता झोपून जातात. आता बोलता बोलता झोप लागू शकते पण चालताना कशी बरं झोप येईल? कझाकिस्तानमधल्या कलाची गावामधले लोक कधीही झोपतात. विशेष म्हणजे त्यांच्या झोपेचं गुपित अजूनही उघड झालेलं नाही. इथले लोक एकदा झोपल्यावर काही महिने उठतच नाहीत. झोपून उठल्यानंतर त्यांच्या काहीच लक्षात रहात नाही. तसंच ते काही तरी असंबद्ध बोलत राहतात. कलाची गावचं हे प्रकरण २०१० मध्ये समोर आलं होतं. त्यावेळी शाळेत गेलेली काही मुलं अचानक झोपी गेली. त्यानंतर बराच काळ ती उठलीच नाहीत. त्यानंतर अशा प्रकारे झोपणाऱ्यांची संख्या वाढत गेली. यानंतर शास्त्रज्ञांनी या भागात संशोधन सुरू केलं. मात्र नेमकं कारण सापडलं नाही. या भागात युरेनियमच्या खाणी आहेत. या खाणींमधून निघालेल्या वायूमुळे झोप येत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. पण याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. याच कारणामुळे इथले लोक दुसरीकडे स्थलांतरित होत आहेत.





## मोठा स्टील उत्पादक; तरी नेलकटरची आयात!

भारत हा मोठा स्टील उत्पादक आहे. असं असूनही नेलकटरसारखी लहानशी वस्तू बनवत नाही. 'वोल्झा' या ग्लोबल ट्रेड प्लॅटफॉर्मच्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान भारताने चीनकडून तब्बल २३,९०० पेक्षा जास्त नेलकटरच्या खेप आयात केल्या. उरलेल्या काही खेप हाँगकाँग आणि दक्षिण कोरियातून आल्या.

एका नेलकटरची आयात किंमत (मालवाहतूक, कर व पॅकेजिंग धरून) सरासरी ०.४१ डॉलर इतकी होती. भारतात सध्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारा कुठलाही संघटित ब्रँड किंवा निर्माता नाही. फक्त काही छोटे, अनब्रँडेड युनिट्सच बाजारात कार्यरत आहेत. नेलकटर वाटते तेवढे साधे नसतात. ते तीक्ष्णपणा, गंजरोधक क्षमता आणि सततचा दबाव सहन करू शकतील, अशा अशा स्टेनलेस स्टीलपासून तयार होतात. चीनने यासाठी वर्षानुवर्षे मजबूत सप्लाय चेन व उत्पादन प्रणाली उभी केली आहे. कमी मजुरी, स्वस्त कच्चा माल आणि सरकारी सबसिडीमुळे ते जगातल्या बाजारावर वर्चस्व राखत आहेत. यासाठी खास मशीनरी, साचे आणि मेटलर्जी लागते. ती भारतात अजूनही मर्यादित आहे.

भारत स्टीलचा जगातील दुसरा सर्वात मोठा उत्पादक असूनही येथील उत्पादनाचा मोठा हिस्सा बांधकाम, पायाभूत सुविधा आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या कमॉडिटी-ग्रेड स्टीलवर आधारित आहे. नेलकटर, सर्जिकल उपकरणे आणि ब्लेडसाठी आवश्यक असलेल्या टूल-ग्रेड स्टेनलेस स्टीलचे उत्पादन मात्र अल्प प्रमाणातच होते. भारतामध्ये मेरठ, लुधियाना, जालंधर आणि राजकोटसारख्या ठिकाणी छोटे उद्योग नेलकटर तयार करतात; पण त्यांची संख्या कमी, एलॉयची गुणवत्ता मर्यादित आणि ब्रँडिंग जवळजवळ शून्य आहे. परिणामी, ही प्रॉडक्ट्स मोठ्या रिटेल किंवा ई-कॉमर्स मार्केटमध्ये स्पर्धा करू शकत नाहीत. वेगासारखे काही भारतीय ब्रँड बाजारात नेल कटर विकतात; मात्र त्यापैकी बहुतांश चीनमध्ये बनवलेले असून भारतात फक्त ब्रँडिंग करून विकले जातात. चीन हा जगातील सर्वात मोठा नेलकटर निर्माता आणि निर्यातदार आहे. अत्याधुनिक ऑटोमेटेड कारखान्यांमधून प्रचंड प्रमाणात उत्पादन केल्यामुळे त्यांना किंमत आणि प्रमाण या दोन्ही बाबतीत फायदा होतो. दक्षिण कोरिया तुलनेने लहान हिस्सा राखतो; पण उच्च-गुणवत्तेच्या ग्रूमिंग आणि प्रीमियम पर्सनल केअर टूल्ससाठी ओळखला जातो.

## टीव्हीवरची पहिली जाहिरात कधी आणि कोणती?

आज आपण दूरदर्शन आणि इतर माध्यमांवर अनेक प्रकारच्या जाहिराती पाहतो; पण भारतातील पहिली टेलिव्हिजन जाहिरात कोणती होती आणि ती कधी प्रसारित झाली, याची माहिती फारच थोड्या लोकांना असेल. आजकाल टीव्हीची जागा इंटरनेटवरील सेवांनी घेतली आहे, पण जाहिरातींचे महत्त्व आजही कायम आहे. भारतात टीव्हीवरील पहिली जाहिरात १ जानेवारी १९७६ रोजी प्रसारित झाली होती. ही जाहिरात ग्वाल्हेर शूटिंग अँड फॅब्रिक्स या कपड्यांच्या कंपनीची होती. या जाहिरातीनंतर भारतीय प्रसारमाध्यमांमध्ये जाहिरातींचे युग सुरू झाले. या जाहिरातींचा उद्देश केवळ वस्तू विकणे नसून, लोकांच्या जीवनशैलीत बदल घडवून आणणे हा होता. तेव्हापासून जाहिरातींची मागणी वाढतच गेली आणि ती प्रसारमाध्यमांसाठी उत्पन्नाचे एक मोठे साधन बनली.

जाहिराती बनवण्यामागे मुख्य कारण म्हणजे ग्राहकांमध्ये उत्पादनाबद्दल जागरूकता निर्माण करणे. वेगवेगळ्या माध्यमांद्वारे जाहिराती प्रसारित केल्या जातात. यामुळे लोकांना वस्तू आणि सेवांबद्दल माहिती मिळते. तसेच, ज्या माध्यमावर जाहिरात प्रसारित होते, त्या संस्थेला त्यातून उत्पन्न मिळते.



जाहिरात कंपन्या आपल्या उत्पादनाच्या प्रसिद्धीसाठी पैसे देतात आणि त्यातून घरोघरी त्यांच्या वस्तूंची माहिती पोहोचवतात.

भारतात रंगीत टीव्हीची सुरुवात १९८२ मध्ये झाली. टीव्हीवर आशियाई खेळांचे प्रक्षेपण सुरू झाल्यावर भारतीय टेलिव्हिजनमध्ये मोठी क्रांती झाली. टीव्हीचे रंगीत जग आल्यावर 'बुनियाद', 'नुक्कड़', 'रामायण' आणि 'महाभारत' यासारख्या कार्यक्रमांनी टीव्हीची लोकप्रियता शिखरावर पोहोचवली. या जाहिरातींनी सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांनाही चालना दिली.१९९० च्या दशकानंतर जाहिरातींचे स्वरूप बदलले. खासगी वाहिन्यांच्या आगमनाने जाहिरातींमध्ये स्पर्धा वाढली. त्यामुळे जाहिराती अधिक आकर्षक आणि व्यावसायिक झाल्या. आजही टीव्ही, इंटरनेट आणि सोशल मीडियावर जाहिरातींचा प्रभाव कायम आहे.

## पोटे आयुर्वेदिक कॉलेजच्या प्राचार्याकडून
# कर्मचारी महिलेचे शोषण
### डॉ. यशमसुंदर भुतडाविरूद्ध बलात्काराचा गुन्हा

■ **महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. २१ :**
शहरालगतच्या कठोरा येथील पोटे पाटील आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या प्राचार्याने मेट्रन पदावर पदोन्नती देण्याचे आमिष देवून एका ४६ वर्षीय परिचारीकेवर अडीच वर्ष वारंवार अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी परिचारीकेने पोलिसात धाव घेतल्यानंतर नांदगाव पेठ पोलिसांनी आज शनिवारी प्राचार्याविरुध्द बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

डॉ. श्यामसुंदर भुतडा (५४), रा. पोटे टाऊनशिप, अमरावती, असे आरोपी प्राचार्याचे नाव आहे. डॉ. भुतडा पोटे आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. पिडीत महिला २०२२ मध्ये याच आयुर्वेदिक महाविद्यालयात परिचारिका म्हणून कामावर लागली होती.

१६ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. भुतडा यांनी तिला सांगितले की, आपल्या महाविद्यालयातील मेट्रन दोन ते तीन महिन्यानंतर निवृत्त होणार आहे. त्यांच्या जागेवर तुला नियुक्ती द्यायची आहे. तु कागदपत्र घेवून मला भेट. पिडीता दुपारी कार्यालयात भेटण्यासाठी गेली होती. त्यावेळी डॉ. भुतडा हे त्यांच्या घरी होते. त्यांनी पिडीतला क्वॉर्टरवर बोलावले.

पिडीता डॉ. भुतडा यांच्या क्वॉर्टरवर गेली. तेंव्हा डॉ. भुतडाने जबरीने अत्याचार केला. तसेच विरोध केला तर नोकरीतून काढण्याची धमकी दिली. नोकरी गेली तर तुझे कुटूंब रस्त्यावर येईल, याऊलट तू मेट्रन झाली तर भरपूर पगार वाढेल, असे सांगून वेळ मारून नेली. त्यानंतर, समिती येत आहे, तुला मेट्रन म्हणून नोकरी मिळणार आहे, असे सांगून वारंवार अत्याचार करत होता. तसेच एका वस्तूच्या मदतीने अनैसर्गिक कृत्यसुध्दा केल्याचे पिडीतेने तक्रारीत नमूद केले आहे. असा प्रकार एप्रिल २०२५ पर्यंत सुरू होता.

दरम्यान एप्रिल २०२५ मध्ये डॉ. भुतडाने पिडीत महिलेला सांगितले कि, तुझी मुलगी आता तरुण झाली आहे. माझ्याच कृपेने ती डिफार्म करत आहे. आता तिला माझ्याकडे पाठव, अशी मागणी डॉ. भुतडाने केल्यामुळे पिडीत महिला चांगलीच चक्रावली.

दरम्यान मुलीला त्यांच्याकडे न पाठवल्यामुळे डॉ. भुतडा याने पिडीत महिलेला एप्रिल २०२५ पासून नोकरीवरुन काढून टाकले. या सर्व प्रकाराचा पिडीतेला प्रचंड मानसिक त्रास झाला व ती दबावात आली होती. त्यातूनच आजारी सुध्दा झाली होती.

आजारी असल्यामुळे याच महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचार घेत होती. मात्र काही दिवसाने उपाचारासाठी गेल्यानंतर पिडीतेला आयुर्वेदिक महाविद्यालयातील संबधितांनी उपचार देणे सुध्दा बंद केले.

कारण तसे तोंडी आदेश डॉ. भुतडा यांनी संबधिताना दिले होते, असेही पोलीस तक्रारीत पिडीतेने नमूद केले आहे. अशी तक्रार प्राप्त होताच नांदगाव पेठ पोलिसांनी डॉ. श्याम सुंदर भुतडाविरुध्द गुन्हा दाखल करुन तपास सुरू केला आहे. या घटनेची शहरात सर्वत्र चर्चा सुरू आहे.

### नावाजलेला पत्रकार ते बलात्काराचा आरोपी

परिचारिकेवर बलात्कार आणि पुढे सतत शारीरिक शोषण करणारा डॉ. श्यामसुंदर भुतडा हा एकेकाळी वर्धा जिल्ह्याच्या आर्वी येथे पत्रकारिता करायचा. मानबिंदू म्हटल्या जात असलेल्या एका मराठी वृत्तपत्रासह आणखी एका इंग्रजी दैनिकासाठी तो तालुका वार्ताहर म्हणून काम करायचा. सावंगी मेघे येथील आयुर्विज्ञान संस्थेत कार्यरत असताना त्याने असेच प्रकार केले होते. त्याचे प्रताप समोर आल्याने सागर मेघेनी नोकरीवरुन काढले होते, अशीही माहिती आहे.

# तुमच्यामुळे जगण्याची नवी ऊर्जा मिळाली साहेब...

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २१ :**
जनसेवा हीच ईश्वरसेवा मानत सदैव गोरगरीब रुग्णांना मदतीचा हात देणारे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याबद्दल आज रविवार २१ सप्टेंबर रोजी हार्ट पेशंट्सने कृतज्ञता व्यक्त केली. जनसंपर्क कार्यक्रमात या रुग्णांनी गडकरी यांची भेट घेतली आणि तुमच्यामुळे जगण्याची नवी ऊर्जा मिळाली, अशा भावना व्यक्त केल्या.

गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमाला नागपूरकर नागरिकांनी गर्दी केली. यावेळी रस्ते, वाहतूक, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, शिक्षण अशा विषयांवरील निवेदने नागरिकांनी दिली. काहींनी रोजगाराच्या संधी, तरुणांसाठी कौशल्यविकास केंद्रे आणि परिसरातील विकासकामांच्या गतीबाबत मागण्या मांडल्या.

यावेळी बायपास, अँजिओप्लास्टी तसेच वॉल रिप्लेसमेंट झालेल्या रुग्णांनी गडकरी यांची भेट घेतली. गडकरी यांनी आजवर शेकडो हार्ट पेशंट्सच्या शस्त्रक्रिया केल्या आहेत. त्यांच्याच प्रेरणेतून सामाजिक कार्यकर्ते संतोष यादव गोरगरीब रुग्णांपर्यंत ही सेवा पोहोचवत असतात. जनसंपर्क कार्यक्रमात त्यांच्यासोबत जवळपास दहा रुग्ण गडकरींप्रती कृतज्ञता व्यक्त करायला आले होते. यामध्ये सर्वच





### हृदयविकाराच्या रूग्णांनी मानले नितीन गडकरी यांचे आभार

वयोगटातील रुग्णांचा समावेश होता.

क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनी देखील गडकरी यांची भेट घेतली. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचे गडकरी यांनी कौतुक केले व भविष्यातील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. दुर्गा उत्सव मंडळांनी नवरात्रोवत्साला भेट देण्याचे निमंत्रण गडकरींना दिले.

लोकांनी दिलेल्या निवेदनांवर गडकरी यांनी चर्चा करून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

काही प्रकरणांमध्ये थेट फोनवरून संपर्क साधत प्रश्नांचे ऑन दि स्पॉटनिराकरण करण्यात आले. नागरी सुविधांच्या संदभार्तील मागण्या, शासकीय योजना आदी विषयांशी संबंधित निवेदने नागरिकांनी दिलीत.

# राज्यातील बोगस दिव्यांगांची झाडाझडती घेणार!

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** आपल्या धडाडीच्या कामासाठी ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे पुन्हा एकदा ॲक्शन मोडवर आले आहेत. सध्या राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या मुंढे यांनी, बोगस दिव्यांग प्रमाणपत्र वापरून सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्यांविरुद्ध मोठी मोहीम हाती घेतली आहे. त्यांनी राज्यातील सर्व 34 जि. प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना यासंदर्भात लेखी आदेश दिले आहेत.

आदेशानुसार, जिल्हा परिषदेतील शिक्षण, आरोग्य, बांधकाम यासह सर्व विभागांतील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. या आदेशामुळे बोगस प्रमाणपत्र वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**'समावेशक' समाजावर भर**

तुकाराम मुंढे यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून त्यांच्या भूमिकेचे स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. त्यांना समाजात योग्य स्थान मिळवून देणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे आपले कर्तव्य आहे. 'समावेशन, सन्मान आणि समान संधी' यावरच खऱ्या अर्थाने सक्षम समाजाची पायाभरणी होते, असेही त्यांनी म्हटले आहे.

**कठोर कारवाईचे संकेत**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, बोगस दिव्यांग व्यक्तीला दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. दिव्यांग कल्याण विभागाकडे अशा अनेक तक्रारी आल्या आहेत, ज्यात अनेक कर्मचारी बोगस दिव्यांगत्वाचा लाभ घेत असल्याचे म्हटले आहे.



या तक्रारींची दखल घेऊन मुंढे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना महिन्याभरात तपासणीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

जर एखाद्याचे प्रमाणपत्र बनावट किंवा चुकीचे आढळले, किंवा दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा कमी असेल, तर अशा कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व लाभ तात्काळ बंद करावेत आणि त्यांनी आतापर्यंत घेतलेल्या लाभांवर कारवाई करावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

**२० वर्षात २३ वेळा बदली**

कर्मचाऱ्यांना कडक शिस्त लावण्याच्या हेतूनं तुकाराम मुंढे निर्णय घेतात. तेच त्यांच्या बदलीचं कारण ठरते, 20 वर्षांच्या कारकीर्दीत त्यांची तब्बल 23 वेळा बदली झाली आहे.

## उद्योगपती मनोज जायस्वालला
# सीबीआयकडून अटक
### ११ हजार कोटींचा कर्ज घोटाळा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २१ :**
कोळसा घोटाळा प्रकरणातील आरोपी असलेले उद्योगपती मनोज जायस्वाल यांना 11 हजार कोटी रुपयांच्या कर्ज घोटाळ्याप्रकरणी सीबीआयने अटक केली आहे. सध्या जायस्वाल यांची कसून चौकशी सुरू आहे.

निरव मोदी आणि विजय मल्ल्या यांनी बुडवलेल्या कर्जाएवढाच मनोज जायस्वाल यांचा घोटाळा असल्याचा आरोप आहे. विविध बँकांकडून घेतलेल्या 11,000 कोटी रुपयांचा निधी वेगवेगळ्या कामांसाठी वापरल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

बँकांकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज हे या रकमेपेक्षाही जास्त आहे. 2017 मध्ये मनोज जायस्वाल यांना सीबीआयने अटक केली होती आणि या प्रकरणात ते जामिनावर होते. गेल्या काही वर्षांपासून त्यांनी आपला व्यवसाय आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे हलवला होता.

सुमारे दहा वर्षांपूर्वी मनोज जायस्वाल यांनी बॉम्बार्डियर नावाचे एक विमान खरेदी केले होते. एवढे मोठे विमान घेणारे ते महाराष्ट्रातील मोजक्या उद्योगपतींपैकी एक होते. हे विमानही कर्जाच्या पैशांतून घेतल्याचा आरोप आहे.

गेल्या नऊ वर्षांपासून हे विमान नागपूर विमानतळावर धूळ खात पडले आहे. अनेक कर्जदार बँकांनी हे विमान विकून कर्ज वसूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात यश आले नाही.

यूपीए सरकारच्या काळात झालेल्या कोळसा घोटाळा प्रकरणात तत्कालीन कोळसामंत्री श्रीप्रकाश जायस्वाल आणि मनोज जायस्वाल यांनी देशभरातील अनेक कोळसा खाणी अनुभव नसलेल्या उद्योगांना वितरित करण्यासाठी दलाली घेतल्याचा आरोप आहे. यासंदर्भात ईडी आणि सीबीआयने त्यांच्या विरोधात केसेस दाखल केल्या आहेत.

तज्ज्ञांच्या मते, जयस्वाल यांना २०,००० कोटी रुपयांच्या बँक फसवणुकीच्या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात सीबीआय आणि ईडीने अनेक मालमत्ता जप्त केल्या आहेत.

अधिकाऱ्यांच्या मते, मेसर्स कॉर्पोरेट पॉवर लिमिटेड आणि त्यांचे प्रवर्तक आणि संचालक मनोज जयस्वाल, अभिजीत जयस्वाल आणि अभिषेक जयस्वाल हे या प्रकरणात सहभागी आहेत. त्यामुळे या प्रकरणात इतरांनाही अटक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

अंमलबजावणी संचालनालय आणि सीबीआय गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकरणात सामील लोकांच्या मालमत्ता जप्त करीत आहेत आणि संबंधितांवर छापेही टाकत आहेत. अनेकांना अटकही केली आहे. यावेळी, हे प्रकरण गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे आणि त्यांची कोलकाता येथील सीबीआय कार्यालयात सखोल चौकशी केली जात आहे.

## ईपॅक प्रीफॅब टेक्नॉलॉजीजचा आयपीओ बुधवारी उघडणार

ईपॅक प्रीफॅब टेक्नॉलॉजीज लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी २ रुपये दर्शनीमूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १९४ रु. ते २०४ रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा इश्यू) बुधवार, २४ सप्टेंबर २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, २६ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल.

गुंतवणूकदार किमान ७३ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ७३ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ ३०० कोटी रुपयांपर्यंतचा एक नवीन इश्यू आहे आणि १०,०००,००० शेअर्सपर्यंत विक्रीसाठी ऑफर आहे.

या नवीन इश्यूमधून मिळणारे १०२.९ कोटी रुपयांचा निधी राजस्थानच्या शाहजहांपूर येथील घीलोथ औद्योगिक क्षेत्र येथे सँडविच इन्सुलेटेड पॅनेलच्या कायम उत्पादनासाठी आणि प्री-इंजिनिअर्ड स्टील बिल्डिंगच्या निर्मितीसाठी नवीन




उत्पादन सुविधा उभारण्यासाठी भांडवली खर्चाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरले जाईल. तसेच, आंध्र प्रदेशातील मंबट्टू (युनिट ४) येथील विद्यमान उत्पादन सुविधेच्या विस्तारासाठी भांडवली खर्चासाठी ५८.१ कोटी रुपये वापरण्यात येतील जेणेकरून प्री-इंजिनिअर्ड स्टील बिल्डिंग क्षमता वाढेल. कंपनीने घेतलेल्या काही कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड आणि / किंवा पूर्व-पेमेंटसाठी आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी ७० कोटी रुपये वापरण्यात येतील. ■ ■

**लोकार्थ**

## अबक्कस फंड आणि सिंग्युलॅरिटी ग्रोथ फंडतर्फे जारो इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मध्ये गुंतवणूक

जारो इन्सिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मॅनेजमेंट अँड रिसर्च लि. या ऑनलाइन उच्च शिक्षण क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांपैकी एका कंपनीने आयपीओ पूर्व फंडिंग राउंडमध्ये प्रतिष्ठित गुंतवणुकदारांकडून 115 कोटी रुपयांचा निधी यशस्वीपणे उभारला आहे.

सुनील सिंघानिया यांचा अबक्कस डायव्हर्सिफाइड अल्फा फंड, मधू केला यांचा सिंग्युलॅरिटी ग्रोथ अपॉर्च्युनिटी फंड आणि सिंग्युलॅरिटी इक्विटी फंड, सुभकाम व्हेंचर्स आणि फॅमिली ऑफिस ऑफ पॉलीकॅब अशा आघाडीच्या गुंतवणुकदारांनी या राउंडमध्ये गुंतवणूक केली आहे. रेयर एंटरप्राइसचे उत्पल शेठ, फॅमिली ऑफिस ऑफ सुप्रीम इंडस्ट्रीज आणि देवेन चोक्सी अशा इतर गुंतवणुकदारांनीही कंपनीत आयपीओपूर्व गुंतवणूक केली आहे.

कंपनी आगामी आयपीओद्वारे 450 कोटी रुपये उभारत आहे. आयपीओ या महिन्यात खुला होणे अपेक्षित आहे. 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या वर्षात जारो एज्युकेशनने 254,02 कोटी रुपयांचे निव्वळ उत्पन्न आणि 51.67 कोटी रुपयांचा करोत्तर नफा नोंदवला आहे. कंपनीने 10 रुपये दर्शनी मूल्य असलेल्या प्रत्येक शेयरवर 10 टक्के लाभांशही जाहीर केला आहे. जारो एज्युकेशने मजबूत भागिदारी स्थापन केल्या असून सध्या 7 आयआयटीज, 7 आयआयएम्स आणि 22 आघाडीच्या विद्यापीठांबरोबर काम करत आहे. त्यामध्ये सिम्बायसिस, अमिटी, मणीपाल, लॉयला कॉलेज, वेलिंगकर इन्स्टिट्यू ऑफ मॅनेजमेंट, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आयआयएससी) यांचा समावेश आहे. ■ ■

## मॅपिक इंडियाची उत्साहवर्धक सांगता

मॅपिक इंडिया २०२५ या देशातील प्रमुख रिटेल इकोसिस्टाम इव्हेन्टच्या २१ व्या पर्वाचे मुंबईतील जिओ वर्ल्डज कन्वें शन सेंटर येथे यशस्वीरित्या समापन झाले. या दोन-दिवसीय इव्हन्टमध्ये परिवर्तनात्मक चर्चा, उच्चस्तरीय लॉचेस आणि प्रतिष्ठित रिटेल अवॉर्ड्स पाहायला मिळाले, जेथे क्षेत्रातील उत्कृहष्टयतेला सन्मानित करण्यात आले. या वर्षाची थीम 'नेक्स्ट -जनरेशन रिटेल : नेव्हिगेटिंग डिसरप्शकन, सीझींग ऑपोर्च्युनिटीज'मध्ये (भावी किरकोळ विक्रीः अडथळ्यांना दूर करणे, संधींचा फायदा घेणे) भारतातील व परदेशातील २,५०० हून अधिक प्रतिनिधी, ३७५ प्रदर्शक आणि १५० हून अधिक प्रवक्ते एकत्र आले.

उद्योग प्रमुखांनी भारतातील रिटेल बाजारपेठेमधील २ ट्रिलियनच्या, विकासगतीचा अनुभव घेतला, ज्यामधून त्यांच्या निदर्शनास आले की, तंत्रज्ञान, ग्राहक वर्तणूकीमधील बदल आणि शाश्वतता क्षेत्राच्या भविष्यारला नवीन आकार देत आहेत. खास आकर्षण म्हरणजे, आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेलचा युवा-केंद्रित ब्रँड OWND लॉंच करण्याकत आला. हा ब्रँड जनरेशन झेड ग्राहकांवर लक्ष्य करतो आणि पुढील तीन ते पाच वर्षांमध्ये ४०० आऊटलेट्सपर्यंत विस्तार करण्याची योजना आहे. डेलॉइटने बंद दाराआड गोलमेज परिषद आणि थीमॅटिक सत्रांचे आयोजन केले, ज्यामध्येर स्पर्धात्मक विक्रीसाठी प्रमुख स्त्रोत म्हषणून पुरवठा साखळी स्थिरता आणि शाश्वततेला निदर्शनास आणले.

या दोन-दिवसीय इव्होवटकमध्ये पॉवर-पॅक पॅनेल्सचा समावेश होता जसे 'द $2 ट्रिलियन रिटेल ड्रिम', 'स्कासय हाय रिटेलः एअरपोर्ट्स अँज शॉपिंग सुपरहब्सर' आणि 'प्ल्रॅनेट फर्स्टन, फ्यूचर फॉरवर्ड', जेथे शॉपर्स स्टॉलप, पिज्झा हट, पीव्हीयआरआयनॉकस, लॅकोस्टेग, स्वाआरोव्कीहषद, मिंत्रा, हाइडसाइन, द स्लीटप कंपनी अशा ब्रँड्समधील प्रमुखांनी रिटेलमध्ये लाभक्षमता व उद्देशामधील संतुलनावर चर्चा केली. ■ ■

## २३ सप्टेंबर रोजी उघडणार आनंद राठी शेअर अँड स्टॉक ब्रोकचा आयपीओ

आनंद राठी शेअर अँड स्टॉक ब्रोकर (कंपनी)ने त्यांच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफर ऑफ इक्विटी शेअर्स (आयपीओ किंवा इश्यू) साठी प्रत्येक ५ रुपये दर्शनीमूल्य




असलेल्या इक्विटी शेअरचा किंमतपट्टा ३९३ ते ४१४ रुपये (इक्विटी शेअर्स) निश्चित केला आहे.

हा आयपीओ मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २५ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ३६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३६ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ ७,४५०.०० दशलक्ष रुपयांपर्यंतचा एक नवीन इश्यू आहे.

या नवीन इश्यूमधून ५,५००.०० दशलक्ष रुपयांपर्यंतचा निधी कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरला जाईल. या तारखेपर्यंत ४४,७१४,५५८ आऊटस्टँडिंग असलेले इक्विटी शेअर्स प्रत्येकी ५ रुपयांचे आहेत. कंपनी भारतातील एक स्थापित पूर्ण-सेवा ब्रोकरेज हाऊस आहे, ज्याला ३० वर्षांहून अधिक अनुभव आहे. कंपनी किरकोळ, उच्च निव्वळ मूल्य असलेल्या व्यक्ती, अति-उच्च निव्वळ मूल्य असलेल्या व्यक्ती आणि संस्थांमधील विविध क्लायंटना आनंद राठी ब्रँड अंतर्गत ब्रोकिंग सेवा, मार्जिन ट्रेडिंग सुविधा आणि वित्तीय उत्पादनांचे वितरण प्रदान करते. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# पोलिसांनी काढली गुंडांची धिंड

■ **वृत्तसंस्था, पुणे,, दि. २१ :**
पुण्यात गँगवार पुन्हा एकदा उफाळून आल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी गुंडांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. कोथरूड परिसरात कुख्यात नीलेश घायवळ टोळीच्या सदस्यांनी एका व्यक्तीवर गोळीबार केला, ज्यात 36 वर्षीय प्रकाश धुमाळ गंभीर जखमी झाले. त्यांच्या मानेला आणि मांडीला गोळ्या लागल्या असून, सध्या त्यांच्यावर सह्याद्री रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत गोळीबार करणाऱ्या गुंडांची धिंड काढली. या कारवाईतून पोलिसांनी गुन्हेगारांना जरब बसवण्याचा प्रयत्न केला आहे. पोलिसांनी दाखवलेल्या या कठोर भूमिकेमुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

अलीकडेच कोथरूड परिसरात झालेल्या गोळीबार प्रकरणात, पोलिसांनी कुख्यात गुंड नीलेश घायवळ टोळीच्या पाच सदस्यांची धिंड काढली. यात मयूर कुंबरे, मयंक व्यास, गणेश राऊत, दिनेश फाटक आणि आनंद चादलेकर यांचा समावेश आहे. या गुंडांनी ज्या भागात दहशत माजवली, त्याच भागातून पोलिसांच्या संरक्षणात त्यांची धिंड काढण्यात आली, जेणेकरून जनतेमध्ये पोलिसांवर विश्वास निर्माण होईल आणि गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती बसेल.

# विश्वासार्हतेतून गोरगरिबांच्या घराची स्वप्नपूर्ती

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २१ :**
व्यापक जनहित डोळ्यापुढे ठेवून आजवर काम करीत आल्याने माय-बाप जनतेने मला महसूलमंत्री म्हणून स्वाक्षरी करण्यापर्यंतची संधी दिली. जनतेप्रती कृतज्ञता व तुम्ही दिलेल्या विश्वासार्हतेच्या बळावर आज कोराडी, महादुला, कामठीसह नागपूरच्या विविध भागात अनेक वर्षांपासून झोपडीत राहणाऱ्या व्यक्तींना जागेच्या मालकीचा पट्टा अर्थात जागेची सनद देता येणे शक्य झाल्याचे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे भावनिक उद्गार
- महादूला येथे जागेच्या सनदेचे पट्टे वाटप
- महादुला बस स्थानक व पोलीस चौकीचे उद्घाटन

सेवा पंधरवडा मध्ये राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील महादुला येथे कोरडी देवीच्या महाप्रवेश द्वाराजवळ आयोजित गरजू लाभार्थ्यांना पट्टे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

याच कार्यक्रमाबरोबर महादूला येथील कोरडी मंदिर टी पॉईंट येथे महादुला बस स्टॉप व पोलीस चौकीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, अप्पर पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे, पोलीस उपायुक्त निकेतन कदम, पोलीस उपायुक्त श्रीमती अश्विनी पाटील, सह पोलीस आयुक्त सत्यवीर बंडीवार आदी वरिष्ठ अधिकारी यांची पोलीस चौकीच्या उद्घाटन समारंभास उपस्थिती होती.

पट्टे वाटप समारंभास उपविभागीय अधिकारी संदीप भस्मे, मुख्याधिकारी अमर हांडा, अनिल निधान, माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी, मंगेश यादव, श्री. श्री फाउंडेशनचे संस्थापक संकेत बावनकुळे, शब्बीर शेख आदी स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

आपल्या घराचे स्वामित्त्व प्रत्येक गोरगरीबाजवळ असले पाहिजे या भूमिकेतून आम्ही काम करीत आहोत. एकही व्यक्ती स्वतःच्या मालकीच्या घरापासून वंचित राहू नये यासाठी पंतप्रधान आवास योजना, त्याच्या जोडीला पट्टे वाटप मोहीम व लोककल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध घरकुल योजना आपण सामाजिक कटिबद्धतेतून राबवित असल्याचे पालकमंत्री बावनकुळे म्हणाले.

महादुला, कोराडी परिसरात आपण विविध उपक्रम हाती घेतले आहेत. टी पॉईंट जवळ आपण उत्तम सुलभ शोचालय बांधत आहोत. याची निगा व व्यवस्थापनाचे काम आपण बचत गटातील महिलांना देणार आहोत. याची उत्तम निगा संबंधित महिला बचत गट घेईल.

याचबरोबर महादुला क्षेत्रात भव्य संविधान भवन साकारत आहोत. यासाठी एकूण आठ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा १७ फुटी भव्य पुतळा व उद्याच्या जगात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी, शासनात उच्च पदावरील नोकऱ्यांमध्ये संधी मिळावी यासाठी भव्य अद्ययावत प्रशिक्षण केंद्र व विविध उपक्रम साकारत असल्याचे ते म्हणाले. यावेळी विविध लाभार्थ्यांना पट्टे वाटपाची सनद देण्यात आली.